# दळण दळिते दळिते...
# धर्म माझा जागविते

(लोकसाहित्य संकलन/संशोधन)

डॉ. सुभाष शेकडे

प्रकाशक

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर,
महाराष्ट्र, भारत

प्रकाशन मंच

**दळण दळिते दळिते... धर्म माझा जागविते**
**(लोकसाहित्य संकलन/संशोधन)**
**Dalan Dalite Dalite... Dharma Maza Jagvite (Folklore)**

**ले.डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे**
बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी,
जि. अहमदनगर फोन नं. ०२४२८-२२२३४९
महाराष्ट्र, भारत. मो. ९४२३१६४७६३

© **सौ. गितांजली शेकडे**
कुंजविहारी निवास, वामनभाऊ नगर,
ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

**प्रकाशक**
आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर ४१४००३ महाराष्ट्र, भारत.
फोन नं. ०२४१-२४२४१६७

**प्रकाशन क्र. ७**
ISBN-13-978-81-927963-6-9
प्रथम आवृत्ती २१ मार्च २०१५ (गुढी पाडवा)

**मुद्रक**
मळगंगा, केडगाव, अहमदनगर

**विशेष निवेदन** : 'आनंदोत्सव' प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
सदर ग्रंथ निर्मितीचा संपूर्ण खर्च लेखकाने स्वतः केला आहे. लेखकाने ग्रंथ विक्रीतून उत्पन्न मिळाल्यास ते सेवाभावी संस्थांना देणगी सहाय्य देण्याचा संकल्प केला आहे.

**मूल्य** १५०/-



**सद्गुरू**

**सत्संगास...**

सुभाष...

# हृदगत

पाथर्डी तालुक्याच्या रानामाळात प्रपंच्याचे श्रम सोशित असताना अथांग सत्संग भाव आसमंतात दरवळत राहतो. जात्याची घरघर, वैरणीची मूठ आणि पिठाची रास क्षणाक्षणाला त्या परमतत्त्वाची आठवण मनात जागविते. दळण रोजचंच कुणालाही न चुकणारं हाच मायेचा खेळ. त्यातून पुरुषार्थ साधून मुक्त व्हायचं ही संतांची सांगी. पाथर्डीच्या अवघ्या शिवारातल्या मनामनात ती खोलवर रुजली. वडिलधाऱ्यांच्या आदरानं, बाळगोपाळांच्या वात्सल्यानं, भावंडांच्या मायेनं. भ्रताराच्या प्रेमानं दाटून आलेले आवंढे जातीच्या लयीतून देवाचा धावा करतात. दळण सरत जातं, भक्ती प्रकट होत राहते, श्रम विरत जातात, मन आभाळ होतं आणि सृष्टीचं हे दान परमेश्वराच्या साक्षीनं, प्रपंचाच्या पोटात पडत राहातं आणि ओठातून तेवढ्याच भक्तीभावानं उमटत जातं. आया-बायांच्या दळणप्रसंगीच्या, श्रमप्रसंगीच्या मनातून स्त्रवणाऱ्या, परंपरेतून ओघात आलेल्या या अक्षरगंगा ओवीरूप घेऊन धर्मधारणासह ऐकणाराचं मनही भारून टाकतात. हे भारलेपण येथे पुस्तकरूपाने संचिताचा स्नेहभाव म्हणून सादर होत आहे.

**– डॉ. सुभाष शेकडे**

* *



# अनुक्रमणिका

**प्रकरण पहिले : धर्मश्रद्धापूर्ण ओवीगीतांची चिकित्सा** ७

**प्रकरण दुसरे : रामायण संदर्भातील ओव्या** १२
i) रामाच्या ओव्या
ii) सीतामाईच्या ओव्या
iii) मारुतीरायाच्या ओव्या

**प्रकरण तिसरे : महाभारत व श्रीकृष्ण संदर्भातील ओव्या** ४१
i) कृष्णाविषयीच्या ओव्या
ii) पांडवांविषयीच्या ओव्या
iii) द्रौपदीच्या ओव्या

**प्रकरण चौथे : शिवसंदर्भातील ओव्या** ५१
i) शिवशंकर ओव्या
ii) भैरवनाथ ओव्या

**प्रकरण पाचवे : विठ्ठल संदर्भ** ५९
i) पंढरपूर नाममहात्म्य ओव्या
ii) विठ्ठलाच्या ओव्या
iii) रुक्मिणी मातेविषयी ओव्या
iv) तुळशीआईच्या ओव्या
v) चंद्रभागाविषयीच्या ओव्या
vi) जनाबाईच्या ओव्या

**प्रकरण सहावे : संकीर्ण संदर्भात (विविध दैवते)** ११०
i) सूर्यनारायण ओव्या
ii) कानिफनाथांच्या ओव्या
iii) लक्ष्मीमातेच्या ओव्या
iv) मोहटादेवीच्या ओव्या
v) कोल्हूबाईच्या ओव्या
vi) अन्य देवतांविषयी ओव्या
vii) धनगर लोकांचा देव जोतीबा – धुळूदेव व इतर ओव्या

**प्रकरण सातवे : ओवीगीतांचा शैलीनिष्ठ तुलनात्मक विचार** १५०

## प्रकरण पहिले

# धर्मश्रद्धापूर्ण ओवीगीतांची चिकित्सा

लोकसाहित्य नित्यवर्तमान असते. असे असले तरी लोकजीवनाच्या परिवर्तनाबरोबर जीवनसारणीतील साधने बदलतात. त्यामुळे काही साधने इतिहासजमा होतात आणि त्या साधनांची लय. त्या लयीत होणारे मनाचे आणि शरीरविभ्रमांचे आविष्कार बदलतात. प्रसंगी इतिहासजमा होतात. ही गोष्ट 'दळण' या प्रक्रियेच्या संदर्भात जगभरात घडलेली दिसते. दगडी जात्यावर दळणे ही परंपरा अश्मयुगापासूनची इतकी जुनी आहे. म्हणजेच ती अतिप्राचीन आहे. हे विचारात घेतले तर जात्याचे आकार, धान्यांचे प्रकार, दळणाऱ्याची हालचाल आणि शक्ती यातून प्रकटणारी श्रमाची लय आणि या लयीचा शब्दाविष्कार स्वाभाविकपणे वैविध्याने प्रकटला असणार हे उघड आहे. सामान्य कुटुंबामध्ये दैनंदिन उपयोगासाठी मध्यम व लहान आकाराची जाती केव्हापासून प्रचारात आली हे सांगणे कठीण आहे. जात्याप्रमाणेच पाटा आणि वरवंटा या साधनांच्या बाबतीतही विधान करता येईल. याचा अर्थ असा की, जात्यावरच्या ओव्यांची मौखिक परंपरा ही जात्यांइतकीच प्राचीन असली पाहिजे. या परंपरेचे इतिहासजमा होणे यालाही आता सुमारे शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. घाण्याप्रमाणे बैलांच्या साहाय्याने दळण दळण्याची परंपरा कोठेही आढळत नाही. ही परंपरा स्त्रियांशी आणि अपवादात्मकतेने पुरुषांशी निगडित आहे. एकविसाव्या शतकात जात्यावर दळण्याची परंपरा ही विधिनाट्यांसारखी अवशेषानेच राहिली आहे, असे म्हणावे लागते. तरीदेखील महाराष्ट्रात अतिग्रामीण भागात आजही वीज आणि इंजिनावरील गिरणी (पिठाची) अनेकदा दगाफटका करते. त्यावेळी अडल्या-पडल्याला अश्मयुगात परंपरेने असलेले जातेच उपयोगात आणले जाते. उदा. प्रस्तुत संशोधकाने (मी स्वतः) गेल्या दहा-वीस वर्षात पाथर्डी तालुका, जि. अहमदनगरच्या ग्रामीण भागातील जात्यावरची मौखिक परंपरा संकलित केली आहे. जात्यावरची मौखिक परंपरा जतन करणे ही गोष्ट आजच्या मितीला अत्यंत आवश्यक आहे; कारण भक्कम कुटुंबसंस्थेचा पीठगिरणी पूर्वीचा जाते हा

कणा आहे आणि तो कणा आज इतिहासजमा झाला आहे. त्यामुळे लग्नात घाणा भरताना केवळ विधिनाट्याप्रमाणे ह्या ओव्या विरंगुळ्याच्या रूपात आविष्कृत होतात. ते आता दैनंदिन जीवनाचा भाग राहिलेला नाही. म्हणूनच हे संचित सर्वांसमोर येणे, संशोधकांच्या संग्रही असणे आवश्यक झाले आहे. पूर्वसुरींपैकी सानेगुरुजी, डॉ. दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. प्रभाकर मांडे यांपासून सर्व अभ्यासकांनी असे संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र गेल्या पंचवीस वर्षात असे संकलन करण्यास अभ्यासक धजावत नाहीत. गुप्तधनाचा धांडोळा घ्यावा तसा या संचिताचा धांडोळा घ्यावा लागतो. याकरिताच हे संशोधन सर्वांसमोर मांडण्याचा अट्टाहास.

डॉ. मांडे मौखिक परंपरेविषयी लिहितात की, अशा मौखिक परंपरेने चालत आलेल्या वाङ्मय प्रकारांना प्रेक्षाभान नसते. ते म्हणतात, ''श्रोता प्रेक्षकांची जाणीव नसते. जे एखाद्या समूहाचे असते. त्यांच्या जीवनरितीचे अंग असते. कोणत्यातरी कृतीशी, विधीशी संबंधित असते. यांना त्यांच्या जीवनात अर्थपूर्णता असते. काहीतरी प्रयोजन असते. हे वाङ्मयप्रकार प्रामुख्याने गेय व तालबद्ध असतात. तरीही ते गाताना किंवा म्हणताना कोणत्याही वाद्याची साथसंगत लागत नाही.''[१] जात्यावरच्या ओव्यांचा विचार करताना डॉ. मांडे यांचे हे म्हणणे मर्यादित स्वरूपात स्वीकारावे लागते; कारण ही ओवीगीते ते सादर करणे हे उत्स्फूर्तपणे घडत असते आणि जात्याची घरघर हेच त्याचे संगीतसाधन असते. मात्र ते म्हणतात त्याप्रमाणे जीवनसारणीशी त्याचा संबंध नसतो. या ग्रंथात जीवनातील धर्मस्थळांचा संबंध गीतातून कसा आविष्कृत झाला आहे ते आपण पाहात आहोत. लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ या लेखात डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणतात, ''लोकसाहित्याच्या अभ्यासकाला धर्मश्रद्धांचा अन्वयार्थ लावणे भाग पडते. हे संदर्भ देणाऱ्या कथा किंवा गाणी का? केव्हा? व कशी निर्माण झाली, त्यांची परंपरा कोणत्या स्वरूपात अस्तित्वात राहते व त्यांचा लोकसंस्कृतीशी संबंध काय? या प्रश्नांचा विचार करावा लागतो.''[२] ते पुढे लिहितात, ''दैवतकथांमध्येच रामायण, महाभारत व पुराणे यातील लोकसाहित्यात सापडणाऱ्या कथांचा व गाण्यातील संदर्भांचा अंतर्भाव करणे योग्य ठरू शकेल.''[३] डॉ. सहस्रबुद्धे यांचे धर्मश्रद्धांच्या संदर्भात हे म्हणणे लोकजीवनाच्या धारणेशी निगडित आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर रामायण, महाभारत, शिवलीला (शिवपार्वती), गणपती आणि प्रामुख्याने भागवतातून पुढे आलेले श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्यांनी 'परब्रह्मलिंग'[४] म्हणून गौरविलेले विठ्ठल हे दैवत महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आधार आहे.



लोकजीवनाची सुखदुःखे, कौटुंबिक आत्मियता आणि सामाजिक आत्मियता यांना या धर्मश्रद्धांचा धर आहे. प्रस्तुत ग्रंथात रामायण, महाभारत, शिवलीला, विठ्ठल यांसह संकीर्ण स्वरूपात आढळणारे दैवतकथांचे संदर्भ सहज ओवी गीतात आलेले दिसतात. महाराष्ट्राचे कौटुंबिक जीवन हे या दैवतकथांच्या मांडीवर निवांत असते असे म्हणणे गैर ठरत नाही. डॉ. विश्वनाथ शिंदे संस्कृतीविषयी लिहितात, ''सर्वसमूहाला एकत्रित बांधणारी काही समान वैशिष्ट्ये संस्कृतीमध्ये असतात. हे खरे असले तरी प्रत्येक समूहाप्रमाणे संस्कृती भिन्न असू शकते. अनेक असंस्कृतीच्या एकत्रिकरणातून समग्र संस्कृतीचा एक आराखडा सिद्ध झालेला असतो.''[५] ओवीगीते हे महाराष्ट्र संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ओवी आढळते. म्हणूनच ओवी हा खास मराठी छंद आहे. हा छंद मराठमोळ्या जात्यातून स्फुरलेला आहे. म्हणूनच गृहिणीच्या अंतःकरणातील घरंदाजपणा धर्मश्रद्धेच्या आधाराने जात्याच्या साथीने सुखदुःखासह हुंकारित होते. आणि त्यातून आविष्कृत होणाऱ्या धर्मश्रद्धा तिच्या घरपणाला, कुटुंबाला आणि वंशपरंपरागत जगण्याला भक्कम आधार देतात. धर्मश्रद्धांचा लोकसंस्कृतीशी हा अनुबंध आहे. नीति आणि नियती, संचित आणि प्रारब्ध यांचे संदर्भ आणि संबंध रामायण, महाभारत, शिवलीला आणि पांडुरंग यांच्या कथांशी अनुबंधित झालेले आहेत. ओवीची दिव्य व्युत्पत्ती आणि वैशिष्ट्ये सांगताना डॉ. कुन्ता जगदाळे म्हणतात, ''पहाटेचे शांत, मंगल, प्रसन्न, निरव वातावरण जात्याच्या घरघरीचे एकसुरी संगीत, त्यासोबत आपल्या मंजूळ, मधुर, चढत्या आवाजातील ही स्त्रियांनी गायिलेली गीते वातावरण कसे मंत्रमुग्ध होऊन जाते. या ओव्या त्यांनी श्रमपरिहारासाठी, स्वतःच्या समाधानासाठी गायल्या आहेत. हे उत्स्फूर्त गायन आहे.''[६] त्यांच्या निवेदनातील 'स्वतःच्या समाधानासाठी' हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हे समाधान रामकृष्ण पांडवांशी, शिवपार्वतीशी आणि परब्रह्माशी स्वतःच्या आणि घरादाराच्या प्रपंचाची नाळ जोडण्याचे समाधान आहे. त्यामुळे केवळ श्रमपरिहार एवढाच आशय किंवा प्रेरणा या ओवीगीताला राहात नाही. कुटुंब, समाज, मानवी समूह आणि चराचर यांना एकात्म भावाने हृदयात साठवून त्यांना स्थिर जीवन बहाल करणारी ही धर्मसाधना असते. एवढे या गीतांचे महत्त्व आहे. अर्थातच हे हेतूपूर्वक नव्हे तर आपसूक, रक्तातून रक्ताला मिळालेल्या जात्याच्या घरघरीच्या लयीने ओठातून स्फूरितरूप झालेली असते.

डॉ. अरुणा ढेरे स्त्रियांच्या गीतांविषयी, 'स्त्रियांची तिच्या जगण्याचा अंतरिक पुनरुच्चार' या लेखात लिहितात, ''निर्माण करणं हे बाईच्या आतच स्वाभाविकपणे आहे. म्हणूनच की काय लोकसंस्कृतीकडे पाहिलं की,

बायकांच्या सर्व कला जगण्यातून उगवलेल्या, जगण्याला सजवणाऱ्या आणि जगण्याचा अनुवाद करणाऱ्या आहेत.''[७] ''लोकपरंपरेने जवळजवळ सत्तर टक्के मौखिक वाङ्मय हे स्त्रियांनी निर्माण केलेले आहे. त्यात ओव्या आहेत, गाणी आहेत, फेराची आहेत, खेळांची आहेत, श्रमांची आहेत, देवदेवतांची आहेत.''[८] त्या पुढे लिहितात, ''सबंध मध्ययुगीन वाङ्मय एका बाजूला संपन्न अशा भक्तिसाहित्यानं भरलेलं आहे आणि दुसऱ्या बाजूला स्त्रियांच्या समृद्ध अशा मौखिक निर्मितीनं भारलेलं आहे. या स्त्रियांजवळ जगण्याला तोंड देण्याची धिटाई आहे, जो आत्मविश्वास आहे किंवा जी चतुराई आहे त्यानं आपण अक्षरशः आवाक होतो. इतकं ते जोरकस आणि सच्चं जीवनदर्शन आहे.''[९] डॉ. अरुणा ढेऱ्यांच्या चिकित्सेतून स्त्री ही संस्कृतीची धारणा करणारी आहे आणि त्या धारणेचा उद्गार धर्मश्रद्धात्मक ओवीगीतातून होतो, असे म्हणता येईल. अलेक्झांडर क्रॉपने लोकसाहित्याचे एक अंग म्हणून लोकगीत याचा स्वतंत्रपणानं उल्लेख केल्याचे डॉ. दुर्गा भागवत यांनी नोंदवून लोकगीतात स्त्रियांची गाणी हे साहित्याचे मूल धन होय असे गणले जाऊ लागले, असे चिकित्सकपणे नोंदवले आहे.[१०] वर केलेल्या चर्चेप्रमाणे कुटुंबाची धारणाशक्ती म्हणजेच स्त्री आणि स्त्रीच्या मनाची धारणाशक्ती म्हणजे तिच्या मुखातून मुखरित होणारे हे मौखिक परंपरागत मूल धन असे म्हणणे वावगे होणार नाही.

प्रस्तुत ग्रंथात रामायण, महाभारत, शिवलीला, पांडुरंग आणि संकिर्ण अशा पाच भागात जात्यावरच्या ओव्या संकलित केल्या आहेत. त्यातील आशयाची चिकित्सा येथे करण्याचा प्रयत्न केला आहे. आज हा आशय स्त्रीमनातून ढळला आहे असे नाही. मात्र त्या आविष्काराचा मार्ग लुप्त झाला आहे. त्याचे परिवर्तनातील रूप कोणते हे लोकसाहित्यदृष्ट्या तपासणे हा संशोधनाचा भाग होऊ शकतो. म्हणूनच प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत अश्मयुगीन यंत्राचा अवशेष म्हणून शंभर वर्षांपूर्वी प्रचलित असलेले जाते व जात्याच्या संगीत साथीने मुखरित होणारे हे स्त्रीधन आज कोणत्या स्वरूपात ही जीवनविषयक आत्मियता धर्मधारणेसह जागवित असेल याकडे कुतूहलात्मक प्रश्नचिन्ह उपस्थित करून पूर्वसंचित येथे सुरक्षित करण्याचा हा नम्र प्रयास होय.



**संदर्भ** :

१) मौखिक वाङम्याची परंपरा : स्वरूप आणि भवितव्य- मांडे प्रभाकर, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली मार्च २०१०.

२) मराठी संशोधन पत्रिका- महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत त्रैमासिक, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९८२, 'लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ - डॉ. अनिल सहस्रबुद्धे.

३) तत्रैव.

४) पांडुरंग स्तोत्रम् - आद्य शंकराचार्य.

५) लोकसाहित्य संशोधन आणि समीक्षा- शिंदे (डॉ) विश्वनाथ, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती मार्च २०१३.

६) उमाळे स्त्रीहृदयाचे- जगदाळे (डॉ) कुन्ता, प्रकाशक श्री. नारायण जगदाळे, बार्शी, प्रथमावृत्ती १५ मे २००२.

७) पंचधारा- संपा. डॉ. उषा जोशी, वर्ष ५६, अंक तिसरा व चौथा २०१३-१४, 'स्त्रियांची गाणी- तिच्या जगण्याचा आंतरिक पुनरुच्चार डॉ. अरुणा ढेरे.'

८) तत्रैव.

९) तत्रैव.

१०) लोकसाहित्याची रूपरेखा- भागवत (डॉ) दुर्गा, वरदा बुक्स, मुंबई, प्रथमावृत्ती.

* * *

## प्रकरण दुसरे

# रामायण संदर्भातील ओव्या

## i) रामाच्या ओव्या

१ राम म्हणू राम राम माझा प्राणसखा
रामाचं घेते नावू देहीला नाही ढका ।।

२ राम म्हणू राम राम माझ्या मुखांमंदी
रामाचं घेते नावू देही माझा सुखामंदी ।।

३ आसी सकाळी उठूनी मुखी माझ्या रामराम
आसी वाच्या मग भेटं कौशल्याचा श्रीराम ।।

४ रामा तुझं नावू घेता घेता इसरले
धरणी मातावरी माझे पाय घसरले ।।

५ रामा तुझं नावू नाव घ्यावा भरती जागा
रामाचं नावू घेता नाही होययाचा दगा ।।

६ रामा तुझं नावू नाव घ्यावा झोपामंदी
अमृताची कुपी सोडली मुखामंदी ।।

७ राम म्हणू राम राम माझ्या ह्रदयात
घातीयले बाई लक्ष मोती करंड्यात ।।

८ असा राम म्हणू राम इशारीचा प्याला
रामा तुझं घेते नावू शीण आंतरीचा गेला ।।

९ राम बाई म्हणू राम रामभ्रंता पडली
अशी गाय म्हणूनी धार नंदीची काढली ।।



१० रामा म्हणू रामा राम कोणी गुरू केला
समिंदर ओलांडून राम लढाईला गेला ।।

११ असं रामा तुझं नाव मी आज नाही घेतलं
येडं बाई माझं मन कोण्या धंद्याला गुतलं ।।

१२ असं राम राम म्हणू राम कोणी ते पाहिला
बाई माझ्या ते अभंगी गायीला ।।

१३ बाई सकाळी उठूनी रामाचं नावू घ्यावा
रामाचं नावू घ्यावा मग पाऊल टाकावा ।।

१४ रामा तुझं नावू मी घेते वेळू वेळा
कसे बांधू केस आंबाडा माझा मोकळा ।।

१५ रामा तुझं नाव घेते मी झोपामंदी
असे अमृताचे थेंब पडे माझ्या मुखामंदी ।।

१६ रामा तुझं नावू धरीते मी आवळूनी
करीतेन माझं काही यम गेले जवळूनी ।।

१७ अशी सकाळी उठूनी मुखी माझ्या रामराम
अशी पोथी वाचायला येतेन कौशल्याचे श्रीराम ।।

१८ राम म्हणू राम संगतीला चांगला
मह्या ह्रदयात यानं बंगला बांधिला ।।

१९ राम म्हणू राम राम आयोध्येचा राजा
जिवाला जड भारी त्याला दंडवत माझा ।।

२० राम म्हणू राम राम वलनीचा शेला
त्याचं नाव घेता शिन माझा गेला ।।

२१ राम म्हणू राम राम साखरेचा खडा
सीतामाईसाठी असा राम झाला बाई येडा ।।

२२ राम म्हणू राम राम म्हणती कुणाचा
रामाचं नाव घेता होतू उद्धार देहीचा ।।

२३ राम म्हणू राम राम अमृताचा पेला
रामाचं नाव घेता शीन मनीचा हारला ।।

२४ राम म्हणू राम राम मपला गुरूभाऊ
तुळशीच्या वट्यावरी पोथी वाचूनी मला दावू ।।

२५ सकाळच्या पारी जाते रामाच्या वाड्याला
बरकत देई रामा नऊ लाखाच्या चुडीयाला ।।

२६ सकाळच्या पारी राम गातो माझा गळा
माझ्या ह्रदयात हाई रामाचा पानमळा ।।

२७ सकाळच्या पारी राम म्हणत डोले माथा
रामाचं नाव घेता तिथं नाही कुणाची सत्ता ।।

२८ राम म्हणू राम राम साखरेचा कंद
याचं नाव घेता लागे जीवा छंद ।।

२९ रामकुंडावरी उभी केली कपीला
दशरथाचा पुत्र दान वाटिता देखिला ।।

३० सकाळी उठुनी मी का गुंतले कामाला
जाईच्या फुलाचा हार गुंफिते रामाला ।।

३१ सकाळी उठोनी पाय माझे ओले झाले
रामाच्या दर्शना गंगा ओलांडूनी गेले ।।

३२ रामाचा जन्म झाला स्वर्गी वाजते भेरी
अशा पाडव्याच्या दिशी गुढ्या उभारल्या दारी ।।

३३ रामाचा जन्म झाला स्वर्गी वाजे घंटा
आता त्रैंलोक्यामंदी आनंद झाला मोठा ।।

३४ रामाच्या नावाचा पापी करतो कंटाळा
नितळ सोडूनी पाणी भरीतो गढुळा ।।

३५ रामकुंडावरी बाई गं हिरवा मंडप जाईचा
असा आंघुळीला आला गं पुत्र कौशल्या मातेचा ।।

३६ अयोध्या नगरीत सोन्याचा बार झाला
राजा दशरथापोटी राम पुत्र जन्माला आला ।।

३७ राम म्हणू राम आला तोंडाला पाझर
आला तोंडाला पाझर राम मधाची घागर ।।

३८ राम राम करता राम गळ्यातली सरी
रामाचं नाव घेता चुकलं यमपुरी ।।

३९ राम माझ्या मनी नित राम माझ्या ध्यानी
रामाच्या वाचूनी सगा सोयरा नाही कुणी ।।

४० रामाचं नाव घेता कुणी नाही ते बुडाले
पाणी यान पाषाण वरच्यावरी तरले ।।

४१ रामाचं नाव घेता पळती भूतंखोतं
करतील काय तिथं बापडे यमदूत ।।

४२ रामाच्या नावाची एकच हूल झाली
साखर शेरणी नाही माझ्या वाट्याला आली ।।

४३ राम म्हणू राम राम माझे ब्रह्मचारी
क्रिष्ण अवतारी छंद राधिकेचा धरी ।।

४४ राम म्हणू राम राम साखरेची वडी
आता शुद्ध झाली नामाने माझी कुडी ।।

४५ राम म्हणू राम राम साखरेचा रवा
आता शुद्ध झाली नामाने माझी जिव्हा ।।

४६ राम म्हणू राम राम गुळावाणी गोड
रामा तुझं मला लागून गेलं येड ।।

४७ राम म्हणू राम राम मोठा कामाचा
अंतकाळाच्या येळी पाश तोडतो यमाचा ।।

४८ पहाटेच्या पारी उठा बायांनो दळायला
पंचवटीमंदी राम चालले खेळायला ।।

४९ पहाटाच्या पारी सडा टाकीते मी दाट
माझ्या दारावरून रामरायाची गं वाट ।।

५० राम म्हणू राम राम साकर फुटाना
राम सांगे गोष्टी मला उठावासा वाटाना ।।

५१ रामकुंडावरी हिरवा मांडव जाईचा
आंघुळ करितो राम गं कौशल्याबाईचा ।।

५२ रामकुंडावरी निळी पालखी कुणाची
आंघुळ करिते बाई जानकी रामाची ।।

५३ रामकुंडावरी लोळे धोतराचा पिळा
आंघुळीला आला रामराया सोवळा ।।

५४ रामकुंडावरी ढवळ्या धोतराची घडी
आंघुळीला आली राम-लक्ष्मणाची जोडी ।।

५५ राम करता करता राम महा मैतर
संकटाच्या वेळी नको देवू अंतर ।।

५६ राम नि लक्ष्मण दोन्ही गुलाबाचे हार
रामाची गं सिताबाई मधी बसली सुकुमार ।।

५७ राम म्हणू राम राम माझ्या ध्यानी मनी
सीता खारकेचं झाड राम खजुराची गोणी ।।

५८ सकाळच्या पारी ऐका मोराची आरोळी
राम वाचितो पोथी सीता काढिते रांगोळी ।।

५९ राम लक्षुमन दोघं आकाशीचे दिवे
सावळी सीतामाई मधी जशी वीज लवे ।।

६० कौशल्या माता म्हणे नको तापू धरणी बाई
राम गेले वना पायी खडावा नेल्या नाही ।।

६१ राम जातो वनवासा संगं जातं कोण
रामाला वनवास माता कैकयी पासून ।।

६२ राम जातो वनवासा संगं जातं कोण
रथ चालवितो पुढे सुमंत प्रधान ।।

६३ राम जातो वनवासा निघाली आयोध्या झाडून
राजा दशरथानं दिला प्राण सोडून ।।

६४ वनाचे फळ कसे पिकले लालूलाल
बोलती कौशल्या माता राम वनवासाला गेले काल ।।

६५ रामाच्या बाणांनी गेला मारीचाचा प्राण
धाव लक्ष्मणा मला वेढिला राक्षसाना ।।

६६ रामा तुझी सीता शिळा होऊनी पडली
पाप्या रावणाच्या नाही हाताला चढली ।।

६७ बाणावरी बाण आली बाणाची चळख
पोटीच्या बाळाला नव्हती रामाची ओळख ।।

६८ राम ती लक्ष्मण दोघं हिंडं लवणानं
जटायू सांगं खुणा सिता नेली रावणानं ।।

६९ असा नाही पाऊस पाणी डोंगर कशानी गळतू
सिताच्या गं चोळीसाठी राम लढाई खेळतू ।।

७० लक्षुमनाला गं शक्ती लागली मांडीत
असा मारवती राजा वेली निघाला धुंडीत ।।

७१ असा पाऊस औरंगाबादी काळा कोट
सीताच्या नान्हीवरी रामचंद्र हाकी मोट ।।

७२ बाई लंकेचा रावण आभिमानानं तुंबतू
रामा तुझी सिता एकदा भोगीन म्हणतू ।।

७३ रावणाची मंदोदरी रावणाला शिकी ग्यान
सीता घालावी नेवून त्यात नाही लहानपण ।।

७४ रामा तुझं नावू नाव घ्यावा भरती जागा
रामाचं नावू घेता नही होययाचा दगा ।।

७५ रूप रामाचं घेवून राक्षस हाकामारी
लक्ष्मण दिर खूण गुंफा बाहेरी करी ।।

७६ सकाळच्या पारी जाते रामाच्या वाड्याला
आऊख मागते नवरत्नाच्या चुड्याला ।।

७७ सकाळी उठोनी आधी रामाचं नाव घ्यावं
माझ्या मायबहिणी मग चितिल्या कामा जावं ।।

७८ सकाळच्या पारी माझ्या हातात गंधवाटी
निघाले मी बाई रामचंद्राच्या पूजेसाठी ।।

७९ चंदनाचा पाट वरती अमृताचा पेला
जीवाला सोडवण रामचंद्र गुरू केला ।।

८० राम लक्षुमन दोघीची दोन बाळं
जनकाच्या मंडपात सीता घाली रामाला माळ ।।

८१ राम चाले पायी लक्षीमन झाडी माती
पिरतीमीच्या पाठीवरती असे बंधू आहेत किती ।।

८२ राम चाले पायी लक्षीमण झाडी पाला
पिरतीमीच्या पाठीवरती असा बंधू नाही झाला ।।

८३ अलिकडे नाशिक पलिकडे पंचवटी
वहाते गंगामाई मधी रामाची राहुटी ।।

८४ राम लक्षीमण दोन्ही महाली रांजण
सावळी सीताबाई वरी शोभती नागीण ।।

८५ राम लक्षुमण दोघीचे दोघेजण
मारवती देव माझा अंजनीचा पहिलवान ।।

८६ राम लक्षुमण दोघं हिंडती वनुवनाला
रेशमी गोंडे हायित त्यांच्या धनुष्यबानाला ।।

८७ अहिल्याची शिळा गौतमाची जाया
उद्धरली आता वनी जाता रामराया ।।

८८ अहिल्या झाली शिळा गौतमाच्या शापानं
आता उद्धरली दशरथाच्या पुत्रानं ।।

८९ मारीला इंद्रजीत भूज पडली अंगणी
पतीवर्ता सुलोचना पत्र मागते लिहूनी ।।

९० बाणामागे बाण राम बाणाची आवई
मारिला इंद्रजीत लक्षुमनाचा जावाई ।।

९१ रामकुंडावरी कुणी वाटली सुपारी
दर्शनासी आले पंचवटीचे व्यापारी ।।

९२ राम बोलतू सीता नासिक चांगलं
पंचवटीमंदी मन दोघांचं रंगलं ।।

९३ वाजंत्री वाजती नासिकच्या माळावरी
अभिषेक होतो कौसल्येच्या बाळावरी

९४ नासिक त्र्यंबक माझ्या आईनं पाहिलं
शेंडीचं नारळ कुशावर्ताला वाहिलं ।।

९५ मंदोदरी बोले श्रीरामाला शरण जाऊ
सीता सुंदर पतिवर्ता त्याची त्याला देऊ ।।

९६ राम निघाले वनवासा सीता चालती पुढे
तिला नेसवाया काम झाडाची साल काढे ।।

९७ गंगा ओलांडूनी गेले होते मी कामाला
सीताबाईला चोळी माळ गुंफीली रामाला ।।

९८ रामचंद्राचं लगीन राजा जनकाची बेटी
स्वयंवरासाठी गेली आयोध्येला चिठी ।।

९९ सोन्याचा मंडप राजा जनकाच्या घरी
मोत्या पवळ्याच्या अक्षता पडे रामावरी ।।

१०० राम लक्षुमण दोघं पटाईत वाघ
सावळ्या सीताईला रावणाचा डाग ।।

१०२ लंकेचा रावण सरगी जळतो पालथा
रामाच्या सीतेवरी त्यानं गर्व केला हुता ।।

१०२ रामाच्या परास लक्षुमन सावळा
दोहीच्या रंगाहून रंग सीताचा पिवळा ।।

१०३ लंकेचा रावण भारी गर्वानं दाटला
दशरथाचा ल्योक त्याला वरकूस भेटला ।।

१०४ राम म्हणून राम म्या तो गुरू केला
रामाचं घेता नाव शीणभाग माझा गेला ।।

१०५ रामा तुझं नाव घ्यायाला अवघड
पाण्यामंदी मासा तिच्या हृदयी सांगड ।।

१०६ रामा तुझं नावू घेता जागोजाग
नाव घेताच राम उभा माझ्या पाठी मागं ।।

*



## ii) सीतामाईच्या ओव्या

१ सीतामाई सांगं कथा राम सांगुनी देईना
सीताबाईचा वनवास यांच्या हुरदी माईना ।।

२ सीताबाई सांगं कथा आयकती वन्यारबाई
सीताबाईचा वनवास झाला रावणापाई ।।

३ सीता चाले माहेराला सांगून गेली तेलनीला
शेर शेर तेल घाल रामाच्या समईला ।।

४ सीता चाले माहेराला सांगून गेली कोळणीला
हंडा हंडा पाणी दे गं रामाच्या आंघोळीला ।।

५ सीताबाई वनवासी केली दगडाची उशी
एवढ्या वनात बाई झोप झाली कशी ।।

६ सीता चालली वनवासा कुंकू लावती कपाळी
राम देखिला दुरूनी नेतरं आले भरूनी ।।

७ सीता चालली वनवासा आया बाया पुसं
माघारी फिर बया माझी वनवास ।।

८ सीता चालली वनवासा तिनं माघारी पाहिलं
रामाच्या फराळाचं दही शिक्यावर राहिलं ।।

९ लंकेचा रावण आला बैरागी होऊन
आरुण्या वनातून गेला सीताला घेऊन ।।

१० सीता म्हणं सीता धरिली पदराला
रेशमाचे गोंडे यांच्या धनुष्यबानाला ।।

११ सीता म्हणं सीता धरिली केसाला
काशी केदरात पिळं पडलं चिचाला ।।

१२ सीता सत्वाची धनुष्याचा केला घोडा
ब्रह्मदेवानं लिहला राम-सीताचा जोडा ।।

१३ माझ्या दारामंदी तुळशीचं बव्हलं
सीता घाली रांगोळी काढीती रामाचे पाऊल ।।

१४ सीता चालली वनवासा आड्या आल्या वनगाई
अशा आपल्या देशाला कवा येतान सीताबाई ।।

१५ सीता गेली वनवासा सांगून गेली सुताराला
असा चंदनाचा पाट आणा रामाला बसायाला ।।

१६ सजवले रथ रथा लाविले घुंगरं
चालली वनवासा सीता रामाची सुंदर ।।

१७ अशी सीताबाई म्हणं मला कशाची माऊली
पाच वर्षाची केली रामाच्या गं हावाली ।।

१८ सीता चालली वनवासा रथा बांधली सुतळी
वनवासा निघाली गं रामचंद्राची पुतळी ।।

१९ सीताराणीला वनवास तुमची आमची काय कथा
देवमानसांच्या घरी कलियुग शिरला होता ।।

२० सीता चालली वनवासा हिला आडवा गेला होला
सीताला वनवास पापी रावणानं दिला ।।

२१ बारा वर्ष झाली सीताबाईच्या तपासी
ओळखू येईना गं लव अंकुश रामाशी ।।

२२ सीता वनवासी दगडाची केली उशी
बोरी या बाभळी गोष्टी सांगती तिच्यापाशी ।।

२३ सीताला सासूरवास सासू कैकयीनं केला
रामासारिका भरतार नाही सीताला भोगू दिला ।।

२४ सीताला सासूरवास चारी दरवाजे लावूनी
आला लंकेचा रावण गेला सीताला घेवूनी ।।

२५ सीताबाई बाळंतीन एवढी अंधारी हिची न्हाणी
सीताला नाही कोणी देव तातुबा घाली पाणी ।।



२६ लक्ष्मण दिरा सांग मनीचं कपाट
सीता चालली माहेर, रान दिसत अचाट ।।

२७ लक्ष्मण दिरा सांग मनीचं इगीन
अगं चल माहेराला तुझ्या भावाचं लगीन ।।

२८ आरुण्या वनात काय दिसे लालू लाल
सीतामाई बाळंतीण दिले लुगड्याचे पाल ।।

२९ सीताबाई बाळंतीण इला नाही बाळत्याची घडी
लक्ष्मण दिर पानं पळसाचे तोडी ।।

३० लक्ष्मण दिरानं गाडी खुळखुळाची केली
आरुण्या वनामंदी सीता सोडाया नेली ।।

३१ लक्षुमन दिरानं बाई असं का गं केलं
आरुण्या वनामंदी का आणून मोकलीलं ।।

३२ आरुण्या वनात कशाची शेज बाज
लक्षुमन दिरानं केली दगडाची शेज ।।

३३ अंकुश पोटीचा लव झाला धर्माचा
झाला पोवाडा सीताच्या कर्माचा ।।

३४ आरुण्या वनामंदी कोन रडत ऐका
सीताला समजावया बोरी बाभळी बाईका ।।

३५ सीताबाई बाळंतीण कशाचा कातबोळ
चिचाचा पाला वाटी अंकुशाच्या वेळं ।।

३६ आरुण्या वनामंदी दिवा जळतो कोणाचा
सीताच्या मांडीवर पुत्र खेळतो रामाचा ।।

३७ आरुण्या वनामंदी दिवा कुणाचा विझला
सीताच्या मांडीवरी पुत्र रामाचा निजला ।।

३८ लव आहे लव्हाळ्याचा अंकुश आहे रामाचा
वनवास झाला सीताच्या गं जन्माचा ।।

३९ सीताबाई गर्भिन इला महिना चार
रामाच्या बागात सावली पाहाते गार ।।

४० सीताबाईला सासूरवास रामाच्या मावशीचा
दारी सुकून गेला बाग तुळशाबाईचा ।।

४१ शिंगरीचा रथ लागला यकरा
पाच महिन्याचा गर्भ देतो होकरा ।।

४२ शिंगरीचा रथ रथा लाविली फडकी
वनवासाला लावली सीता रामाची लाडकी ।।

४३ सीताबाई बाळंतीन इला बाळत्याची वान
अंकुश बाळाखाली आथरी पळसाचं पान ।।

४४ सीताबाई गं म्हणं खरं नाही कर्माचं
आता वाळूमंदी झिरा पाणी याला गं धर्माचं ।।

४५ अशी सीताबाई म्हणं कर्माची गं खटखट
अशी शेवाळली वीट गं पाय द्यावा ना बळकट ।।

४६ सीता निघाली वनवासा रथ येशीत माईना
सीताला गं वाटं लावाया राम सभीचा येईना ।।

४७ सीताला वदाया केली सूर्यतळी मान
वदले लक्ष्मण वाय लक्ष्मीची आन ।।

४८ सीताला वदाया सूर्यतळी केला माथा
बंधू माझ्या लक्ष्मणा सारी माया सोड आता ।।

४९ बाणावरी बाण बाणाची पडती चळत
सीताला वदाया नाही रामाची आळत ।।

५० लहू बाळ कडेवर अंकुशा धरीला हाताला
भाकरीची पाटी सीता चालली शेताला ।।

५१ लहू बाळ लव्हाळ्याचा अंकुश धर्माचा
वाजविला पवा सीता तुझ्या कर्माचा ।।

५२ सीताबाई बोलं तात्या सपान पडलं
रामाच्या बागामंदी लव्हू बाळाला काळानं वेढलं ।।

५३ सीताला सासूरवास राणी कैकयीनं केला
नवती मंदी संसार नाही तिनं करू दिला ।।

५४ आकाशी पाळणा खाली धरती माऊली
नांगराच्या ताशी सीता जनकाला घावली ।।

५५ सीता जानकी नवरी जनक राजाला पडलं कोडं
रामाच्या धनुष्याचं तिनं बसाया केलं घोडं ।।

५६ रामाची सीता लक्ष्मुमनाची वहिनी
दशरथ राजाची मोठी सून अशी ती कामिनी ।।

५७ रामकुंडावरी हिरवी पालखी कोणाची
आंगुळीला आली सीताराणी ती रामाची ।।

५८ लवू केला लाव्हाळ्या देव अंकुश कुणाचा
रामाच्या रथावरी बाण सोडी नेमाचा ।।

५९ बाणामागं बाण येत्यात सरसरा
सीताबाई म्हणं ती माझ्या रामाचा वंश खरा ।।

६० सीता चालली वनवासा वन लागलं जाईचं
फिर माघारी सीताबाई गाव तुझ्या आईचं ।।

६१ सीता चालली वनवासा वन लागलं झेंडूचं
फिर माघारी सीताबाई गाव तुझ्या बंधूचं ।।

६२ सीता चालली वनवासा लागलं चिल्लरीचं
फिर माघारी सीताबाई गाव तुझ्या भैनीचं ।।

६३ सीताबाई बोले तातोबा माझ्या ऋषी
लहू अंकुश बाळाचा पाळणा हालविशी ।।

६४ सीता चालली वनवासा रडू लागली मनाला
येवढी होती माया भूल पडली कसी रामाला ।।

६५ सीता चालली वनाला मागं सयांचा घोळका
फिरा गं माघारी राम भुकेचा हालका ।।

६६ सीताबाई बोले मी नाही वागले आकरीत
धर्म केला जोगड्याला पाय पडला रेखीत ।।

६७ सीता निघाली वनवासा रथ वाजतो खडाखडा
आयोध्या नगरीत राम रडतो घडाघडा ।।

६८ सीताला वनवास खाती वनाची कंदमुळं
लव अंकुश बाळ जोडीनं दोन्ही खेळं ।।

६९ आरुण्या वनामंदी चूल कुणाची पेटली
सीता नार बाळंतीण गर्दी धुराची उठली ।।

७० सीता चालती वाटनं लक्ष्मण येची काटे
सारी पिरथिमी हिंडले असा दीर नाही कोठे ।।

७१ सीता जाती वनवासाला बाया जाती कोस कोस
फिरा बायांनो माघारी शिरी माझ्या वनवास ।।

७२ सीताबाई बोले वनवास माझ्या जिवा
झाली बारा वर्स नाही डोंगरात दिवा ।।

७३ सीता जाती वनवासा रथ येशीच्या बाहेरी
हिच्या बरोबरी जाया लक्ष्मणाची तयारी ।।

७४ सीता निघाली वनवासा सांगती माळणीला
राम मंदिरा ऐकले फुलं द्यावी पुजीयेला ।।

७५ सीता नारीला वनवास आलाया कोण्या रीती
कपट्या रावणाला धर्म करावया गेली होती ।।

७६ सीता जाती वनवासा सया म्हणती कधी येशी
कशाचं येणं जाणं माझा राम तुम्हापाशी ।।

७७ बाप लेक यांची झाली बाई गं लढाई
सीताबाई बोले बाळा नका करू हो चढाई ।।



७८ अरुण्या वनामंदी सीता रडं धाई धाई
तिला समजावयाला अंजनीमाता जाई ।।

७९ मारीला लंकाचा रावण रक्ता भरली पायरी
सीता बोलती रामाला बरा मारीला वयरी ।।

८० सीताला सासूरवास काट्याच्या आण्यावर
जेवली सीतामाई चिंचाच्या पानावर ।।

८१ सीताला सासूरवास केला बाई गं बहू बहू
असा सयांना वाटून दिला तिनं गहू गहू ।।

८२ सीताला सासूरवास कवठाच्या कवठीमंदी
नाही गं भोगू दिला राम तिच्या नवतीमंदी ।।

८३ सीताला गं सासूरवास भरल्या गं तांब्यामंदी
नाही गं भोगून दिला राम होता जवानीमंदी ।।

८४ कैकयी, सुभद्रा नि कौशल्या त्या तिघी जणी सासा
अशी रामजीची सीता यांनी काढिली वनवासा ।।

८५ सीताबाई चालली वनवासा शकून पाहे पाण्यामंदी
रामासारीखा जोडा नाही भेटणार दुनियामंदी ।।

८६ सीताबाई बोलं तात्या वनवास सायना
चिंचाच्या पानावर मला जेवता येईना ।।

८७ लंकेचा रावण भिक्षा मागतो आळीत
रामाच्या सीतेला मग घालितो झोळीत ।।

८८ लंकेच्या रावणाची बाई नजर गं पापी
रामाची सीता काय तुझिया बापाची ।।

८९ मायावी मिरग गं असा झाडातूनी पळतो
सीताच्या चोळीसाठी राम शिकार खेळतो ।।

९० मायावी मिरग सीताच्या दारावरून गेला
सीता बोलती रामाला या रंगाची चोळी मला ।।

९१ सीताबाई बोलं धड नाही करमाचं
वाळूमंदी झरा याला पाणी धरमाचं ।।

९२ सीता चालली वनवासा आडव्या गेल्या गाई
सीतेला वनवास पाप्या रावणाच्या पायी ।।

९३ सीता नारी गरभीन तहान लागली वनात
लक्षुमनाने पाणी आनिले केळीच्या दुरणात ।।

९४ सीता नारीला वनवास आलाया कोण्या रीती
कपट्या रावणाला धर्म करावया गेली होती ।।

९५ सीता नारीचं कुंकू बारा वर्षे ताजं आता
अनुसयाला भेटली सीता वनवासा जाता जाता ।।

९६ लंकेच्या रावणाला मंदुदरी मारी हाका
सीता आनू नका संपत्तीला बसल धक्का ।।

९७ लंकेच्या रावणानं कपट इद्या केली
भीक मागून रामाची सीता नेली ।।

९८ सीताबाई भोळी भिक्षा वाढायाला गेली
रावण कपटी यानं सीता उचलून नेली ।।

९९ सीता पतिव्रता लक्षुमणाला कळली
भयाण वनात चाकं रथाची गळाली ।।

१०० आयोध्या गं नगरीत नगरीत पडलं ऊन
अशी वनासाला गेली दशरथाची जेठी सून ।।

१०१ आयोध्या गं नगरीत नगरीत पडला काळ
वनासाला गेले राजा दशरथाचे दोन्ही बाळ ।।

१०२ सीताबाईला वनवास डोंगरी खांदली न्हाणी
राम मारी बाण उकळ्या मारी पाणी ।।

१०३ सीताबाई वनवासी धुणं धुतीया वढ्याला
अंकुश कडंला लहू पाण्यात बुडाला ।।



१०४ येवढ्या वनामंदी गं कोण करीतं आई आई
बांधिले नेत्र दोन्ही तातोबा झाला दाई ।।

१०५ लक्ष्मण दिरा मनी कपटाई केली
माहेराची वाट वनमाळीची डावलीली ।।

१०६ सीता सांगे सासूरवास ऐक वान्हारबाई
सीताला सासूरवास गं कपट्या रावणाबाई ।।

१०७ सीता गरोधरीन इला महिना एक
रामाच्या बागात निवांत ना घेई सुख ।।

१०८ सीताबाई गरोधरीन इला महिना गं दोन
एवढ्या काशीखंडानामंदी जीवाचं नाही कोन ।।

१०९ सीताबाई गरोधरीन, इला महिना गं तिसरा
रामाच्या गं बागामंदी केला झाडाचा आसरा ।।

११० सीताबाई गरोधरीन इला महिना चार
रामाच्या गं बागामंदी असे हायीत अंजीर ।।

११२ सीताबाई गं गरोधरीन इला महिना पाच
रामाच्या गं बागामंदी पोथी निवात वाच ।।

११२ सीताबाई गं गरोधरीन इला महिना सहा
रामाच्या गं बागामंदी पिकला अंजीर पहा ।।

११३ सीताबाई गं गरोधरीन इला महिने सात
बोलती गं सीताबाई अशी मी वनासात ।।

११४ सीताबाई गं गरोधरीन इला महिने आठ
सीताच्या गं झोपडीहून मारवतीची वाट ।।

११५ सीताबाई गं गरोधरीन इला महिने नऊ
जन्मले अंकुश दिवा काशीला गं लाऊ ।।

११६ अरुण्या वनात वड हायी घोटुळ्या पानाचा
सीताच्या गं मांडीवरी पुत्र खेळतो रामाचा ।।

११७ राम गं कुंडावरी मोत्यायाचा झाला सडा
सीता गेलीया ना आंघोळीला तिचा बुचूडा सुटला ।।

११८ राम गं कुंडावरी जसी नागीन पसरली
सीता गेलीयाना आंघोळीला चंद्रहार इसरली ।।

११९ मंदोदरी बोलं घाल सीता माझी नथ
तुझ्या रामाच्या परास बघ रावणाची रीत ।।

१२० सीता बोलं मंदोदरी तू गं येडी येडी
तुझ्या रावणासारखे हायीत रामाघरी गडी ।।

१२१ अशी सीताबाई म्हणं तू तं माझी सकइशी
बाई तुझ्यासारीख्या माझ्या रामाघरी दासी ।।

१२२ मंदोदरी बोलं घाल माझा येळा
तुझ्या रामाच्या परिस बघ रावणाचा मळा ।।

१२३ मंदोदरी म्हणं आपण सख्या गं बहिणी
रावणाच्या गादीवरी राज्य करू दोघी जणी ।।

१२४ मंदोदरी शिकीती रावणाला शानपणा
घाला सीताला नेऊन नही येत लहाणपणा ।।

१२५ मंदोदरी म्हणं रावण नवतीच्या भरात
अशी आगीची पेटी सीता घातली घरात ।।

१२६ रावण म्हणं मंदोदरी तू गं माझी रानी
सीताला आण वाड्याला घालूनी मोहिनी ।।

१२७ मंदोदरी म्हणं सीता आपण बहिणी होऊ
सोनियाची लंका राज्य रावणाचं पाहू ।।

१२८ मंदोदरी म्हणं सीता ले गं माझे जोडे
सोन्या सवर्णाचे माझ्या रावणाचे वाडे ।।

१२९ मंदोदरी बोलती रावणा माझ्या वरा
रामाची आणली सीता इगीन आलं घरा ।।



१३० वदली सीतामाई आणियली केसाची येणी
सासू ईची कैकाई माता सुखी झाली मणी ।।

१३१ वदली सीतामाई आणियला हिता हात
सासू ईची कैकाईमाता घरी जेवती दहिभात ।।

१३२ वदली सीताबाई आणियला ईचा डोळा
रामाईचा जोडा रडं खळखळा ।।

१३३ सीता सांगे सासूरवास ऐक राम जोड्या
सासू ईची कैकाईमाता वाजी कवाडाच्या कड्या ।।

१३४ आरुण्या वनामंदी गं दिवा जळतो लोण्याचा
आपाट्याला गं झोका सीताबाईच्या तान्ह्याचा ।।

१३५ आरुण्या गं वनामंदी कोन करी जू जू
सीताबाई म्हणं लव-अंकुश बाळा जाय निजू ।।

१३६ सुगरण गं सीताबाई केला वाळूचा भात
ऋषीच्या रे पंगतीला जोड मारवती हात ।।

१३७ सुगरण गं सीताबाई केल्या वाळूच्या शेवाया
ऋषीच्या रे पंगतीला चल मारवती जेवाया ।।

१३८ आताच्या गं युगात पतिव्रता नार कोण
सीताच्या गं न्हाणीवर जेवले नारायण

१३९ सीताला सासूरवास कैकयी नाक्याला
असा वनास भोगून राम लक्ष्मण येई नगरीला ।।

१४० सूपभर मोती दान घेईना वयरी
बोलती सीतामाई व्हय वाड्याच्या बाहेरी ।।

१४१ बाई सीता वधायला सूर्य तळी केली मान
वध लक्ष्मण दिरा तुला कैकयीची आण ।।

१४२ बाई सीता वधावया सूर्य तळी केली माथा
वध लक्ष्मण दिरा तुला सोड माया आता ।।

## iii) मारुतीरायाच्या ओव्या

१ अंजनी म्हणती माझा मारूती बाळसं
असे हालविले चारी लंकेचे कळसं ।।

२ अंजनी म्हणती माझा मारूती ठकडा
आनी धुरनागीरी झाला पायात वाकडा ।।

३ अंजनी म्हणती माझा मारूती लहाण
लंकेवरी जाऊनी जोडी रावणावरी बाण ।।

४ अंजनी म्हणती माझा मारूती बळी
लंकेच्या रावणाची केली याने चेंडूफळी ।।

५ मारूती राजा पोरामंदी खेळू नको
सेंदरी लाल झगा मातीमंदी लोळू नको ।।

६ सकाळी उठूनी मी सहेज गेले बाहेरी
नदरं पडली मारूतीरायाची ती पायरी ।।

७ पहाटाच्या पाहाऱ्यात जागी झाली सारी दुनिया
देव मारूतीच्या दर्शनाला जाई सारी समुदाया ।।

८ कापराचा वास येतो माझ्या दाराला
राजा मारूतीला आरती नेल्ही गुजराला ।।

९ कापराचा वास मला येशीमंदी आला
राजा मारूतीचा अभिषेक कोणी केला ।।

१० पहाटच्या पारी राम राम कोनी केला
राजा मारूती भाग्यवंत जागा झाला ।।

११ मारवती मारवती तुला हाका मारू किती
आसे तुझ्या चरणावरती केस कुरुळे लोळती ।।

१२ मारूती राजा माझ्या वाड्याच्या भुजाला
दहा हाताची पासुडी कुणी लाविली धजाला ।।



१३ मारूती देवा माझ्या धर्माच्या भावा
डोईवर पाण्याची घागर मी अवघडले देवा ।।

१४ मारूती म्हणे अंजनी माझी माता
आणली द्रोणागीरी नेत्र उघडूनी पाही आता ।।

१५ मारूती म्हणं किती समजू राजाला
लावला हात माझ्या पडल्या ओझ्याला ।।

१६ मारूतीचं देऊळ ओल्या केसानं झाडीन
असे मह्या राघुचे नवस केल्याले फेडीन ।।

१७ गाव चिचपूरी मारवती किती खुजा
नेणंत्या माझ्या बाळा पाणी घाल दुही भुजा ।।

१८ राजा मारवती मह्या बंधुचा मैतार
पांघराया देतू आंगावरील धोतार ।।

१९ राजा मारवती मह्या बाळा तुझा चेला
पांघराया देतू असा आंगावरील शेला ।।

२० राजा मारवती माझ्या बाळाचा संगती
असा पांघराया देतू आंगावरील बनाती ।।

२१ येशीमंदी कोन गं बाई नांदतू दुरूस
राजा ना मारवती बीन नारीचा पुरुस ।।

२२ देवामंदी देव हायी मारूती खरा
ठावं नाही याला आस्तुरीचा वारा ।।

२३ राजा मारवती पाण्याच्या डगरीला
माझा नमस्कार पहिल्या घागरीला ।।

२४ येशीमंदी उभा येशीबाई तुझा पती
सेंदरी लाल झगा नाव त्याचं मारवती ।।

२५ राजा मारवती तुझ्या पायरीला सोनं
दर्शनाला आले असे जोडीचे पहिलवान ।।

२६ राजा मारवती शेंडी तुझी सेंदराची
शोभा देती वर फांदी लिंभेऱ्याची ।।

२७ राजा मारवती ब्राह्मणाच्या देवा
असा माळी करितो तुझी सेवा।।

२८ राजा मारवती चल माझ्या वाड्या
सेंदरी लाल पुड्या टाकीन पाय घड्या ।।

२९ मारवती राजा झोपल्याला जागा होय
बंधवाच्या माझ्या एकल्याच्या मागं जाय ।।

३० सकाळी उठुनी मला गं येशीकडे जानं
राजा गं मारवतीची मह्या लालाची भेट घेनं ।।

३१ सकाळी उठुनी हात बाई कवड कडीला
सोन्याचा कळस गं मारवतीच्या माडीला ।।

३२ मारवती राजा पायी घाल ना पायतान
रस्त्याला लाग तू वाड्यानी माझ्या आयचान ।।

३३ अगं सकाळच्या पहारी कोण करी हरीऽऽ हरी
मारवती पारावरी पक्षी बोलं गं झाडावरी ।।

३४ सकाळच्या पहारी बारवबाई हेलकावली
राजा मारूतीनं आंघोळ ब्राह्मणानं केली ।।

३५ सकाळच्या पहारी कोण करतं हरी हरी
मारूती धुई तोंड बारवाच्या चिऱ्यावरी ।।

३६ अशी मारूतीची सेवा येती लान्हुल्या मुलाला
बाळा माझ्या प्रसादा जाय जाईच्या फुलाला ।।

३७ बाई माझ्या अंगनातून कोण गेलं झपाट्यानी
अगं राजा मारवती गस्त घाली मुकाट्यानी ।।

३८ बाई पहाटच्या पहाऱ्यात रांजून माझा वला वला
अगं राजा मारवती गस्तीवाला पाणी प्याला ।।



३९ अरे मारवती राजा पाया घाला पायतान
गस्त घालावया वाड्या माझ्या आयचान ।।

४० देवामंदी देव मारवती राजा भोळा
बाई याच्या आरतीला कापूर लागं दीड तोळा ।।

४१ बाई कापराचा वास येतू माझ्या पदराला
अशी आरती गं केली मारवती गुजराला ।।

४२ शेजीचा शेजार मला आधार पाण्याचा
एवढा राजा मारवतीचा मला पाठुंबा वाण्याचा ।।

४३ मारवती देव लंगडा कशाने झाला
माझ्या देवाला ईघ्न बाण देवाने मारीला ।।

४४ अशी अंजना म्हणती गं मारवती ब्रह्मचारी
आनियली द्रोणागिरी त्यानी तळहातावरी ।।

४५ अंजना म्हणती माझा मारवती लहानबाई
यानं उचलले धनुष्य चारी गं बाण बाई ।।

४६ वाजत गाजत केलं गं अंजना नारीनं
तळहातावरी पिंड आणून टाकिला घारीनं ।।

४७ अगं माता आंजनी ती गं उन्हात
बाई राजा मारवती मोती जन्मला कानात ।।

४८ सकाळच्या पहारी मी गेले शेत पेरायला
राजा मारवती अंजनाबाईच्या गं कडाला ।।

४९ अंजना म्हणती माझा मारूती शहाणा
बारा वर्ष झाले रामासंगे भावपना ।।

५० अंजनाबाईची पिवळी गं इची कुशी
जन्मले मारवती आमवस्या पुनवेच्या दिवशी ।।

५१ अंजनी म्हणती मारुती हा डोळस
लंकेवरी जाऊनी हाली लंकेचा कळस ।।

५२ अंजनी म्हणती मारवती माझा लहाण
बाई लंकेवर जाऊन याने मारीला रावण ।।

५३ बाई अंजनी म्हणती मारूती माझा बाळ
लंकेवर जाऊन झाला रावणाचा काळ ।।

५४ मारुती मारुती हाका मारीती अंजना
रामाला घेऊनी या लौकर भोजना ।।

५५ अंजनी माताला पुत्र झाला एक
राजा रामरायाचा झाला सेवक ।।

५६ बारा वरसाचा उपवास माता अंजनीने केला
राजा मारुती म्हणूनी काय ब्रह्मचारी झाला ।।

५७ बारा वर्षाचे तप माता अंजनी उपासी
जन्मले मारवती चैती पुनवेच्या दिवशी ।।

५८ माता अंजनीनं किती गं केलं पुण्य
राजा मारवतीवाचून एक गाव नाही सुनं ।।

५९ मारुती न्हाला पूर शेंदूराचा गेला
अंजनीचा पोटी मारुती ब्रह्मचारी झाला ।।

६० राम लक्ष्मण दोघीचे दोघेजन
राजा मारवती अंजनीचा पहिलवान ।।

६१ अंजनी म्हणती मारवती येडा झाला
जन्माला येऊनी वंश याने बुडविला ।।

६२ अंजनी मातेला पुत्र होयाचा कह्याचा
सुटुनी पडला पिंड घारीच्या पायाचा ।।

६३ अंजनी माता बोलं तान्हा मारवती बाळात्यात
द्रोणागिरी पर्वत त्यानं बाई आनला तळहातात ।।

६४ अंजनी माता म्हणती मारवती मोठा बाका
अशी पेटवूनी लंका रावणाला मारी हाका ।।



६५ अंजनी म्हणती मारवती माझा बळाचा
आणिला द्रोणागिरी ठाव पाहिला तळाचा ।।

६६ येशीच्या बाहेर कोन पहिलवान आला
देव मारवती दूध अंजनीचं पेला ।।

६७ बारा वरीस तप माता अंजनीनं केलं
राजा मारवती सारखं रत्न अंजनीबाईला घावलं ।।

६८ घारीनं दिला पिंड माता अंजनी जवळ
जन्मले मारवती हाती बाणाची कवळ ।।

६९ माझीया कार्याला, तुम्ही मारवती यावा
पान सुपारीचा पहिला मान घ्यावा ।।

७० मारुती, मारुती किती सुंबारू राजाला
लावावा ती हातात माझ्या पडत्या ओझ्याला ।।

७१ राजा मारवती जन्मला कोण्या येळी
जन्मला कोण्या येळी संगं वानराची टोळी ।।

७२ सरलं दळण पीठ भरीते वाटीत
सोन्याचा ताईत बाई मारुतीच्या मुठीत ।।

७३ सरलं दळण पीठ भरीते थाळ्यात
सोन्याचा ताईत मारुतीच्या गळ्यात ।।

७४ यज्ञाच्या पंगती कढीला तेज भारी
अंजनीचा हनुमान जेवतो ब्रह्मचारी ।।

७५ राम-लक्ष्मण बाई जडिताचे मोती
राजा मारुती पवळ्या तुला लाली किती ।।

७६ पहिली गं माझी ओवी कोनाला गाऊ बाई
राजा मारवतीला गं बहिण नाही बाई ।।

७७ दुसरी माझी ओवी मारवतीच्या आईला
जाईच्या फुलाची चोळी अंजनाबाईला ।।

७८ तिसऱ्या ओवीचं गं नाही राहिलं धोरण
जाईच्या फुलाचं गं मारवतीला तोरण ।।

७९ महादेव पार्वती विठ्ठल ना रखमाबाई
पृथ्वी धुंडिल्याने जोडा मारवतीला नाही ।।

८० मारवती राजा येते तुह्या दर्शनाला
वटी पुत्र हाती धरी बिबिसेनाला ।।

८१ अंजना म्हणं बाई माझा मारूती एकला
वानर फौजा घेवूनी येढा लंकेला टाकला ।।

८२ राजा मारवती ना बेईमानी झाले लोक
सकाळी उठून दर्शनाला येईना एक ।।

८३ बाई आड लंकेवरून पल्याड केवरी गेला
रामाच्या सितेचा शोध मारूतीनं केला ।।

८४ आरं राजा मारवती धरीन तुझे पायी
आधी करा माझी सोयी मग आंघोळीला जायी ।।

८५ लक्ष्मणला शक्ती भोक पडले उराला
राजा मारवती गेला द्रुणागीरी आणायला ।।

८६ लक्ष्मणाला शक्ती राम झालेत घायाळ
द्रोणागीरी आणाया जाईन आंजनीचा बाळ ।।

८७ लक्ष्मणाला शक्ती राम झाले चिंतागती
द्रोणागीरी आणाया बाळ अंजनीचे जाती ।।

८८ लक्ष्मणाला शक्ती झाला लंकेत कालवा
बोलन राजा मारवती शेषण वैद्य बोलवा ।।

८९ पहिल्या गं ओवीचं नाही राहिलं धोरान
राजा मग मारवतीला गं वई गाते मी फिरून ।।

९० दुबळं गं पन याला जन लागलं हसाया
राजा मग मारवती गं जाते विचार पुसया ।।

९१ राजा मग मारवतीचं बाई मी धरीते धोतार
आधी कर माझी सोयी रं मग पायऱ्या उतर ।।

९२ राजा मग मारवतीचं बाई मी धरीते बोट
आधी कर माझी सोयी रं मग आंघुळीला उठ ।।

९३ सकाळी उठुनी मला एक लाभ झाला
राजा मारवती देव मह्या मुखी आला ।।

९४ पहाटाच्या पहाऱ्यामंदी कोंबडा बाई आरवला
मारवती देव अंघोळ करी बारवाला ।।

९५ अंजना म्हणती मारूती माझं मूल
गळ्यामंदी बाई रूई सजनीचं फूल ।।

९६ बाई देवामंदी देव देव मारवती किती धट
असा घेतला जलम अंजीनीच्या कानावाटं ।।

९७ राजा मह्या रं मारवती यावं माझ्या वाड्या
शेंदराच्या ना पुड्या बाई टाकिते मी पायघड्या ।।

९८ बाई गावाच्या गं खालती राजा मारवतीच नगर
अशी मी जाते दर्शनाला डोई पाण्याची घागर ।।

९९ येशीमंदी उभा येशीबाई तुझा पती
अंगी शेंदराची उटी नाव याचं मारवती ।।

१०० येशीमंदी उभा येशीबाई तुझा कंथ
अंगी शेंदराची उटी नाव याचं हनुमंत ।।

१०१ बाई गावाच्या खालती राजा मारवतीचं ठाणं
अशी जाते दर्शनाला माझ्या खांद्यावर धुणं ।।

१०२ राजा मारवती गं आधी होता काळा
रामाच्या सीतासाठी शेंदरी ल्येला टिळा ।।

१०३ राजा मारवती तुझी शेंदराची कमान
वनसाच्या येळंला राहिला सीताला राखान ।।

१०४ जाईच्या फुलाचा कसा सुगंध सुटला
बाई त्या मारवतीचं देऊळ हायी पाण्याच्या वाटाला ।।

१०५ गावाच्या खालती ध्वज फडकतो कुणाचा
राजा मारवती शिष्य नांदतो रामाचा ।।

१०६ हनुमंत बळी दाढी रावणाची जाळी
वानरांची तोंडं झाली सारी काळी ।।

१०७ राजा मारवती तुझी पायरी सोन्याची
दर्शनाला आली जोडी कुणा पहिलवानाची ।।

१०८ राजा मारवती तुझा वाटंवरी झेंडा
कशी पडू पाया डोयीवरी माझ्या हंडा ।।

१०९ राजा मारवती तुझं वाटंवरी हाई ठाणं
कशी पडू पाया खांद्यावरी माझ्या धुणं ।।

११० राजा मारवती तुझी वाटंवरी काठी
कशी पडू पाया डोयी भाकरीची पाटी ।।

१११ बाई शेंदराची पुडी सापडली पाण्या जाता
राजा त्यो मारवती आंघोळीला गेला व्हता ।।

११२ लंकेच्या बुरुंजवरी कोण बसला अवगुणी
सीतामाईच्या शोधासाठी लंकेची केली धुळधानी ।।

११३ लंकेच्या बुरूंजावरी देव मारवती राखन
सीतामाईचा शोध लागला मंदोदरीच्या मुखानं ।।

*



### प्रकरण तिसरे

# महाभारत व श्रीकृष्ण संदर्भातील ओव्या

## i) कृष्णाविषयीच्या ओव्या

१ अशी पोथीमंधी पोथी ज्ञानेश्वरी अर्थ खोल
असे ओळखू येईना कृष्ण अर्जुनाचे बोल ।।

२ अशी पोथीमंधी पोथी अर्थासहीत भागवत
असं ओळखू येईना कृष्ण अर्जुनाचं नातं ।।

३ अगं भक्ती म्हणू भक्ती वळखू गं कोण्यापरी
असा गं इनयितू शालू कृष्ण कबीराच्या घरी ।।

४ काय सांगू बाई गं गोकुळीच्या हाती गती
कृष्ण बाळ पाळण्यात गं गवळणी झोका देती ।।

५ यशोदाबाई गं हरि तुझा करीतो चोरी
बगशीले दही दूध ताक वती मोरीवरी ।।

६ यशोदाबाई हरी तुझा कोणावाणी
सावळं रूप याचं जवसाच्या फुलावाणी ।।

७ यशोदाबाई हरी तुझा रिंगतो रांगतो
माम्या मावश्याला काय होईक सांगतो ।।

८ यशोदाबाई तुझ्या हरीला सांग काही
गवळ्याच्या सूना पाण्याला जाऊ देत नाही ।।

९ यशोदाबाई आईक तुझ्या हरीच्या रंगड्या
गवळ्याच्या राहीच्या यानं फोडील्या बांगड्या ।।

१० यशोदाबाई आईक तुझ्या हरीचं गाऱ्हाणं
गवळ्याच्या राहीचं लुगडं फाडीलं हरीनं ।।

११ यशोदाबाई हरी तुझा छंदीफंदी
गवळ्याच्या सूना कोंडीयल्या बागांमंदी ।।

१२ बाई यमुनेच्या तिरी कृष्ण खेळं सारंगपाट
डोई पाण्याच्या घागरी उभा गवळ्याचा थाट ।।

१३ यमुनेच्या तिरी कृष्ण खेळं सारंगदोरी
डोई पाण्याच्या घागरी उभ्या केल्या गवळ्याच्या नारी ।।

१४ भविक अंगी याच्या खोडी राधा गवळण येडीली
अरे तू सोड सोड कान्हा नथ सरजाची मोडली ।।

१५ अरे सोड सोड कान्हा पदर साडीचा फाटला
मंदियारी तान्हं बाळपणा जीवबंदी दाटला ।।

१६ गोकूळ मथूरा क्रिष्ण देवाचं ठिकाण
उघड रे पाप्या जीवा हरीनामाचं दुकाण ।।

१७ यशोदाबाई हरीची आईक गं लिला
फेडी गोपिकांचे वस्त्र गं कृष्ण कळंबावरी गेला ।।

१८ यशवदाबाई असं तुझं अवखळ गं कारटं
अगं पाणीयाच्या वाटं यानं पेरीलं सराटं ।।

१९ गाई म्हशी आल्या नंदन माझा आला नाही
अगं यमुना नदीला पवा इसरला बाई ।।

२० अगं कृष्णानं पवा पवा वाजवला नवा
अशा घाबऱ्या झाल्या करी गवळणी धावा ।।

२१ यशवदे बाई तुझा गं कान्हा तुला लई गॉड
गोपी गं गवळणीचं लागुनी गेलं याड ।।

२२ यशवदे तुझा गं कान्हा तुझा तुला आवडतो
राधा गवळणीला गं आडा रस्त्यामंदी होतो ।।

२३ यशवदे तुझा कान्हा लिला दावतो दुरून
झोपल्या गं गवळणी दिले मुंगूस सोडून ।।

२४ गोकूळ नगरात गं श्रीकृष्णाचं बारसं
चला गं बायानू वानाला लिंब नारळाचा रस ।।

२५ अगं फळाच्या दोन्ही आन्या बराबरी
माझ्या दुबळीच्या घरी कधी येतान श्रीहरी ।।

२६ यशवदाबाई तुझा हरी मोठा थोर
बाई गवळ्याच्या राहीचा यानं नेला रहीवर ।।

२७ गोविंद गोड बोल्या वाट सोड तू हाटील्या
अशा रे मथुरी हाटच्या मह्या संगतीनी गेल्या ।।

२८ सकाळी उठून हात कवाड बाईला
नदर पडला दारी कृष्ण रांगता पाहिला ।।

२९ आवडले बाई पांडव भक्तीच्या भावानं
अर्जुनाच्या रथाला वारू जुपिले देवानं ।।

३० गोकुळीचा कृष्ण गेला अरणावतीला पाहुणा
बहीण सुभद्रा देऊन केला अर्जुन मेव्हुणा ।।

३१ यशवदेबाई गं हरी तुझा मोठा होता लहान झाला
राधिकेच्या मंद्यारी क्रिष्ण रांगायला गेला ।

३२ द्रौपदीनं धावा केला घाई घाई
द्वारकेचा हरी रथ टाकूनी आला पायी ।।

३३ राजस यज्ञ राजा धर्मानं केला
सोन्याच्या रथामंदी द्वारकेचा राणा बसविला ।।

३४ यज्ञाच्या पंगती कढी दिसते पिवळी
द्वारकेचा हरी असा जेवतो गवळी ।।

*

## ii) पांडवांविषयीच्या ओव्या

१ एकुलतं एक नका म्हणू पांडवाला
कारल्याचा वेल गर्दी झाली मांडवाला ।।

२ लेकराची मेली आई लेकराची परवड
पाची पांडवाची कथा मोठी अवघड ।।

३ इरीटाच्या घरी चाकरी कोण कोण
असं पाची पांडवाचं कूळ रूपवान ।।

४ इरीटाच्या घरी धर्मराज संध्या करी
पाचा भावामंधी भिमाला बळ घाली ।।

५ पाची पांडव हो गेले वनवासाला
सापडली द्रोपदी धाकट्या अर्जुनाला ।।

६ पाची पांडवात धर्मराज पुण्यशील
अर्जुनाच्या रथावर रामराव धर्मनीळ ।।

७ भावा भावाचा इचार आहे पांडवा घरी
सोन्याची छत्री अर्जुन भिमावरी धरी ।।

८ अशी पंचवटीवरी कोणी उभारली धजा
आंघोळीला गेले पाची पांडव धर्मराजा ।।

९ अशी पंचवटीवरी ओल्या धोतराची घडी
आंघोळीला गेली पाची पांडवांची जोडी ।।

१० पाची पांडवाचं कसं बसलं चकुट
सांगते सयाला मुकादमाला पागुटं ।।

११ द्रोपदीचं पण नगरीचे राजे आले
पण जिंकीली पांडवानं कौरव माघारी गेले ।।

१२ अवघी जडतीचा खांब पांडवाच्या मंडपाला
हासती द्रोपदी राग कौरवाला आला ।।



१३ सोन्याच्या नांगरानं पृथ्वी नांगरली
पाची पांडवानं जागा यज्ञाला केली ।।

१४ भीम बोले अर्जुन तू जावं द्वारकेला
द्वारकेचा हरी माधव आणावा यज्ञाला ।।

१५ रुक्मिणीच्या मुखाकडं पाहून हसं चक्रपाणी
पांडवाच्या यज्ञाला तुम्ही या हो साऱ्या जणी ।।

१६ सोन्याच्या नांगरानं आला दुनियेला येडा
राजे या धर्माच्या यज्ञाला जागा सोडा ।।

१७ धर्म बोलं अर्जुनाला त्वा जावा द्वारकेला
लक्ष कोटी यादवा घेऊन यावा यज्ञाला ।।

१८ द्वारपती सांगं निरोप लागं अर्जुनाच्या कानी
निरोप बाई द्वारकेचा हरीला आनंद मनी ।।

१९ आगं ती मंडपाल छप्पन कोटी ब्राह्मण येती
राजीया धर्माच्या हाती कंकान बांधती ।।

२० अगं ती मंडपात छप्पन कोटी ब्राह्मण येती
राजीया धर्माच्या जानुळ्याला गाठी देती ।।

२१ अगं स्वरगावर घंटा वाजं राहू राहू
राजस यज्ञाला तेहतीस कोटी आले देवू ।।

२२ अवघ्या स्वर्गी घंटा वाजे टाळटाळ
राजाया धर्माला यज्ञ गेलाय सुपाळ ।।

२३ सोन्यायाची नांगरानी नांगरले केळी खांब
धर्मराजा तुमच्या घरी झालाय यज्ञाला आरंभ ।।

२४ सोन्यायाच्या नांगरानी नांगरीला चांदीचा घासरा
धर्मराजा तुमच्या घरी झालाय यज्ञाचा पसारा ।।

२५ बंधुराजाला निरोप दिला नारदाच्या हाती
राज्याच्या गं यज्ञाला यावा रातूराती ।।

## iii) द्रौपदीच्या ओव्या

१ द्रौंपती बाईला पाच रंगाची कासई ।।
दुर्योधन म्हणं अशी अस्तुरी आसई

२ दुरपती नेसली नऊ लाखाची सेंदरी
कपटी दुरेधन आले डोळ्याला आंधारी ।।

३ साखर मणुक्याची रुक्मिण करते शिदोरी
द्रोपदीला मुळ नारायण गेले घरी ।।

४ रुक्मिणी म्हणती जा द्रोपदीला आणायला
लागली तिन महिणें रथ खिडक्याचा विणायला ।।

५ रुक्मिणी वाडीती भोजन निर्स दुधावर खिर
बोलती रुक्मिणी जेवा द्रोपदी धन्यवर ।।

६ द्रोपदी म्हणती देवा तुम्ही येताल कव्हा
बोलले भगवान माझा धावा करशील तव्हा ।।

७ द्रोपदीने धावा केला ये जेवता
सख्या माझ्या विठ्ठलाची कंठी तुटली धावता ।।

८ बळीराम म्हणं दादा यज्ञाला जाऊ
द्रोपदी बाईला जोडवं आहेर केले पाऊ ।।

९ पुजाची परात धर्मराजाच्या हातात
अशी शोभा देती द्रोपदी मंडपात ।।

१० द्रोपदीची लज्जा लज्जा घेऊन भागले
यशोदाराया तिचे बंधू दिंड कैलासी लागले ।।

११ द्रोपदीची लज्जा काय लुटशील गड्या
कृष्णाने पाठविल्या नवरंगाच्या चुनड्या ।।

१२ यज्ञाच्या पंगती वाढती द्रोपदी
वरून देव बघती जशी वीज चमकती ।।



१३ गांजिली द्रोपदी वेणी धरून केसाला
पुसती भिमराज दुसऱ्या सैन्याला ।।

१४ गांजिली द्रौपदी नेली चावडीच्या कोना
बंधू हिचे यादवराव खाली घातल्या माना ।।

१५ द्रोपदीच्या मिऱ्या काय आसडीतो
येड्या बंधू हिचे यादवराव मागुन वस्त्र पाठवितो ।।

१६ द्रोपदीच्या मिऱ्या आसडू आसडू भागले
बंधू हिचे यादव दिंड कैलाशी लागले ।।

१७ अगं यज्ञाच्या पंगती द्रोपदी झाली येडी
कोणी मागतंय भातपोळी कोन्ही मांगतय कढी ।।

१८ अगं यज्ञाच्या पंगती द्रोपदीची तारांबळं
कोणी मागतंय भातपोळी कोणी मागतंय डाळ ।।

१९ अगं यज्ञाच्या पंगती वाढ द्रोपदीला दंड
हातामध्ये गदा भिम पंगतीला हिंड ।।

२० यज्ञाच्या पंगती पंगत दुष्टाची बसली
द्रोपदी बाईच्या चोळीची गाठ सुटली ।।

२१ अगं यज्ञाच्या पंगती द्रोपदीची लगबग
सावळे पांडुरंग द्रोपदीला वाढू लागं ।।

२२ अगं यज्ञाच्या पंगती द्रोपदीची तारामळ
सावळे पांडुरंग गळ्या टाकी मौन माळ ।।

२३ अगं यज्ञाच्या पंगतीला वाढ द्रोपदीनं केली
सावळे पांडुरंगा त्वा त पाठ थापटीली ।।

२४ ऋषी बसले पंगती जेवाया भोजनाला कमी नाही
राजस यज्ञात ऋषी गणना नाही ।।

२५ शिनली द्रोपदी देव थोपटीतो पाठ
राजस यज्ञात ऋषी जेवले लक्ष्य साठ ।।

२६ कापली करंगळी कृष्ण देवा धिर धर
बहिण द्रोपदीनं फाडीला पितांबर ।।

२७ रुक्मिण म्हणं देव माझा गुजरा
द्रोपदी आणा सण दिसं साजरा ।।

२८ द्रोपदी नेसली पाच लाखाची शेंदरी
पाची पांडवांच्या डोळ्याला आली अंधारी ।।

२९ पिवळा गं पितांबर मोत्यायाचे गं घस
द्रोपदीची गं बोळवण करीतू गं सावकास ।।

३० पिवळा गं पितांबर याला गं मोतीयाची जाळी
द्रोपदीची गं बोळवण देव करीतो संध्याकाळी ।।

३१ पिवळा गं पितांबर गं द्रोपदी तुला कुठून
गेले होते द्वारकेला आले हरीला भेटून ।।

३२ द्रोपदी बाईला सखा गं बंधू नाही कुठं
पिवळा पितांबर येतू द्वारकीच्या वाटं ।।

३३ सरलं गं दळण जाऊन द्रुपदीला सांगा
हारीच्या नामाची आरती म्हणू लागा ।।

३४ यज्ञाच्या पंगतीला द्रोपदी वाढी दाळ
सोन्याचं गंगाजल चांदीचं वरंगाळ ।।

३५ यज्ञाच्या पंगतीला द्रोपती वाडी भात
वसुदेवा तुझं बाळ पाठी सूर्य उभं होत ।।

३६ सिनगारीला बाई रथ देव बसलं दुरला
अवघी द्रुपतीला मुळ गेलं हस्तीनापुराला ।।

३७ म्होरं पळयीतू रथ मांग उडयती धूळ
बोलती गं रुक्मिण गेले द्रुपदीला मूळ ।।

३८ असा शिणगारीला रथ आरण्यावतीच्या शिवारी
बोलती धुरपती आला माझा कैवारी ।।



३९ द्रुपताबाईची सासू बोलं नही धाडायाची
धर्म माझा घरी नाही पुस घ्यावी अर्जुनाची ।।

४० आंघुळ करून देवा बसले भोजना
आणावी गं माहेराला दुरपती सजना ।।

४१ सोन्याचा गं लगाम धर्मराजाच्या हातात
आधी बस दुरपता मग बसतू सावूळा रथात ।।

४२ असा शिणगारीला रथ आरणावतीच्या रानात
दुरपतीनी ओळखीली हिरव्या शालूची बनात ।।

४३ अरुणावतीच्या येशीला दंगा कशीयाचा झाला
धर्मबोल अर्जुनाला बंधू दुरपतीचा आला ।।

४४ आधी बसं दुरपता मग बसं सावळा
दोहीच्या गं सुरूपानी रथ दिसतू पिवळा ।।

४५ बाई चाफ्याची फुलं धर्मराजाच्या हातात
दिसती ते शोभिवंत दुरपती मंडपात ।।

४६ आभिमानाचं लग्न दुरपती गं करवली
एवढा सोन्याचा गं करंवडा मारवतीच्या पारावरी ।।

४७ द्रोपदीच्या मिऱ्या दुर्यधनानी फेडील्या
तरूतरूच्या चुनड्या पांडुरंगाने धाडील्या ।।

४८ दुरपतीच्या मिऱ्या कोण आसडू लागले
इच्या सत्वाने दिंड कैलाशी लागले ।।

४९ अग साळीचं तांदूळ गं दोही आन बरोबरी
अग यदवा पाहुणा रे दुरपतीच्या गं बाई घरी ।।

५० विठ्ठल करी गोष्टी ऐका दुरपता निवळ
ऐका दुरपता निवळ आला बाजार जवळ ।।

५१ द्रोपदी नेसली लाल रंगाची साडी
इच्या तरी पदरावरी दुरेधन शिल काढी ।।

५२ ती दुरपती नेसली लाल रंगाची सेंदरी
खाली पाह्य दुरेधना डोळ्यावर येईल अंधरी ।।

५३ ती दुरपती नेसली लाल रंगा सूर्यपन
इच्या पदराला पाहून दंग झाले दुर्येधन ।।

५४ दोहूनी दोहूनी दिली खांबायाला पाट
द्रोपदद्याबाई कर जेवायाला ताट ।।

५५ रुक्मिणीनी केल्या निरशा दुधाच्या शेवया
बोलतू विठ्ठल चल द्रोपदद्याबाई जेवया ।।

५६ कापली गं करंगळी रक्ता लागलीया धार
सखी बहिण सुभिद्रा चिंधी देईना बोटभर ।।

५७ कापली गं करंगळी रक्ता भरली मोट
सख्खी बहिण सुभिद्रा चिंधी सापडना कोट ।।

५८ गांजली गं धुरपता इला ना सभेमंधी आना
असे पाची पांडवानी गं खाली घातील्यात माना ।।

५९ गांजली गं धुरपदा गांजून गं उभा केली
गांजून गं उभा केली लाज पांडवाची गेली ।।

६० गांजली गं धुरपता गांजीले गं कोण कोण
गांजीले गं कोण कोण लज्जा घेतो दुशासन ।।

६१ गांजली गं धुरपदा गांजीते गं दोघं दोघं
अशी इच्या लज्जासाठी भगवान पाठीमागं ।।

६२ गांजली गं धुरपदा साती जन्माच्या लावून
कृष्णदेव तिचे बंधू आले बैरागी होऊन ।।

६३ गांजली गं धुरपदा गाठ चोळीची सुटली
धावा धावा कृष्णदेवा सभा वैऱ्याची दाटली ।।

६४ गांजली गं धुरपदा गांजीतेत गं कोण वयरी
असं जरीचं पातळ आता नेसती दोहेरी ।।



## प्रकरण चौथे

# शिवसंदर्भातील ओव्या

## i) शिवशंकर ओव्या

१ गांवतरी माझं वस्तीला सोवळं
गावाच्या खाली महादेवाचं देऊळ ।।

२ साली दळण सरती होऊ शहादेऊ
कापसाच्या जोती आरती जळू महादेऊ ।।

३ सरलं गं दळण सरता सेवू झाला
हौसाच्या खुरामधी काशीचा देवू आला ।।

४ काशिनाथ काशिमधी इशिनाथ पाण्यामंधी
काशिवानी तिर्थ नाही दुण्यामधी ।।

५ शंभू देव तो म्हातारा याची दाढी लोळती भुईला
गिरजा बोलती माईला कोन यवगी पाहिला ।।

६ शंभूदेव तो म्हातारा याची हालयती दाढी
बोलं गिरीजाची माय गिरजा केवड्याची काडी ।।

७ शंभूदेव तो म्हातारा याची हालयती मान
बोलं गिरीजाची माय गिरजा केवड्याचं पान ।।

८ शंभूदेव तो म्हातारा याची गळयती लाळ
बोलं गिरजाची माय गिरजा मसुराची दाळ ।।

९ गिरजा बोल मायीला कायी केला माझा सार
बोलं गिरीजाची माय शंभू शिकारावरी ।।

१०  आता सोकटीचा डावू याला सोनियाचे घोस
आला देवावरी डाव गिरजा मनामधी हासं ।।

११  शंभूच्या शिकरावरी चरत्यात ढवळ्या गायी
लाडाचे गिरजाबाई आंदण दिल्या कायी ।।

१२  शंभू शिकरीच्या वर बाई वरवर
चैत्री पुनवाला जतरा दिला नाही नाडीयाचा दोर ।।

१३  संभा संभा करता संभा नही घरी
असा बाई संभा गिरजा नारीच्या माहेरी ।।

१४  संभा संभा करता संभा नही दिसे
अरण्याच्या ठायी पोथी वाचीत बसे ।।

१५  संभा संभा करता संभा नही घरी
स्वारी गेली बाई गिरीजाच्या माहेरी ।।

१६  अशी कापराची ज्योत लावते इथून
कैलासाचा राजा मला पावतो तिथून ।।

१७  अशी कापराची ज्योत लावते मनात
कैलासाचा राणा पावतो वनात ।।

१८  आरती म्या केली आरतीत दिवा
गोरखापासून पहा चवऱ्याची हवा ।।

१९  पार्वतीला मागनं चंद्रसूर्य दोघं भाऊ
नको देवू पित्या त्यानं तप केलं बहू ।।

२०  संभा तुझी वाट वाकडी तिकडी
तुह्या दर्शनाला आली कोवळी काकडी ।।

२१  संभाच्या दर्शनाला यनं नव्हतं मनी
सपनी येऊनी कशी टाकली मोहनी ।।

२२  शंभूच्या शिखराला गिरिजा नार तोंड धुते
महादेवाची ती नार मला कुंकू ल्यायला बोलाविते ।।



२३  अशी चालताना बघुनि पद्मतळ्याला
बोलली गिरजा नार आला दवणा गळ्याला ।।

२४  शंभुदेव हाणी मोट, अर्ध्या चाकावरी
गिरजा नार दारं धरी पाणी दवण्याच्या रोपावरी ।।

२५  महादेवाच्या पिंडीवरी बेल वहाते फनगड्याचा
बाई पोटी पुत्र मागते कुरदुड्याचा ।।

२६  महादेव पारवती जोडा दोहीचा सगींन
महादेवाच्या संबुर गं पाच नंदीची दावन ।।

२७  महादेव म्हणं डोळे झाकून बसली
आत्ताच्या कलीमधी निळ दुन्याची नासली ।।

२८  शंकराचा नंदी देवळा बाहेरी
बंधवाच्या मह्या पांदन पडली दोहेरी ।।

२९  देव देवळी नंदी देवळ्याच्या माघ
आता माझ्याबाई सेवा मला करू लाग ।।

३०  चला जाऊ पहाया खांडनपतीला
भोळ्या माझ्या शंकरानं चंद्र माथ्यावर घेतीला ।।

३१  पारवती म्हणे कसं होईन महादेवा
पोटी नाही पुत्र कोण करीन आपली सेवा ।।

३२  आंब्याला आले आंबे चिंचिले आले घोस
गिरिजाले गेले दिवस संभा करीतो नवस ।।

३३  कितिक हाका मारू सांबा मह्या बापा
जाऊन बसला कुठं पहाळाच्या कुपा ।।

३४  गिरिजाबाईचा चुडा कशानं फुटला
चवसर खेळता हात दुमता पडला ।।

३५  काळ्या वावरात बाई गोऱ्हाची पांदन
गिरीजा ती बाई पाणी भरते गुंडानं ।।

३६ महादेव वाटानं रं ते मुंग्यांचं सैन्य चाले
महादेव भुयारातून बोले माझे भक्तजन ते आले ।।

३७ महादेवाच्या वाटं चालल्या पोरी सोरी
चौऱ्याच्या गडावरी झाली टिकल्याची चोरी ।।

३८ संभा संभा करता संभा समरत
अशी गाईची वासरं आली हुंबरत ।।

३९ शंकरानं जटा जटा आपटल्या ठायी ठायी
आगुचर गंगूबाई त्याला आवरली नायी ।।

४० महादेवाच्या पिंडीवरी बेल वहाते ताजा ताजा
बाई पुत्र मागुनी गेला सजन गं माझा ।।

४१ रुसला शंभू देव जावूनी बसईला तळ्याकाठी
पिरतीची ती गिरीजा जाऊन घाली गळ्या मिठी ।।

४२ रुसला शंभू देव जावूनी डोंगरी घाली धुनी
पिरतीची ती गिरीजा बोलं तुम्हावाचूनी नाही कुणी ।।

४३ रूसलास शंभूदेव जावूनी डोंगरी घाली धूप
पिरतीची गिरीजा घेती भिल्लीनीचं रुप ।।

४४ म्हातार शंभूदेव दाढी लोळली भुईला
गिरीजा बोलती नवरदेव कुणी पाहिला ।।

४५ शंभू देवाच्या लग्नाला मांडव कशाचा
स्वर्गाच्या इंद्राने ढेरा दिला जडीत्राचा ।।

४६ मांडवाच्या दारी हळदी कुंकवाच्या पराती
अक्षदा पडतो शंभू पारबती वरती ।।

४७ पार्वती हाती कुंकवाची वाटी देवाला कुंकू वाहू का
राम तुम्ही कैलासी जाऊन पहा देवा तुम्हा बेलीची आवड का ।।

४८ पारवतीच्या हाती दह्याची वाटी देवाला दही वाहू का
राम तुम्ही कैलासी जाऊनं पहा देवा तुम्हा बेलीची आवड का ।।

४९ पारवतीच्या हाती दुधाची वाटी देवाला दूध वाहू का
राम तुम्ही कैलासी जाऊन पहा देवा तुम्हां बेलाची आवड का ।।

५० पारवतीच्या हाती बुक्याची वाटी देवाला बुका वाहू का
राम तुम्ही कैलासी जाऊन पहा देवा तुम्हां बेलाची आवड का ।।

५१ पारवतीच्या हाती साकराची वाटी देवाला साकर वाहू का
राम तुम्ही कैलासी जाऊन पहा देवा तुम्हां बेलाची आवड का ।।

५२ डोईवर चांदोबा आणि गंगा जटावरी देवाचे नाव सांगती
अर्ध्या अंगी पारवती गिरजा ती नार मांडीवर शोभतू गणपती ।।

५३ डोईवर चांदोबा आणि गंगा जटावरी देवाचे नाव सांगती
सर्वांगी भस्म दिसती छान गळ्यामधी रूद्राक्षांची माळ गं ।।

५४ डोईवर चांदोबा आणि गंगा जटावरी देवाचे नाव सांगती
त्रिशूळ डोंगुर दिसतोय छान नागबाच्या फडीनं झाकली मान ।।

५५ डोईवर चांदोबा आणि गंगा जटावरी देवाचे नाव सांगती
मुखी माझ्या रामराम ध्यानात बसले भोळे शाम ।।

५६ म्हातारदेवाचा सारा डोंगर सोन्याचा
यांच्या आंघोळीला नळ काशिच्या पाण्याचा ।।

५७ म्हातारदेवाचा म्हातारा कशाने झाला
रानी शिरशाच्या गेला ।।

५८ जन्मामध्ये जन्म मनुष्यांचा थोर
पाखरामध्ये मोर देवामध्ये रामेश्वर ।।

५९ गाव पाथर्डी कोण म्हणतं खेडं
देव खोल्लेश्वरापुढं आहे बेलाचं झाड ।।

*

## ii) भैरवनाथ ओव्या

१ देव भैरवनाथा उतर पायरीच्या खाली
माझ्या बाळाला खांदा कावड जड झाली ।।

२ तळ्या रे तुझं पाणी कसं उड्या मारीतं उकळ्या
देवा गं भैरवनाथानं जटा सोडिल्या मोकळ्या ।।

३ गाव गं लोहसरात गल्लूगल्ल्या नाही वाळू
देवा गं भैरवनाथाचा रथ येतो हळूहळू ।।

४ बाई सरपाचा कासरा नं म्या तर घातला कवाई
देवा गं भैरवनाथा माझा उत्तर जावई ।।

५ आयानू बायानू बघू भैरोबाची खोली
यांच्या गं भूजावरी नागीण झोपी गेली ।।

६ अशा भैरवनाथाला नका म्हणू काळा काळा
बाई याच्या घरामधी नागनागिणीच्या माळा ।।

७ अलिकडूनी खांडगाव पलिकडून लोहसर पेठ
बाई दोन्हीच्या गं मधी भैरवनाथाचा मठ ।।

८ अलिकडूनी खांडगाव पलिकडून लोहसरवाडी
बाई दोन्हीच्या गं मधी भैरवनाथाची ही माडी ।।

९ बाई गं भैरवनाथ मूळ काशीचा राहाणार
चैत्र पौर्णिमेच्या दिवशी खांडगावात येणार ।।

१० पहिली माझी ओवी गं काशी विश्वेश्वराला
मनोभावे पुजिते मी काळभैरवनाथा ।।

११ दुसरी माझी ओवी गं जोगेश्वरी मातेला
भक्तासाठी धावून आले शिरसाटवाडीला ।।

११ तिसरी माझी ओवी गं खांदी त्रिशुळ शोभतो
सावळा माझा भैरवनाथ भक्ताला पावतो ।।

११ दुसरी माझी ओवी गं खडावा पायाला
खांदी त्रिशुळ झोळी चिमटा जटा शोभे डोईला ।।

११ दुसरी माझी ओवी गं गुण गाते आवडीनं
अवतार धरीला भैरवानं ।।

१२ सरपं ती गोरी सरपं गं गेली धावमंदी
देव सालसिदबाबा उताऱ्या गावामंदी ।।

१३ सरपं ती गोरी सरपं नव्हता इंगळी
देव सालसिदबाबा गेला उताऱ्या आंघोळी ।।

१४ सरपं ती गोरी लिंबाचा पाला चावी
सालसिदबाबा उताऱ्या घरी नाही ।।

१५ सालसिदबाबा उतर पायरीच्या खाली
बाळराजाच्या नं मह्या खांद्या कावड जड झाली ।।

१६ वरसा वरसा सालसिदबाबाची जतरा
आंब्याच्या झाडाखाली तुम्ही कावडे उतरा ।।

१७ दह्या दुधाच्या वाट्या सालसिदबाबाच्या देऊळी
बोलतेत चांगभले मालवंडीच्या कावडी ।।

१८ भावाला भाव पुसं चिठ्ठी जागलस कसं
देव सालसिदबाबानं दिलं उसं ।।

१९ केली तणावत देवाच्या जोळाला
मोत्याचा गं साज सालसिदबाबाच्या टाळाला ।।

२० गाव ना मिडसिंगीच्या रूंद ना रूंद पेठा
सालसिदबाबाच्या छबिन्याच्या मोठमोठ्या वाटा ।।

२१ सापाचे येटोळे नां गल्लोगल्ल्यात माझ्या पाया
सालसिदबाबानं किती घुलुना तुमची दाया ।।

२२ चंडाळ करतो चूरचूर
सालसिदबाबा तर अग्नीचं घर ।।

२३ असे सालसीदबाबाच्या गं देवळी
घालतेत चांगभला मालेवाडीचे गवळी ।।

२४ सालसिदबाबा गाय म्हसीचा गवळी
असा दिला नां कसा डेरा गाव महिंद्या जवळी ।।

२५ असे नांगऱ्याच्या तासी साप निघाला डोम्या नाग
हात जोडीताच बाई देव फिरला गं माघं ।।

*



### प्रकरण पाचवे

# विठ्ठल संदर्भातील ओव्या

## i) पंढरपूर नाममहात्म्य ओव्या

१ पंढरी-पंढरी आहे खडक माळाला
तुळशीच्या माळा घाला गवंड्याच्या बाळाला ।।

२ पंढरी पंढरी कोण्या गं गवंड्यानं घडवली
रुक्मिणी माता डाव्या गं भूजाला मांडली ।।

३ पंढरी पंढरी ओळखू येईना माझी मला
देव त्या पांडुरंगानं हात शालूचा वर केला ।।

४ बाई इथून दिसती ती पंढरी दगडाची
सावळ्या विठ्ठलाची आत माडी बेगडाची ।।

५ पंढरी, पंढरी इथून दिसं लाल
पांडुरंगा सावळ्यानं माझ्यावर केली मखमल ।।

६ पंढरीची वाट कशियानं लालेलाल
देवा इठ्ठलानं लाविली मलमल ।।

७ पंढरपुरात चोरी झाली एका घरी
देवा विठ्ठलाचे विणे गेले दोन्ही चोरी ।।

८ पिकली पिकली पंढरी हिला दाणा झाला दाट
सावळे पांडुरंग पाही पाखराची वाट ।।

९ पिकली, पिकली पंढरी हिला दाणा आला भारी
सावळा गं पांडुरंग हाका पाखराला मारी ।।

१० पंढरी, पंढरी विठूरायाची नगरी
याच्या राऊळात भरल्या बुक्यानं घागरी ।।

११ पंढरीच्या शेती कुणी पेरली हावरी ।
तुटली गोफण मोती झाले वावरी ।।

१२ पंढरीच्या शेती कुणी पेरले जोंधळे
चंदनाच्या माळावर विठ्ठल सावळे ।।

१३ पंढरी, पंढरी घोकू नही येड्यावाणी
चंद्रभागा तुझं पाणी घेतं घोड्यावाणी ।।

१४ पंढरीचा विठू म्हणतेत काळा, काळा
नऊ लाख पितथिमी पडती याच्या पाया ।।

१५ पंढरपुरात काय वाजतं गाजतं
सोन्याचं बाशिंग गं लग्न देवाचं लागतं ।।

१६ पंढरपुरात बसायला नाही जागा
देवा विठ्ठलानं जागोजागी लाविल्या बागा ।।

१७ चला बघाया जाऊ पंढरीचं पीक पाणी
देव विठ्ठलाच्या तुळशी झाल्या उसावाणी ।।

१८ साधूला साधू पुसं पंढरीचं पीक पाणी
देवा विठ्ठलाच्या तुळशी झाल्या उसावाणी ।।

१९ पंढरी, पंढरी दिसती गं हिरवीगार
आला तुळशीला बार करा विठ्ठलाला हार ।।

२० पंढरीत झाली चोर जनीचं गेलं जातं
देवा त्वा विठ्ठला दवंडी द्यावा साऱ्या रात ।।

२१ पंढरपुरात कुणाची रंगीत माडी
बाई त्या रुक्मिणीचं माहेर विठ्ठलाची सासुरवाडी ।।

२२ अशी पंढरीला गेले जावून बसले धर्मशाळा
असा विठ्ठल म्हणतूया कव्हा आल्या लेकी बाळा ।।

२३ असं पंढरीले गेले गं जावून बसले वट्यावरी
विठ्ठल माझा हात फिरी गं रख्मा माझी ओटी भरी ।।

२४ बाई असं मिरतं-मिरतं गं पंढरीचं पटांगण
विठ्ठलाच्या रावळात गं संत घेती लोटांगण ।।

२५ अशी पंढरी पंढरी इथून दिसती हिरवीगार
विठ्ठलाच्या माडीवर तुळशीला आला बार ।।

२६ अशा पंढरीच्या शेती मी खुरपते ओवा
ऐकू येतो बाई विठ्ठलाचा मंजूळ पवा ।।

२७ अशी पंढरी पंढरी इथून दिसती काळी-काळी
विठ्ठलाच्या मांडीवरी रुक्मिण केस वाळी ।।

२८ अशी ती इथून दिसती पंढरीची ढवळी माती
सारविती रुक्मिण उभ्या रावळाच्या भिंती ।।

२९ जाईन मी पंढरीला तिथं बसन बारीला
माझ्या गं दर्शनाची चिंता पडल हारीला ।।

३० पंढरी, पंढरी मी जाईन पंढरीला
गोपाळ पुऱ्यामधी पेंडी सोडीन गाईला ।।

३१ पंढरी, पंढरी नाव मोठं अवघड
विठ्ठलाच्या पायरीला कान्होपात्राचं झाड ।।

३२ पंढरीला जायाला केली मी तयारी
विठ्ठल मुऱ्हाळी घोडं चलत नेहारी ।।

३३ पंढरी, पंढरी बालपणीच पाह्यली
गरुड खांबाची सय कोणाला राहिली ।।

३४ रुसली रुक्मिण अवघ्या पंढरीत नाही
बोलतू विठ्ठल विचार करून काही ।।

३५ पंढरीच्या वाटे पेरीली खसखस
विठ्ठलाला एकादस रुक्मिण तोडी पिवळे घस ।।

३६ पंढरीला जाया आवंदा नव्हतं माझं मन
देवा विठ्ठलानं चिठ्ठ्या पाठविल्या दोन ।।

३७ पंढरपुरात माळा पैशाच्या नऊ-नऊ
पुरेना माझा हात विठ्ठला खाली लवू ।।

३८ पंढरपुरात गं गल्लूगल्ली हवाया
सोन्याचं ताट विठ्ठल निघाले जेवाया ।।

३९ पंढरीची हवा सांगतू माझा भाऊ
विठ्ठलाच्या पायरीला गुप्त झाला नामदेवू ।।

४० रुसली मंग रुक्मिण अवघ्या पंढरीत नाही
पांडुरंगाच्या मग माझ्या भोजनाची तारांबळ काही ।।

४१ पंढरपुरामधी हैत गल्लो-गल्ली नळ
पांडुरंग फिरी कळ पाणी जागोजागी खेळं ।।

४२ पंढरपुरात हायित जागो-जागी मोऱ्या
पांडुरंग धुतू तोंड पाणी जातं गोपाळपुऱ्या ।।

४३ पंढरपुरामंदी हायित गल्लो-गल्ली मन्यारी
रुक्मिण ती गं माता चुडा भरती सोन्यारी ।।

४४ पंढरपुरामंदी दुकानाची सारा-सारी
पांडुरंगाच्या माझ्या रथा चाकं भारी-भारी ।।

४५ बाई दिली रुक्मिण दिली पंढरी पाहूनी
मिरवतू पांडुरंग धजा रथाला लावूनी ।।

४६ आज पंढरपुराला आया-बाया येईना कोणी
तिथं हरिच्या नामाची गं उसवली गोणी ।।

४७ माया बायांनो गं जाऊ पंढरपुराला
तुळशीच्या माळा गं वाहू सारंगधराला ।।

४८ बाई ती पंढरीला जाया केली म्या तयारी
देवा मह्या विठ्ठलाचं घोडं चरतं न्याहारी ।।

४९ बाई पंढरीला जाया संग न्यावात बापाला
बाई तांब्याची घागर पाणी तुळशीच्या रोपाला ।।

५० बाई पंढरीला जाया संग न्यावात आईला
बाई त्या चंद्रभागेमंदी पेंडी सोडावा गाईला ।।

५१ बाई पंढरीला जाया संग न्यावात भावाला
एवढी तांब्याची घागर पाणी सगळ्या देवाला ।।

५२ पंढरपुराची वाट गं खड्या-खुड्यानी दाटली
देवा तुह्या भेटीसाठी मला सडक वाटली ।।

५३ असं पंढरी गावाला कव्हा एकदा जाईन
सावळा पांडुरंग भेट हरिची घेईन ।।

५४ पंढरपुरात कोण लखोपती राजा
पांडुरंगाच्या माझ्या चांदीचा दरवाजा ।।

५५ पंढरपुरात माळीनीला एकादशी
जाई-मोगऱ्याची फुलं गरुड खांबापाशी ।।

५६ पंढरपुरात काय वाजतं-गाजतं
शिरी सोन्याचं बाशिंग लग्न देवाचं लागतं ।।

५७ पंढरीला जावा तव्हा नेव्हा आईचं लुगडं
भरली चंद्रभागा नाही धुयाला दगड ।।

५८ पंढरीचा मेवा कोनाला लागत
देवा मह्या गं विठ्ठलाच्या माळकऱ्याची आंगत-पंगत ।।

५९ बाई पंढरीला जाया केली मी यंदा तयारी
देवा मह्या विठ्ठलाचं घोडं चरतं नेहारी ।।

६० पंढरीची वाट माझे मोकळे केस
साधू संतांच्या संगतीला धरली एकादस ।।

६१ पंढरीला गेल्या मह्या आळीच्या बायका
हात मी जोडीते विटावरच्या नायका ।।

६२ पंढरपुराला गेल्या मह्या संगतीच्या घडणी
हातात उदबत्त्या चंद्रभागेच्या कडनी ।।

६३ पंढरपुरीची बाई मी चिमणी होईन
देवा विठ्ठलाचे नाम वेचून घेईन ।।

६४ महिन्याचं पंढरपूर न काशी माय कुणीकडं
काशी ना केदार विठ्ठला माझ्या गावाकडं ।।

६५ महिन्याचं पंढरपूर न सव्वा महिन्याची काशी
एवढं काशी ना केदार तीर्थ मह्या गावाकडं ।।

६६ पंढरपुरामंदी कशाचा गं गलबला
रुक्मिणीच्या चोळीसाठी नामदेव शिंपी झाला ।।

६७ रुक्मिण दिली पंढरीच्या ब्राह्मणाला
सोन्याचं गंगावन टाकी अंगणाला ।।

६८ रुक्मिण दिली पंढरीच्या हुजऱ्याला
नऊ लाखाचा मोती पांघरली पदराला ।।

६९ पंढरी-पंढरी दुरून दिसं पसाऱ्याची
रुक्मिण भरी चुडा उंच माडी कसाराची ।।

७० अशा पंढरपुरात गल्लीनं हवाया
बाई त्याच्या उजेडानं रुक्मिणी चालती जेवाया ।।

७१ रुक्मिण दिली पंढरीच्या गुजराला
सूपभर मोती पांघरते पदराला ।।

७२ रुक्मिण म्हणती देवा मी रुसून जाईन
अवघी पंढरी तुम्हा धुंडाया लावीन ।।

७३ पंढरीच्या शेतामंदी भाजी घेतात आया-बाया
रुक्मिणी अनुसया दोघी नणंद-भावजया ।।

७४ पंढरीला गेले मह्या आळीचे गोपाळ
विठ्ठलाला धोतरजोडा रुक्मिणीला पाताळ ।।

७५ पंढरीचे लोक उभे वाड्या-हुड्यावरी
विठ्ठलाची रुक्मिण कबीराच्या घोड्यावरी ।।

७६ साधूला साधू पुसं पंढरीचं पीकपाणी
विठ्ठलाची रखमाबाई अवघ्या पंढरीची धनी ।।

७७ ती पंढरी, पंढरी इथून दिसती हाळी-काळी गं
विठ्ठलाच्या मांडीवरी रुक्मिण केस वाळी गं ।।

७८ पंढरीचं माहात्म्य काशीला येईना
सखा पंढरीचा राया मुक्ती देता येईना ।।

७९ धन्य, धन्य हे पंढरी क्षेत्र मर्त्य लोकी ही दुसरी
माय-बाप नांदती दोघे पाहू चला विटेवरी ।।

८० जाऊ गं पंढरी उभं राहू गं भिवरी
हात करकटावरी तेणे मुक्ती साधियेल्या चारी ।।

८१ पंढरीची मी होईन चिमणी
हरिचं एवढं नाव रचिन अंगणी ।।

८२ पंढरपुराची होईन मी वेळणी
वाढीन साखर पाणी विठ्ठलाला ।।

८३ पंढरपुराचा गं बाई होईन खराटा ।
झाडीन गं बाई विठ्ठलाच्या चारी वाटा ।।

८४ पंढरी जाऊन म्या काय पाहिलं
मुनी नारदाचं देऊळ पाण्यात बुडालं ।।

८५ पंढरपुराची वाट आहे हिऱ्या-कंकराची
सासरला जाई लेक भीमा शंकराची ।।

८६ पंढरीला जाऊ मह्या बाळा आपून
पान या फुलांनी गेला इठ्ठल झाकून ।।

८७ पंढरपुरात चोळी घेतो माझा बाप
सोन्याचा दोरा टीप घालितो रघुनाथ ।।

८८ पंढरी जाऊन काय पाहिलं येड्यानं
भाग्याच्या नारीनं केली पंढरी जोड्यानं ।।

८९ पंढरपुरात बुक्का पैशाला पायली
मह्या विठ्ठलानं नही धारणा पाहिली ।।

९० पंढरीच्या माळीनी गं उमा-रमा
विठ्ठलाच्या चरणी ढीग फुलांचा जमा ।।

९१ रुसली रुक्मिण अवघ्या पंढरीत नाही
बोलतो पांडुरंग इच्या रागाला इगत काही नाही ।।

९२ पंढरपुराची बारीक बांगडी भरावा वाटली
आईच्या ठायी मला मावशी भेटली ।।

९३ पंढरपुरात गं बाई घरुघरी एकादशी
रताळाच्या गं पाट्या गरुड खांबापाशी ।।

९४ पंढरपुरात घरोघरी पोळ्या व्हती
देव विठ्ठलाच्या लेकी सासरला जाती ।।

९५ पंढरी झाली चोरी पोथीचं गेलं पान
देव विठ्ठल वाहे सावळ्याची आन ।।

९६ पंढरी झाली चोरी आळ आला जनीवरी
जनाबाई करी किऱ्या दोन्ही हात इन्यावरी ।।

९७ पंढरपुरात बुक्का विकतू पोत्यानं
विकरा मांडला मह्या विठ्ठल पित्यानं ।।

९८ पंढरपुरात होत्या बारा मोऱ्या
रुक्मिण धूती तोंड पाणी जातं गोपाळपुऱ्या ।।

९९ पंढरीच्या वाटं मोकळे माझे केस
वामनभाऊच्या बराबरी घडली एकादस ।।

१०० जावा पंढरीला संग न्यावा बापाला
हाती सुवर्णाचा तांब्या पाणी घालावा चाफ्याला ।।

१०१ जावा पंढरीला संग न्यावा सखा बंधू
चंद्रभागाच्या पारिचं भीमाचं तास खंदू ।।

१०२ रुसली रुक्मिण काही न्हाईना-धुईना
पंढरीचा सारंगधर अजून कसा येईना ।।

१०३ सपान गं पडलं पंढरीला गेल्यावाणी
मोकळे माझे केस चंद्रभागेला गं न्हाहाल्यावाणी ।।

१०४ पंढरी झाली चोरी जनीचा गेला तवा
अवघ्या पंढरीला दवंडी द्यावा नामदेवा ।।

१०५ पंढरीचा वाट मला दिसती सरळ-धोपट
सारंगी घोडीवर आला बाईचा पोपट ।।

१०६ पंढरीला जायाला नही केलं छान-बीन
तरी संगं भाऊ माझा पैशाचं धन ।।

१०७ पंढरीला जायाला नाही केलं पीठ-पाणी
तरी संगं भाऊ माझा धनिकांचा वाणी ।।

१०८ पंढरीचा पांडुरंग नाही कोणाच्या देव्हारी
सावळे पांडुरंग माळ-बुक्याचे व्यवहारी ।।

१०९ पंढरीचा देव नाही कोणाला लागत
देवा मह्या विठ्ठलाला माळ बुक्याची आगत ।।

११० रुक्मिण दिली पंढरीच्या बाम्हणाला
हाती सुवर्णाचा तांब्या सडा टाकी अंगणाला ।।

१११ पंढरपूर माहेर मह्या बाई आनंदाचं
चंद्रभागाचं देऊळ कलीच्या नारायणाचं ।।

११२ बाई पंढरी, पंढरी नही म्या पाहिली अजुनी
विठ्ठलाची माडी रामेश्वराच्या बाजूनी ।।

११३ आल्या जल्माधी मला पंढरी पाह्याची
पाण्यामंदी माडी देव कुंडलिक रायाची ।।

११४ पंढरीच्या शेती जना खुरपती मेथी
वाऱ्यानं येती ऐकू पांडुरंगाची पोथी ।।

११५ पंढरीच्या शेती जना खुरपिती राळा
वाऱ्याने येतो ऐकू देवा विठ्ठलाचा गळा ।।

११६ पंढरपुरात जनाबाई गं सुगरण
गवऱ्या थापती चंद्र सूर्याची घडण ।।

११७ पंढरपुरात गं जनीला नही कुणी
हातात घेतली फणी विठ्ठल घालितू वेणी ।।

११८ पंढरी, पंढरी विठुरायाची नगरी
तुळशीच्या माळा जनी भरीते गुजरी

११९ पंढरी, पंढरी नऊ लाखाचा कळस
देवा विठ्ठलानी वर लाविली तुळस ।।

१२० पंढरीला जाया आडवी लागती बारामती
विठ्ठलाच्या आधी मला भेटती पारबती ।।

१२१ पंढरीची वाट गं सये चालाया चांगली
हातात तुळशीमाळा जाई वाटत फुलली ।।

१२२ पंढरीची वाट इथं चालाया चांगली
अशी मुरुममातीनं माजी पावलं रंगली ।।

१२३ पंढरी पंढरी माझं माह्यार साजणी
विठ्ठल शिवी चोळी हरिनामाची गजनी ।।

१२४ पंढरी पंढरी माझं माहेर देशामंदी
कुंडलिक बंधू हाये चंद्रभागाच्या तासामंदी ।।

१२५ पंढरीच्या वाटं मी होईन माथणी
येतील साधूसंत पाणी पेतेन ओतूनी ।।

१२६ पंढरीला जाताना आडवी लागली जेजुरी
विठ्ठलाच्या आधी देव भेटला मल्हारी ।।

१२७ पंढरपुरात दिवाळसणाचा आनंद
जनी ओवाळी विठ्ठलाला रुक्मिणीनी नणंद

१२८ पंढरपुराची गं वाट सये कशानं सादळली
कावड गं बाई एकनाथाची हिसळली ।।

१२९ पंढरीची वाट सये कशानं गं वली झाली
राही गं रुक्मिण केस वाळीत गेली ।।

१३० पंढरपुरामंदी उभी राहिले चिऱ्यावरी
नजर माझी गेली विठूदेवाच्या तुऱ्यावरी ।।

१३१ पंढरपुरामंदी बाई पैशाला माळा इस
देवा मह्या विठ्ठला हात पुरंना खाली बस ।।

१३२ पंढरपुरामंदी उंच दुकान आत्ताराचं
हळद कुंकवाचं राज अखंड भरताराचं ।।

१३३ पंढरीला जाया घाट चढते दरडीचा
सावळ्या विठोबाचा सांगावा आला पिरतीचा ।।

१३४ पंढरीला जाया बाई संग घ्यावा वहिनीला
सोन्याच्या कळशीनं पाणी घालावा सजनीला ।।

१३५ पंढरीची हवा काय सांगू मी येड्याला
चंद्रभागा सोडूनी करी आंघूळ वढ्याला ।।

१३६ पंढरपुरामंदी गं तुळशी आल्यात हुरड्याला
सावळा पांडुरंग गं वीणा वाजवी भोरड्याला ।।

१३७ पंढरीची वाट गं सये चालायाला हालकी गेली
ज्ञानुबा तुकयानं तिथं गं साधूनी कथा गायिली ।।

१३८ पंढरपुरामंदी जावा बाई गं आखाडी वारीला
पांडुरंगाचं दर्शन घ्यावा बाई पहिल्या बारीला ।।

१३९ पंढरीच्या तीरावरी गं पांडुरंग नवरा झाला
मोत्याची मंडवळी बाई सावळ्या गं राजसाला ।।

१४० पंढरीच्या वाटं दिंड्या पताका लोळती
देवा त्या विठ्ठलाचं साधू रिंगाण खेळती ।।

१४१ पंढरीला जाईन उभी राहीन धोंड्यावरी
नजर माझी गं गेली रुक्मिणीच्या गोंड्यावरी ।।

१४२ पंढरीच्या वाटनं सांडला चुना कात
विठ्ठल-रुक्मिण दोघं गेले पानं खात ।।

१४३ पंढरीचा बुक्का बाई बुक्का लागला माझ्या चोळीला
सये कसं सांगू तुला गेला होते मी साधूच्या आळीला ।।

१४४ पंढरीला जाताना मह्या वटीला गुळशेंगा
देवा विठ्ठलाला कुणी एकादशीचा नेम सांगा ।।

१४५ असं गेले मी पंढरीला महाद्वारी बाई मी चुकले
देवा विठ्ठलाच्या चंद्रहारानं बाई मह्ये डोळे दिपले ।।

१४६ पंढरी पंढरी इठूरायाची गं नगरी
रुक्मिणीनं भरील्या बुक्क्याच्या घागरी ।।

१४७ पंढरपुरामंदी गं बाई कपिला गाय ती येली
इठ्ठलाच्या जेवणाला बाई दुधाची खीर केली ।।

१४८ पंढरपुरामंदी बाई म्या एक नवाल देखिलं
देवा मह्या विठ्ठलानं वाघ रथाला जुपीयलं ।।

१४९ पंढरपुरामंदी गल्लोगल्ली वाटा फरसबंदी
देवा मह्या विठ्ठलाचा वाडा आहे चिरेबंदी ।।

१५० पंढरपुरामंदी बाई त्वा राहूनी काय केलं
चंद्रभागा तीरावरी भांडं ध्याईचं उजळलं ।।

१५१ पंढरीचा विठू एवढा कसा गं धट
लहानमोठ्यांना गं उभ्यानं देतो गळा भेट ।।

१५२ पंढरीला जाया बाई मला उशीर गं झाला
पांडुरंग गं माझा बाई आडवा विसाव्याला आला ।।



१५३ पंढरीच्या वाटंनं कोन गं ढवळ्या चोळीची
विठ्ठल गं बोलतू मुक्ताबाई आळंदीची ।।

१५४ हौस मला मोठी पंढरपूर माहेराची
पाण्यामध्ये माडी कुंडलिक बांधवाची ।।

१५५ पंढरपुरात गं बाई कशाचा गलबला
विठ्ठलाला लेक झाला जावा बारशाला ।।

१५६ असं पंढरी गावाला कव्हा एकदा येईन
सावळ्या विठ्ठल भेट हरिची घेईन ।।

१५७ पंढरपुरात पैशाला माळा नऊ-नऊ
दोन्ही हात लागं विठ्ठलाच्या पाई ।।

१५८ पंढरीची वाट कशियानं काळी निळी
देवा विठ्ठलानं लावियाल्यात सोनकेळी ।।

१५९ पंढरीची वाट कुण्या पाप्यानं नांगरली
देवा मह्या इठ्ठलाची गाडी बुक्क्याची हादरली ।।

१६० पंढरीला जाता कशाला हवं गाडीघोडं
पंढरी नाही दूर चंद्रभागाला पाणी थोडं ।।

*

# ii) विठ्ठलाच्या ओव्या

१ विठ्ठलाची पाठ रुक्मिण घाशी रागं रागं
खरं सांग देवा जनी तुझी कोण लागं ।।

२ विठ्ठल विठ्ठल छंद लागला गं जीवाला
बाई एकदा गं जायाचं पांडुरंगाच्या गावाला ।।

३ किती गं पुण्य केलं तू गं कुंभाराच्या विटं
विठू दयाळाची माझ्या चरणं सापडली कुठं ।।

४ विटेवरी उभा युगे झाली अठ्ठावीस
देवा दयाळाला कुणी म्हणाना खाली बस ।।

५ विठ्ठल विठ्ठल हाका मारीते येड्यावाणी
चंद्रभागा तुझं पाणी धावा घेतं घोड्यावाणी ।।

६ विठ्ठल विठ्ठल छंद लागला तुकाला
निघून गेला वैकुंठाला तसा छंद लागू मला ।।

७ विठ्ठल विठ्ठल छंद लागला मिराला
जन्म मरण नाही तिला तसा छंद लागू मला ।।

८ विठ्ठल माझा पिता रुक्मिण माझी माता
शीण नाही आला दोघाला ओव्या गाता ।।

९ विठ्ठल माझा पिता मला माहेराला नेतो
ज्ञानाची पोथी हाती वाचायला देतो ।।

१० पडतो पाऊस औरंगाबादी काळा काळा
माझा नाबाई विठू बंधू सावळा सावळा ।।

११ असा विठ्ठल म्हणतू सोड रुक्मिण माझी काठी
आली आळंदीची दिंडी झाली राऊळात दाटी ।।

१२ असा विठ्ठल म्हणतू सोड रुक्मिणे ताटी
साधू आले पैठणकर राऊळाला झाली दाटी ।।



१३ असा विठ्ठल म्हणतू रुक्मिणे आन माझ्या खडावू
साधू आलेत देहू-आळंदीचे जातो त्यांना आडावू ।।

१४ असा विठ्ठल म्हणतू सोड रुक्मिणे बंडी
साधू आलेत भगवान गडकर गर्दी राऊळाच्या तोंडी ।।

१५ असा विठ्ठल म्हणतू काढ रुक्मिणे झाडूनी
महिंद्याचे वारकरी आलेत संसार सोडूनी ।।

१६ विठ्ठलाच्या दर्शनाला नाही तातड कामाची
सावळ्याची बाई माझ्या देखा मुरत रामाची ।।

१७ हरिच्या दर्शनाला गलबला करू नका
सावळा पांडुरंग निचितीनी पाहू सखा ।।

१८ असं वाटतं जीवाला येथून मारावी भरारी
सावळ्या पांडुरंगाला कवळ हरिला घालावी ।।

१९ विठ्ठल माझा पिता रुक्मिण माझी आई
कुंडलिक माझा बंधू भिमा माझी भावजई ।।

२० विठ्ठल म्हणतू रुक्मिणीला झोप भारी
तुटला चंद्रहार मोती झाले शेजेवरी ।।

२१ विठ्ठल म्हणतो सोड रुक्मिणी धोतर
मग आलेत साधुसंत झाला कथाला उशीर ।।

२२ विठ्ठल देव बोलं ये गं रुक्मिणे बनात
आलेत गं साधुसंत उभे राहिले उन्हात ।।

२३ इटावरी उभा युग झाले अठ्ठाइस
पांडुरंगाला मह्या कोणी म्हणाना खाली बैस

२४ आताच्या युगात खरं नाही ते राहिलं
डोम्या महाराच्या घरी पाणी देवानं वाहिलं ।।

२५ राऊळाशी जाता घाम आला दना-दना
विठ्ठलाची भेट घेता जल्म झाला नवा ।।

२६ विठ्ठल पाव्हुना गं माझ्या दुबळीच्या घरी
साळीचे तांदूळ आणावा बाई बरोबरी ।।

२७ विठ्ठल मुऱ्हाळी बाई मला झोपाच्या भरात
बुकीयाचा पुडा त्यानं ठेविला दारात ।।

२८ विठ्ठल माझा पिता रुक्मिण माझी माता
भागला शीणभाग त्यांच्या ओव्या गाता ।।

२९ विठ्ठल विठ्ठल छंद लागला जीवाला
एकदा जायाचं पांडुरंगाच्या गावाला ।।

३० पांडुरंगाचे पाय बाई मी धरिले पोटाशी
सापडले धन बाई मजला मोठशी ।।

३१ देवा मह्या इठ्ठलाचे बडवे चांगले
जत्रा भरली दणक्या वारा घालाया लागले ।।

३२ काय पुण्य केलं तू कुंभाराचे इटं
पांडुरंगाचे पाऊल तुला सापडले कुठं ।।

३३ विठ्ठल बोलं रुक्मिणी वाढं डाळ
कशाची वाढू डाळ तुरी झाल्या रानोमाळ ।।

३४ विठ्ठल म्हणतू रुक्मिणी वाढ रोटी
कशाची वाढू रोटी गहू जमिनीच्या पोटी ।।

३५ विठ्ठल बोलं रुक्मिणी वाढ भात
कशाचा वाढू भात साळी झाल्या कोकणात ।।

३६ विठ्ठल बोलं रुक्मिण वाढ वांगं
कशाचं वाढू वांगं झाडं राऊळाच्या मागं ।।

३७ पंढरीचा देव नाही कुणाला लागत
देवा मह्या विठ्ठलाला माळ बुक्क्याची आगत ।।

३८ लिहिल्या पत्रिका धाडिल्या वाऱ्याहाती
पांडुरंगाच्या स्वयंवरावा देवा यावा रातोराती ।।

३९ पहाट समया रथ विठ्ठलाचा दणाणी
कोंबडा गिन्यानी उतार पडं याच्या कानी ।।

४० विठ्ठल देव बस आगीन गाडीत
कीर्तन मांडलं बाई पांडुरंगाच्या माडीत ।।

४१ विठ्ठल विठ्ठल कधी एकदा मजला भेटल
माझ्या गं मनाचा कधी संशय फिटल ।।

४२ देवाच्या देऊळात उभी राहिले एका कोनी
माज्या संकटाला नेत्र उघडी इठ्ठल दोन्ही ।।

४३ पहिल्या पंगतीला कुणी घातली रांगोळी
सावळा पांडुरंग देव गेल्याती आंघोळी ।।

४४ दुसऱ्या पंगतीला कोन करूनी गेली नार
सावळा पांडुरंग नित वाची हरिपाठ ।।

४५ तिसऱ्या पंगतीला कोन वाढीती भात
सावळा पांडुरंग घाली रुक्मिणीला नथ ।।

४६ चवथ्या पंगतीला कोन टाकूनी गेली पान
सावळा पांडुरंग यशोदीचं बाळ तानं ।।

४७ पाचव्या पंगतीला कोनी वाढीली शेंग भेंडी
सावळा पांडुरंग खडीसाखर लावी तोंडी ।।

४८ सहाव्या पंगतीला कोनी वाढीली गुळपोळी
सावळ्याच्या रुक्मिणीला हिरकनीची चोळी ।।

४९ सातव्या पंगतीला कोनी वाढीली मुळा भाजी
रुक्मिणी बोले देवा तारांबळ झाली माजी ।।

५० वाखरी गावाच्या माळावरी जरी रुमाल भुईला लोळं
सावळा पांडुरंग साधुसंतामंदी रिंगाण खेळं ।।

५१ सकाळच्या पहाऱ्यामंदी नाव घ्यावं विठ्ठलाचं
नाव घ्यावा विठ्ठलाचं नाव घ्यावा रुक्मिणीचं ।।

५२ इटेवरी उभा राहिला वाईचा
केवढी तपेसरी पती रुक्मिणीबाईचा ।।

५३ विठ्ठल विठ्ठल छंद लागला तुकाला
निघून गेला वैकुंठाला तसा छंद लागू मला ।।

५४ विठ्ठल विठ्ठल छंद लागला मिराला
जन्म-मरण नाही तिला तसा छंद लागू मला

५५ विठ्ठल विठ्ठल जीवा लागला चटका
पंढरीचा पांडुरंग आला देव लटका ।।

५६ विठ्ठल विठ्ठल देवा लागून गेला छंद
पंढरीचा देव ना कधी भेटन पांडुरंग ।।

५७ विठ्ठल म्हणतो नामदेवा मह्या मुला
थिर होय पायरीला पहिला मान दिला तुला ।।

५८ इठ्ठल इटेवरी चोखोबा भायेरी
उद कापराच्या वाती नामदेवाच्या पायरी ।।

५९ देवा त्या विठ्ठलाचे यांच्या पायाचे भोपळे
तुका गेले वैकुंठाशी हात सोडले मोकळे ।।

६० दुरून दिसती गरुड खांबाची लाल बत्ती
विठ्ठल सांगे कथा नामदेव वाची पोथी ।।

६१ पंढरीचा बुक्का लागला माझ्या चोळी
विठ्ठल सावळ्याला भेटला सावता माळी ।।

६२ वाकरीच्या ओढ्यावरी भात शिजतो खंडीचा
ज्ञानोबा तुकाराम साधू मालक दिंडीचा ।।

६३ उठत बसत गरुड खांब म्या गाठीला
पिरतीचा पांडुरंग मला बघावासा वाटला ।।

६४ माझा तो दंडवत नामदेवाच्या पायरी
इठ्ठल रुखमाई आली राऊळाच्या भाईरी ।।



६५ कस्तुरीचा टिळा दोन्ही भुवयामंदी
पंढरीराया माझा म्या देखिला विष्णूपदी ।।

६६ पंढरपुरामंदी सोनार त्या नरहरी
विठ्ठलाच्या मंदिराला त्याची कारागिरी ।।

६७ भक्तामध्ये भक्त भक्ती पुंडलिकानं केली
देवा विठ्ठलाला डाव्या हातानं वीट दिली ।।

६८ विठ्ठल माझा पिता रुक्मिण माझी माता
हलका झाला शिणभार दोघांना ओव्या गाता ।।

६९ पांडुरंग पिता रुक्मिणी माझी बया
आषाढी वारीला बंधू कुंडलिक आला न्याया ।।

७० अंतरीचं गूज माझ्या हुदर्यात दाटलं
सावळा पांडुरंग कधी एकांती भेटलं ।।

७१ पहिली माझी ओवी सावता माळीयाला
तुळशीच्या माळा पांडुरंगाच्या गळीयाला ।।

७२ चरणावरी मस्तक ठेविते गं हळुवार
बाई पांडुरंगाचे माझ्या पाय गं सुकुमार ।।

७३ चरणावरी मस्तक ठेविते हळू माथा
सख्या पंढरीनाथा नेत्र उघड देवा आता ।।

७४ मोठे मोठे डोळे भिवया रूंद रूंद
सावळा पांडुरंग लावी कपाळी गंध ।।

७५ मोठे मोठे डोळे भिवया कानीव
पांडुरंगाचं माझ्या रूप लाखाचं ओतीव ।।

७६ मोठे मोठे डोळे जसे टाळाचे टोपण
पांडुरंगाचं माझ्या रूप लाखाचं देखणं ।।

७७ हिऱ्यामोत्याचे अलंकार वर तुळशीचे हार
पांडुरंगाची दृष्ट काढते मी वारंवार ।।

७८ विटेवरी नीट उभा राहिला कव्हाचा
सख्या पंढरीरायाचा अंत कळेना देवाचा ।।

७९ पोथी पुस्तकाचं यॉड रुक्मिणबाईला
पांडुरंगाच्या पायरीला नामा चाकरी राहिला ।।

८० विटेवरी नीट उभा राहिला सोवळ्यानं
पांडुरंगा माझ्या तुला विनंती जिव्हाळ्यानं ।।

८१ अशी राऊळात जाते दंडभुजा मी रेटूनी
देवा त्या इठ्ठलाला येते सख्याला भेटूनी ।।

८२ पंढरीचा विठू ब्रह्मपुरीचा येतो जातो
सोन्याच्या ठोकी मेखा वर जरीचे पाल देतो ।।

८३ देवामंदी देव देव विठ्ठल लई काळा
त्याच्या आंघुळीला लागं कस्तुरी सव्वा तोळा ।।

८४ विठ्ठल बोलतू चल जने गवताला
पंढरपुराभोवताली पवना मानला ।।

८५ पांडुरंगाच्या राऊळात हालती तीन पंखं
सावळ्याच्या दर्शनाला आली खंडोखंडीची लोकं ।।

८६ पंढरपुरामंदी बाई कशाची झाली चोरी
रूक्मिण बोलती देवा जनीचं याड भारी ।।

८७ पंढरपुरामंदी तिथं कशाची चोरी झाली
इठ्ठलाचा शेला जनीच्या उशाखाली ।।

८८ जनी बसली न्हायाला पानी जळतं पोळतं
देवा मह्या विठ्ठलाला सारं अंतरी कळतं ।।

८९ राऊळात झाली चोरी आळ आला जनीवरी
वाजतो असा चौघडा तुम्ही जनीचा छंद सोडा ।।

९० काठी या घोंगडीचा म्होरं वाटनं कोन जातो
पिरतीचा पांडुरंग जनीचं धुणं धुतो ।।

९१ साळीच्या भाताची आवड मोठी देवाला
एवढ्याचसाठी देव जातो जनीच्या गावाला ।।

९२ विठ्ठल म्हणतू माझ्या जनीला नाही कोणी
रूक्मिण उपसते पाणी सावळा उकलितो वेणी ।।

९३ विठ्ठल घाली वेणी जनाबाईच्या केसाची
रेशमी गंगावण फणी हत्तीच्या दाताची ।।

९४ विठ्ठलाच्या घरी जनी झाडझूड करी
सावळा तो पांडुरंग पाट्या केराच्या भरी ।।

९५ विठ्ठल म्हणतू का गं जना तू घाबरी
चंद्रभागेच्या पाण्याच्या देतो आडव्या घागरी ।।

९६ अशी दळणाची गं पाटी ठेविली जात्यापाशी
दळू लागे देव नित भक्त जनाईशी ।।

९७ विठ्ठल म्हणतू चल जने जाऊ गवताला
चंदनवेल पसरला गं रावळाभोवताला ।।

९८ विठ्ठल म्हणतू चल जने गोवऱ्या वेचू
सोनियाच्या पाट्या मोतीयाचे किल्ले रचू ।।

९९ पंढरीखालती जनाबाईची झोपडी
हाती टाळविणा देव चालले तातडी ।।

*

## iii) रुक्मिणी मातेविषयी ओव्या

१ सोळा सहस्र नारी सोळा सहस्र दुकानं
बोलती रुक्मिण राती कुठं होता मुक्काम ।।

२ सोळा सहस्र नारी अशी रुक्मिण म्हणती
रुक्मिण माता गूज देवाला बोलती ।।

३ सोळा सहस्र खोल्या दिल्या अंधारी
जळती नंदादीप रुक्मिणीच्या मंदिरी ।।

४ सोळा सहस्र नारी देव भोगतो अंधारी
पडला मग बाई उजेड रुक्मिणीच्या मंदिरी ।।

५ सोळा सहस्र नारी देव भोगुनी आला
उठ, उठ रुक्मिणी पाणी ठेव आंघोळीला ।।

६ बाई सोळा सहस्र नारी सोळा सहस्र कवाडं
सोळा सहस्र कवाडं तरी माता रुक्मिणीची आवड ।।

७ बाई सोळा सहस्र नारी सोळा सहस्र खोल्या
बोलती रुक्मिणी राणी कुठं होता गोडबोल्या ।।

८ बाई सोळा सहस्र नारी नारी घालती धिंगाणा
राही-रुक्मिणी वाचूनी विडा देवाचा रंगाना ।।

९ विठ्ठलाची पाठ रुक्मिणी घाशी रागं रागं
खरं सांगा देवा जनी तुमची कोण लागं ।।

१० भरली चंद्रभागा नावा चालल्या नाचत
बोलतो सावळा रुक्मिणी नाही पुंडलिक वाचत ।।

११ रुसली रुक्मिण जाऊन बसली बापवाड्या
देवा विठ्ठलानं पाठवल्या पुढं रथ मागं गाड्या ।।

१२ रुसली रुक्मिण जाऊन बसली पदम तळ्याला
पंढरीचा पांडुरंग हात घालितो गळ्याला ।।

१३ रुसली रुक्मिण जाऊन बसली वाळवंटी
पंढरीचा पांडुरंग गळा हिच्या घाली मिठी ।।

१४ देव बोले पांडुरंग काढ रुक्मिणी झाडूनी
आलेत साधूसंत घर संसार सोडूनी ।।

१५ विठ्ठल म्हणतो सोड रुक्मिणी जोडा
आलेत साधूसंत पडला राऊळाला वेढा ।।

१६ विठ्ठल म्हणतो सोड रुक्मिणी बंडी
आलेत साधूसंत माझ्या राऊळाच्या तोंडी ।।

१७ रुसली रुक्मिण काही नाहीना धुईना
वैष्णपाळ नवरदेव हिच्या मनाला येईना ।।

१८ रखमाबाई लाडकी वर पुसती आईला
पंढरीचा पांडुरंग हाये कोणाच्या वयीला ।।

१९ ज्ञानोबाच्या पालखीपुढं वाट कशायनी ओली
विठ्ठलाची रखमाबाई तिथं वाटावरी न्हाली ।।

२० विठ्ठलाला घाम जशा सुईवाणी धारा
बोलती रुक्मिण इंजनवारा चालू करा ।।

२१ विठ्ठलाचा घाम जसे मोती चमकती
बोलती रुक्मिण इंजनवारा घालू किती ।।

२२ विठ्ठला शेजारी रुक्मिण बसाना
आंबीर बुक्क्याची तिला गरदी सोसाना ।।

२३ रुसली गं रुक्मिण खडीच्या गं चोळीसाठी
विठ्ठल म्हणतो आळंदीला गेलेत गं चाटी ।।

२४ रुसली मग रुक्मिण वाळवंटी दिलं पाल
बोलतू मग पांडुरंग रुक्मिणी घराला चाल ।।

२५ रुसली रुक्मिण जाऊन बसली धर्मसाळं
अशी सावता माळ्याची ईनी खुरपली साळ ।।

२६ रुसली रुक्मिण काळ्या विठ्ठलाला दिली
काळ्या विठ्ठलाला दिली रुपा मेळवन झाली ।।

२७ रुक्मिणीचे माय-बाप रुक्मिणीला शिव्या देती
अगं माझ्या मैना पाहिलास पती काळा किती ।।

२८ रुक्मिण उभी अशी कमानी दरवाज्यात
विठ्ठलाला झाली रात आळंदी बाजारात ।।

२९ रुक्मिण धुई धुणं विठ्ठल डगरीला उभा
दोहींच्या पिरतीला हासली चंद्रभागा ।।

३० बाई दिली रुक्मिण दिली पंढरी पाहूनी
मिरवतू पांडुरंग धजा रथाला लावूनी ।।

३१ मग ती रुक्मिण म्हणे विठ्ठला विठ्ठला
कमानी बाई दरवाजात हार गळ्याचा तुटला ।।

३२ बाई पांडुरंग म्हणं सोड रुक्मिणे बाजार
पिवळी गं पितांबर रुपई लागले हजार ।।

३३ बाई रुक्मिण म्हणं देवा तुमचं गेलं ग्यान
आपल्या रथाचा दिला वडाऱ्याला मान ।।

३४ रुसली रुक्मिण गेली राऊळाच्या आड
आली वरसाची पंचमी देवा माहेराला धाड ।।

३५ भरली गं चंद्रभागा पाणी लागलं लिंबाला
विठ्ठलाची रुक्मिण उभी गरुड खांबाला ।।

३६ विठ्ठलाच्या माडीवर रुक्मिण येंघती बसून
सावळ्याला एकादस देती खोबरं किसून ।।

३७ विठ्ठल म्हणतू रुक्मिणे तू दूर निज
दोघींच्या बुचूड्यांनु सिनली माझी डावी भूज ।।

३८ भिमकाची लेक रुक्मिणबाई कहार
आगं पाहिलेत वर पंढरीचे सारंगधर ।।

३९ अशी रुक्मिण म्हणे देवा शालू कशानं फाटला
होतो तुळशीच्या बागात वारा मंजूळ सुटला ।।

४० अशी रुक्मिण म्हणे देवा शालू कशानं गार
बोलतू देव तुळशीच्या बागात पडलं होतं दैवार ।।

४१ रुक्मिण म्हणं देवा आवड कोनाची
अशी तुळस गुणाची तप घालिती उन्हाची ।।

४२ अशी गं रुक्मिण गेली तुळशीला खेटूनी
इच्या पदराला गं आल्या मंजूळा तुटूनी ।।

४३ शेर सोनियाच्या रखमाबाईच्या पाटल्या
विठ्ठल म्हणे रुक्मिणीला सोळा मोहरा आटल्या ।।

४४ रुक्मिणीची चोळी सतीभामाच्या धुण्यात
सतीभामाच्या धुन्यात मोती पांगले पाण्यात ।।

४५ विठ्ठलाची माडी रुक्मिणी येघं झरझरा
हरिला गं एकादस इच्या वटीला राजगीरा ।।

४६ गोरी रुक्मिण काळ्या विठ्ठलाला दिली
सोन्याचं मंगळसूत्र मोत्याच्या हाराखाली ल्येली ।।

४७ राजा भिमकाची लेक किती रखमाई शहाणी
मनानं केला वर नऊ लाख पृथ्वीचा धनी ।।

४८ अशी चला पहाया जाऊ रुक्मिणीची शेज खोली
सोनियाची शाल रुक्मिण झोपी गेली ।।

४९ रुक्मिण गुज बोलती निवड
आगचूर सतीभामा हुर्द लोटिती कवाड ।।

५० बाई चला गं पाहू रुक्मिणीची शेज बाज
सोन्याचा पलंग त्याला सोन्याच्या घुंगराचा साज ।।

५१ बाई रुक्मिण म्हणती राती कुठं होता देवा
तुळशीईची काळी माती शेल्याला डाग नवा ।।

५२ रुसली मग रुक्मिण जाऊन बसली माडीवर
बुक्क्याचा मग भडीमार तेलंग्या साडीवर ।।

५३ रुक्मिण मारी हाका देव विठ्ठल राऊळा
बुक्क्याचं मग घेई माप मनकी वडाच्या झाडाला ।।

५४ बाई ती रुक्मिण म्हणं देवा गेलं तुमचं ग्यान
असं तुळशीच्या संग वर्षा लावूनी लगान ।।

५५ बाई गोंदुळ्या हाताची नका नेवू बाजारात
रुक्मिणी माझ्या बाईला चुडा आला कागदात ।।

५६ रुक्मिण म्हणती देवा तुम्हा बहिणी किती
पाठीची सुभद्रा धर्माची धुरपती ।।

५७ रुक्मिण गेली राऊळाच्या माघं
बोलतू विठ्ठल आळंदीला जाऊ दोघं ।।

५८ भिमका राजाची लेक रखमाबाई लाडी
मायबापाला चोरूनी पत्र नारायणाला धाडी ।।

५९ रुक्मिण दिली इठ्ठल गुजराला
सोळा लक्ष मोती हिच्या साडीच्या गं पदराला ।।

६० दिली रखमाबाई पंढरीच्या बामनाला
सोन्याचं गंगाळ सडा टाके अंगनाला ।।

६१ विठ्ठलाचं राज रुक्मिण सांगती आईला
दीड लाख मोती तिच्या चोळीच्या बाहीला ।।

६२ विठ्ठलाचं राज रुक्मिण सांगती बापाला
दीड लाख मोती माझ्या झुब्याच्या कापाला ।।

६३ विठ्ठलाचं राज रुक्मिण सांगती बंधूला
सोन्याचा कळस पंढरी गावाला ।।

६४ विठ्ठलाचं राज रुक्मिण सांगती बहिणीला
मोत्या पवळ्यांची रास तिच्या वेनीच्या गोंड्याला ।।



६५ नऊ लाख मोती रुक्मिणीच्या बुगडीला
दामुजी त्या सोनारानं अवघा समींदर उघडीला ।।

६६ रुक्मिणीचा मोती हारवला वाळवंटी
देव विठ्ठल हिकमती डाव्या पायानं वाळू लोटी ।।

६७ रुसली रुक्मिण जाऊन बसली पानंदीला
सावळ्या विठ्ठलाला जाऊ देई आळंदीला ।।

६८ रुसली रुक्मिण जशी आगीन तापली
विठूदेवाच्या मांडीवर तिनं सत्यभामा देखिली ।।

६९ सोन्याची आंगठी ती गं कशानं झिजली
आंबीर बुक्क्याची रास रुक्मिणीनं मोजली ।।

७० रुसली रुक्मिण सत्यभामाला बरं झालं
दोघींच्या भांडणाचं पांडुरंगाला हसू आलं ।।

७१ रुसली रुक्मिण ती गं बसली खिडकीत
पिरतीचा पांडुरंग बसला, सारी पंढरी धुंडाळीत ।।

७२ राजा भिमकाला नऊ जनी त्या गं कन्या
धाकली रुक्मिण दिली पंढरीच्या वान्या ।।

७३ विठ्ठलाचं रूप रुक्मिण न्याळिती आरशात
विठ्ठलासारखा जोडा नाही साऱ्या पीरथीमीत ।।

७४ रुक्मिण लावी दिवा आपुल्या महालात
विठोबाला झाली रात पंढरीच्या बाजारात ।।

७५ सोळा सहस्र नारी विठ्ठलाच्या दासी
देवानं केलं राज एकल्या रुक्मिणीशी ।।

७६ रुसली रुक्मिण गेली मंगळवेढ्याला
पिर्तीचा पांडुरंग जीन घालितो घोड्याला ।।

७७ रुक्मिण लेनं लेती शेस फुलाच्या येलवाक्या
पिर्तीच्या पांडुरंगा यावं म्हणते गाई राख्या ।।

७८ रुसली रुक्मिण जाऊन बसली माळटोकी
पिरतीचा पांडुरंग जोडा काढूनी धूम ठोकी ।।

७९ रुक्मिणबाईचं असं सव्वा तोळ्याचं डोरलं
विठुरायाचं गं नाव सर्वात थोरलं ।।

८० रुसली रुक्मिण धुन्याची बांधी मोट
सावळा पांडुरंग तिची हासत सोडी गाठ ।।

८१ रुक्मिण धुणं धुती दरवळे चंद्रभागा
देवा विठ्ठलाचा झगा धुती मना जोगा ।।

८२ सोळा सहस्र नारी लागल्या कवाडाला
सावळे रुक्मिणी रजा देवावा देवाला ।।

८३ रुसली रुक्मिण वाट विचारी तळ्याची
सावळा पांडुरंग आन घालितो गळ्याची ।।

८४ राही रुक्मिननं पति अडविला परसदारी
सोळा सहस्र नारी नाव घेवू कुठवरी ।।

८५ रुसली रुक्मिण गेली दिंडोरी बना
सावळा पांडुरंग घेतो पालखी संग मेना ।।

८६ राही रुक्मिणी परास रूप लक्ष्मीचं भारी
पाहुणा गं पांडुरंग नीत उभा तिच्या दारी ।।

८७ हातात टाळ इना डोई जुंबडा जाईचा
सांगतो कीर्तन पती गं रुक्मिणीचा ।।

८८ रुसली रुक्मिण हिचं हासणं वंगाळ
देवा विठ्ठलाला गार पाण्याची आंघुळ ।।

८९ रुसली रुक्मिण गेली कंवदळ पुराला
देवा मह्या इठ्ठलानं नवा रथ शिणगारीला ।।

९० आखाडी एकादशी मह्या सावळ्या कंथाला
हाती गडवा रुक्मिण हिंडती ताकाला ।।

९१ येड्या रुक्मिणी तुला संसाराची हावू
तुह्या पायरीला गं बसले महादेवू ।।

९२ इठ्ठलाचं रूप रुक्मिण न्याहाळती
चांदीचे कुंडल पायामधी झळकती ।।

९३ शेर सोनियाची रुक्मिणीची नथ
लवंगाचं तेल समईची लावी ज्योत ।।

९४ शेर सोनियाच्या रुक्मिणीच्या पाटल्या
सत्य सत्य बोला देव किती मोहरा आटल्या ।।

९५ शेर सोनियाच्या रुक्मिणीच्या बुगड्या
देव विठ्ठल खिडक्या टाकीतो उघड्या ।।

९६ शेर सोनियाचे रुक्मिणाचे तोडे
रुक्मिणीपुढं दव विठ्ठल हात जोडे ।।

९७ रुक्मिण गोरी काळ्या विठ्ठलाला दिली
मोतिया पवळ्याची कोणी झडाझडी केली ।।

९८ रुक्मिण गोरी हिचा सावळा गं पती
अनिवार मोती कोणा जव्हाऱ्याचा पती ।।

९९ रुक्मिण गोरी दिली सावळ्या वराला
मोती पवळ्याची आली भरती दर्याला ।।

१०० रुक्मिण न गोरी वर पुसती मामाला
विठ्ठल नवरा आहे कोणाच्या शीणाला ।।

१०१ रुक्मिण गोरी वर पुसती आईला
विठ्ठल नवरा आहे कोणाच्या वईला ।।

१०२ रुसली रुक्मिण एक रात दोन इळ
देवा इठ्ठलाची भोजनाची गं तारांबळ ।।

१०३ धुरपरीचं घोडं रुक्मिणीच्या वाड्यापुढं
नंदाच्या नात्यानं रुक्मिण पाया पडं ।।

# iv) तुळशीआईच्या ओव्या

१ तुळशीच्या माळा इकू लागल्या बाजारी
सावळा पांडुरंग लेतो कंठीच्या शेजारी ।।

२ तुळस भोपळी भांडती झणाझणा
तुळशीच्या केल्या माळा भोपळीच्या वीणा ।।

३ तुळस म्हणती कम्हून भोपळे मळ्यात
मज तुळशीच्या माळा पांडुरंगाच्या गळ्यात ।।

४ तुळस म्हणती भोपळे महे सवती
इणीया करणी संत खांद्यावर घेती ।।

५ तुळशीचा पाला-पाला वारीयानं गेला
देवा मह्या इठ्ठलानं गोळा आनंदानं केला ।।

६ तुळश्या बाईला ईला नाही माय बाप
पडला मेघराजा धरणीवर उगवलं रोप ।।

७ तुळशी गं बाई जल्म तुझा रानीवनी
बैस अंगणात जागा देते वृंदावनी ।।

८ तुळशीबाई नको हिंडू रानोवनी
चौदा चवकोनी चाहूर माझा वाडा जागा देते एका कोनी ।।

९ तुळशी बाई नको हिंडू जंगलात
चौदा चवकोनी चाहूर माझा वाडा जागा देते अंगणात ।।

१० पतिव्रताच्या वाड्याला नाही वाट
अशा तुळशी ना लाविल्यात दाट ।।

११ तुळशी गं बाई तुला नाही अभिमान
गोविंद देवासंग वरसा लाविती लगान ।।

१२ तुळशी गं बाई तू तं होती कुठं राती
तुझ्या पानाला लागली रानातली काळी माती ।।

१३ सतीभामा आगुचर गेली तुळशीला खेटून
असा जरीचा पालव आले मंजूळ तुटून ।।

१४ मागणं आलं गं तुळशी मंजूळाला
तुळशी मंजूळाला बाळ गेले आजूळाला ।।

१५ घराम्होरं आंगण आंगणात तुळस
मला नाही पाणी घालावयाचा आळस ।।

१६ काशी काशी म्हणून लोक जाती गं धावत
काशी माझ्या अंगणात तुळसादेवी हुदर्यात ।।

१७ तुळशी गं बाई हिरवा तुझा पाला
सत्यभामानं गोविंदाला दान दिला ।।

१८ सकाळी उठोनी तोंड पाहिलं एकीचं
माझ्या जीवाच्या सखीचं तुळशाबाईचं ।।

१९ रामाच्या पाहाऱ्यात जागे झाले सारे लोक
तुळशीला पाणी घाली राजा विक्रमाचा ल्योक ।।

२० सूर्यासमुख भद्रीनारायणाचा वाडा
तुळशीला घाला पाणी पाप-पुण्याचा निवाडा ।।

२१ तुळसे तुह्या माळा एका मनाचं ओझं
सावळ्या पांडुरंगा, तालीवार लेणं तुझं ।।

२२ तुळसे तुह्या माळा एका पैश्याच्या नऊ
सावळ्या पांडुरंगा हात पुराणाखाली लऊ ।।

२३ तुळशेबाई वाळूनी झालं क्वाळ
सावळ्या पांडुरंगानं कातुनी केली माळ ।।

२४ तुळशीचा वाफा कशानं रवंदाळीला
अभिमन्यूचं लगीन रथ पांडवाचा गेला ।।

२५ तुळशेबाई तुहे लहान लहान पानं
तुझ्या सावलीला बसविले भगवान ।।

२६ अशी तुळशे गं माई नकू हालू वारियानी
देव वाचितेत पोथी तुझ्या गं निवाऱ्यानी

२७ पहाटेच्या पहाऱ्यात हरिनामाचा गजर
तुळशाबाईचा ना पतिव्रतेचा शेजार ।।

२८ सकाळच्या पहरी मी उघडते कडी
नदरं पडली दारापुढं तुळशीची माडी ।।

२९ असा तुळशाबाईचा हिरवा रस
केळीच्या पानावर गोविंद सोडीतो बारस ।।

३० आशी रुक्मिण म्हणती देवा आवड कोणाची
तुळस गुणाची तप घालिती उन्हाची ।।

३१ आशी रुक्मिण खट्याळ गेली तुळशीला खेटून
तिच्या पदरी गुंतूनी आले मंजूळा तुटूनी ।।

३२ आशी तुळस म्हणती रुक्मिण कशानं थोर
माझ्या ना मंजूळाचे हार गं तुझ्या गळ्यावर ।।

३३ आशी तुळस म्हणती भोपळे माझी सवती
जळू मेली तुझी नवती वेली गेली गुंफावरती ।।

३४ तुळस गं बाई तुझा निर्मळ गंद
निर्मळ तुझा गंद गं लागला तुझा छंद ।।

३५ तुळशेबाई गं तुझा जन्म कुठं झाला
नांगराईच्या तासी एक मोड ना उगवला ।।

३६ केंदारामंधी गं तुळशीबाई तुझं बेट
तुझ्या निवाऱ्याला राम वाची हरिपाठ ।।

३७ सकाळच्या पहारी हात कवाडाच्या मधी
तुळशीच्या वट्यावरी राम गोळा करी गादी ।।

३८ सकाळच्या पहारी हात कवाड्या बाईला
तुळशीच्या ओट्यावरी राम खेळताना पाहिला ।।

३९ आगं सकाळी उठूनी हात कवाड कडीला
बाई तुळशीच्या बनी राम नदरं पडीला ।।

४० आगं पाणी घालूनी तुळशीला आल्या शेंगा
बाई रुक्मिणीबाईची इची प्रतिव्रता गंगा ।।

४१ पाणी घालूनी तुळशीनं केला डेरा
हिच्या सावलीला पोथी वाचीतो हिरा ।।

४२ पाणी घालूनी तुळशीनं केलं आळं
इच्या सावलीला पोथी वाची माझं बाळ ।।

४३ सकाळच्या गं पहारी उघडते मी दार
नजरला गं पडती तुळस हिरवी गार ।।

४४ सत्यभामाला साडी रुक्मिणीला दोरवा
तुळशीबाईला थंड पाण्याचा गारवा ।।

४५ तुका गेले वैकुंठा नाही कुणाला माहित
तुळशीचं रोप लाविलं गं स्वर्गीयेला माहित ।।

४६ ज्याच्या वाड्या नही तुळस त्याचा वाडा म्हसनरवाई
माझीयाना वाड्यामंधी जागा कर तुळशेबाई ।।

४७ अशा तुळशाबाईचा हिरवा पाला पिवळा रस
केळीच्या मग पानावरी गोविंदा सोडीतू बारस ।।

४८ अगं ती तुळस म्हणती रुक्मिण कशानं थोरली
माझ्या ना गं मंजुळाची इच्या नथीला आरली ।।

४९ तुळशीच्या गं बाई वाळूनी झाल्या काड्या
आदी म्हण चल गिरीजा पांडवाच्या वाड्या ।।

५० सकाळी उठूनी हात तुळशीला जोडीते
रामाच्या सेवेला गं मंजुळा तोडीते ।।

५१ सकाळी उठूनी तोंड पहावा एकीचं
पहावा एकीचं दारी तुळस गं सखीचं ।।

५२ तुळशीच्या बनी इला नाही ना गं कोणी
मुखामंधी दात काळे अंगी उकलती वेणी ।।

५३ तुळशेबाई तुला नाही नाक डोळे
अगं भाळले गोविंद मुखामंधी दात काळे ।।

५४ माझ्या अंगणात गं तुळशाबाईचं बहुलं
असे उमठले बाई गं श्रीकृष्णाचे पाऊल ।।

५५ अशी सकाळी उठूनी नं तोड पाहिलं एकीचं
तोंड पाहिलं एकीचं नाही तुळस सकीचं ।।

५६ कम्हून तुळसबाई का गं वाऱ्यानं हालती
मंजूळ गं तुझा वारा गोविंद देवाला घालती ।।

५७ अशी तुळसेबाई म्हणं मला कशाचे मायबाप
वरसला मेघराजा धरती उगवलं माझं रोप ।।

५८ अशी तुळसबाई म्हणं वाऱ्यानं गं लवू किती
असं माझ्या सावलीला शंकराची पिंड राहती ।।

५९ अशी तुळसबाई म्हणं मला कशाचे गं केस
असा हिरा पाला वर मंजुळाचे घस ।।

६० तुळस गं वाळूनी गेली खाली राहिल्या गं काड्या
अशा भोळ्या इठ्ठलानी भरल्या गाड्या ।।

६१ सकाळी उठूनी मला लाभ कशाचा गं झाला
तुळशी कड्यावरी राम कुंडल सोडूनी गेला ।।

६२ राम म्हणू राम राम माझे ब्रह्मचारी
क्रिष्ण अवतारी छंद राधिकेचा धरी ।।

६३ बाई ती रुक्मिण पडं तुळशीच्या पाया
देव गेले दानाला चल जाऊ सोडावया ।।

६४ रुक्मिण नार बोलं देवा कीर्तनाला जाता
गळ्यातली तुळशी माळ प्रितीची संग ठेवता ।।



६५ रुक्मिणीला साडी चोळी सत्यभामाला हिरवा बांड
तुळशीबाईला वाहायला केला रेशमाचा कांड ।।

६६ तुळशीच्या माळा पैशाला चार चार
देवा इठ्ठलाच्या गळ्या झाला भार ।।

६७ तुळशीच्या माळा एका बैलाचं ओझं
पंढरीराया माझ्या वतनदाराचं लेणं तुझं ।।

६८ पंढरीला गेल्या माझ्या शेजेच्या गडणी
तुळशाबाईची रोप चंद्रभागेच्या कडनी ।।

६९ विठ्ठल विठ्ठल हाका मारते वनात
हातात विणा उभा तुळशी बनात ।।

७० तुळशीबाई पतिवर्ता तिची मस्करी कुणी केली
हरिचंदर राजायानी तिची मंजूळा हालविली ।।

७१ सकाळच्या पहारी लाभ कशाचा गं झाला
तुळशी वृंदावनी करंडा कुंकवाचा घावला ।।

७२ तुळशीबाई वली वली तुही माती
गोविंद तुझा पती पानी घालते अर्ध्या राती ।।

७३ राही रुक्मिणबाई दोघी बोलती कोनामंदी
दारीची तुळस तप करीती उन्हामंदी ।।

७४ माझ्या अंगणात उभी तुळस मालन
हिच्या स्वयंवराला देव येती चालून ।।

७५ माझ्या अंगणात तुळशीबाई तुझी माडी
मंजुळा तोडायला गोविंद लावी शिडी ।।

७६ माझ्या अंगणात तुळशीबाई तुझा वाफा
मंजुळा तोडायला गोविंद घाली खेफा ।।

७७ तुळशेबाई तुझी मंजुळी कवळी
भाळले गोविंद बहू सुरत कवळी ।।

७८ तुळस भोपळी दोघी लावल्या अंगणी
तुळस ठेंगणी भोपळा गेली गगणी ।।

७९ तुळशीच्या बनामंदी टाकली गं बाज
वाऱ्याच्या झुळकीनं गोविंदाला आली नीज ।।

८० तुळशीच्या पानाच्या शिवल्या पत्रावळी
जेऊनिया गेले द्वारकेचे वनमाळी ।।

८१ तुळशाबाईला न्हाहीत गं नाक डोळं
सावळ्या पांडुरंगाच्या हुरद्यावरी लोळं ।।

८२ दारी तुळस वृंदावन वाडा कोन्या मालकाचा
तुळशीला घाली पानी सोगा सोडूनी धोतराचा ।।

८३ सरलं दळण खाली मोत्याची ओंजळ
सोन्याची तुळस वरी मोत्याची मंजूळ ।।

८४ तुळशीला घाली पाणी तुळस वाड्या गेली उच
बया माझ्या महालनीचा पतिवर्तेचा वाडा तोच ।।

८५ रुक्मिण रुसली गेली बदामी तळ्याला
सावळा पांडुरंग पानी घालितो तुळशीला ।।

८६ अशी तुळस बोले काय रुक्मिणी तुझा तोरा
माझ्या मंजिऱ्याचा विठ्ठल लेतो नित तुरा ।।

८७ सुकल्या तुळशी पाणी जाऊ द्या बागाशी
माळ्याच्या मळ्यात माळीण बोलती माळ्याशी ।।

८८ पतिव्रता धर्म जाऊन रुक्मिणीला पुसा
तुळशीच्या पाई हरी सोडिला कसा ।।

८९ जिला नाही लेक तिनं तुळस लावावी
घालितो येरझारा तिथं गोविंद जावाई ।।

९० सकाळी उठून मी गेले बाहेर सभागती
दारी तुळस कुंकू लेती हाती करंडा माझ्या देती ।।



९१ जाईच्या फुलांची शेज बडव्यांनी केली दाट
तुळशाबाईची हरीला रुतती कवळी देठं ।।

९२ जाईच्या फुलांचा वास सुटला कथेमंदी
तुळशी सखीचा गजरा साधूच्या हातामंदी ।।

९३ तुळशीबाई तुझ्या खाली गं चिखल
तुझ्या भेटीसाठी देव आल्यात इठ्ठल ।।

९४ तुळशी गं बाई हिरवीगार तुझी फांदी
तुझ्या सावलीला उभे महादेवाचे नंदी ।।

९५ सकाळच्या पारी हात चौकटी बाईला
तुळशीच्या ओट्यावर कृष्ण रांगता पाहिला ।।

९६ गोविंद नकल्या वजनी घालतोय सोनं
वजनी घातली तुळशीची दोन पानं ।।

९७ गोविंद नकल्या हार मोजितो राहिचा
वजनी घातला पाला तुळसा बाईचा ।।

*

## v) चंद्रभागाविषयीच्या ओव्या

१ चंद्रभागा तुझा खडा हाई हिऱ्याच्या मोलाचा
असा देव नाही कुठं पांडुरंगाच्या तोलाचा ।।

२ भरली चंद्रभागा नावा चालल्या नाचत
विठ्ठल म्हणतू रुक्मिणी नाही पुंडलिक वाचत ।।

३ भरली चंद्रभागा पाणी लागं लिंबाला
ज्ञानोबा-तुकोबा उभे गरुड खांबाला ।।

४ पंढरी पंढरी घोकू नाही येड्यावाणी
चंद्रभागा तुझं पाणी धावा घेतं घोड्यावाणी ।।

५ भरली गं चंद्रभागा पाणी लागलं येशीला
देव गेलेत काशीला मामा मुऱ्हाळी भासीला ।।

६ भरली चंद्रभागा पाणी झालं रानूमाळा
बाई वाहूनी चालली विठ्ठलाची धर्मशाळा ।।

७ भरली गं चंद्रभागा दगूड गेला लहान थोर
मग ती रुक्मिण विठ्ठलाचा झगा धूती पायावर ।।

८ भिमा आणि चंद्रभागा मधी कुंडलिक उभा
म्हणं त्या आवडीचे नाव ठेविले पांडुरंगा ।।

९ भरली चंद्रभागा नावा चालल्या वाहूनी
विठ्ठलाची रुक्मिण आली आरती घेवूनी ।।

१० भरली गं चंद्रभागा पाणी लागलं लिंबाला
विठ्ठलाची रुक्मिण उभी गरुड खांबाला ।।

११ पंढरीला जावा संग न्यावा आईचं लुगडं
भरली चंद्रभागा नाही भिमाला दगड ।।

१२ भरली चंद्रभागा नावा लागल्या बुडाया
विठ्ठलाची रुक्मिण चालली नारळ फोडाया ।।



१३ भरली चंद्रभागा नावाचा घोडा बुडं
विठ्ठलाच्या रुक्मिने पतिव्रता होय पुढं ।।

१४ भरली चंद्रभागा पाणी लागलं पायरी
बोलं रुक्मिण येरे पुंडलिका बाहेरी ।।

१५ भरली चंद्रभागा पाणी लागलं गं वडाला
बोलती रुक्मिण गं माझा पुंडलिक बुडाला ।।

१६ रात झाली मला चंद्रभागेच्या पाण्या जाता
पांडुरंग चौकीवाला वाटेत उभा होता ।।

१७ भरली गं चंद्रभागा कुणीकडं जाता बघा
पुंडलिक गं बंधू मधी निशान करी उभा ।।

१८ आषाढी गं कार्तिकी झाली पताकांची दाटी-वाटी
झाली दर्शनाला गं गर्दी चंद्रभागेच्या वाळवंटी ।।

१९ भरली गं चंद्रभागा पाणी उडतं भाला भाला
धाराला गं दिला डेरा माझा कुंडलिक बुडाला ।।

२० भरली गं चंद्रभागा अशी निघाली रागं-रागं
वामणभाऊ-भगवान गं राहिलेत मागं-मागं ।।

२१ भरली चंद्रभागा पाणी लागलं गं भराला
विठ्ठलाची रुक्मिण आली ओटी गं भरायला ।।

२२ पहाटच्या समयाला कोंबड्यानं जलदी केली
देव आंघुळीला गेले चंद्रभागा जागी नाही झाली ।।

२३ विठ्ठल विठ्ठल हाका मारीते कव्हाची
भरली चंद्रभागा झाली गरदी नावाची ।।

२४ भरली चंद्रभागा पाणी लागलं पायरी
पंचारती घेवून ये गं रुक्मिणमी बाहेरी ।।

२५ भरली चंद्रभागा पाणी लागलं राऊळी
इठ्ठल बोलं चाल रुक्मिणी देऊळी ।।

२६ भरली चंद्रभागा पाणीयाचा पडं येढा
दासी जनीसाठी बाई देव इठ्ठल येडा ।।

२७ असं सपान पडलं पंढरीला गेल्यावानी
मोकळे माझे केस चंद्रभागेत न्हाल्यावानी ।।

२८ रुसली रुक्मिण उभी राही चंद्रभागेत
सावळा पांडुरंग बाई दंग झाला भजनात ।।

२९ भरली चंद्रभागा वाहून आले तुळशी बेट
पुंडलिक देवाचा पाण्यामंदी मठ ।।

३० बाई माझा नमस्कार चंद्रभागेच्या वाळवंटी
कुंडलिकाच्या ठायी झाल्या संतांच्या भेटी ।।

३१ चंद्रभागेची ती वाळू नाचूनी झाली माती
देवा मह्यचा विठ्ठलाची दिंडी राजसाची आली राती ।।

३२ मह्या घरी तो पाहुणा पंढरीचा पांडुरंग
याला बसायला देते मी मोत्यांचा चौरंग ।।

३३ हात मी जोडीते चंद्रभागेच्या काठाला
साधूसंतांची आली दिंडी उद्धव घाटाला ।।

३४ बाई विठ्ठल पिता रुक्मिण आई
साऱ्या पिरथींमित चंद्रभागेसारखं तीर्थ नाही ।।

३५ रुखमीन म्हणती काय निजलासी देवा
भरली चंद्रभागा आल्या दारामंदी नावा ।।

३६ भरली चंद्रभागा वाहे दुथडी भरून
विटावरी उभा बाई पुंडलिक हात जोडून ।।

३७ उजेड पडला चंद्रभागेच्या पात्रावरी
सावळ्या पांडुरंगाच्या हिरे जडीलेत नेत्रावरी ।।

३८ चंद्रभागाला आला पूर वाहून गेल्या नावा
साधूसंत म्हणत्यात असं कसं झालं देवा ।।

३९ साधूला साधू पुसं पंढरी किती दूर
पांडुरंगाचा वीणा वाजे भीमावर ।।

४० चंद्रभागेला आला पूर पाणी शिरलं गावात
सोन्याची सांगड पांडुरंग निघाले धावत ।।

४१ चंद्रभागेला आला पूर पाणी शिरलं बाभुळबना
श्रीकृष्णाचा पाळणा वासुदेवानं दिला कुणा ।।

४२ चंद्रभागेच्या पुराचं पाणी लागं पायरीला
सावळ्या मह्या विठ्ठलाचा पायवीना भिजला ।।

४३ रुक्मिणीला साडी चोळी सत्यभामेला पातळ
मह्या तुळशबाईला चंद्रभागेचं पाणी नितळ ।।

४४ साधूला साधू पुसं पंढरी हाये कुणीकडं
विठ्ठलानं दिला डेरा चंद्रभागा पलिकडं ।।

४५ अशी पंढरीला जाईन संगे नेईन सासरा
चंद्रभागाला पूर पुढं भिमाचा पसारा ।।

४६ अशी पंढरीला जाईन संगे नेईन माझा भाऊ
चंद्रभागाला पूर भीमाला पाणी बहू ।।

*

## vi) जनाबाईच्या ओव्या

१ असा विठ्ठल म्हणतू उठ जना उजाडलं
गरुड खांबावपरी गं तेज सूर्याचं पडलं ।।

२ विठ्ठल पाहुना जनाबाई तातडी
साळीचे तांदूळ जनी उभ्यानं पारवडी ।।

३ देव बसले जेवायला पोळी ठेविली काढुनी
जेवा जेवा पांडुरंगा जनीला देते वाढुनी ।।

४ देव बसले जेवावया आन पोळी ठेविली ताटाआड
जेवा जेवा पांडुरंगा जनीचे किती हो लाड ।।

५ बाई कुंरदाचं जातं ओढायला अवघडचं
जनी संगं बस्स् गळा विठ्ठल सावळ्याचा ।।

६ कुंरुदाचं जातं याला पैतायाचा येढा
जनाबाई तुझ्यासाठी गं विठ्ठल झाला येडा ।।

७ कुंरुंदाचं जातं याला पितळाची पट्टी
विठ्ठल झाला येडा जना तुझ्यासाठी ।।

८ जना बसली न्हायाला पाणी नाही विसनायाला
देव तो पांडुरंग गं पान्हा फोडी पाषाणाला ।।

९ जनी धुती धुणं विठ्ठल गोळा करी
जने चल लवकरी शिव्या देते न घरी ।।

१० अशी रुक्मिण गं म्हणं विठ्ठल बहुरंग्या गडी
जनीला लागं दळू नं जातं फेरारवाली ओढी ।।

११ रुक्मिणी म्हणती जनाबाई कुठं गेली
चाफेच्या झाडाखाली किर्तनाला उभी केली ।।

१२ रुक्मिणी म्हणे जनी मरुन का जाईना
देव तिच्या झोपड्याशी गेल्याबिगार राहिना ।।



१३ रुक्मिण म्हणं देवा जनी आपली कोन लाग
चुकाऱ्याचं गं पाखरू आलं आपल्या आसऱ्याला गं ।।

१४ रुक्मिण म्हणं यॉड लागलं देवाला
शिवनारी वारू जातो जनीच्या गावाला ।।

१५ असे विठ्ठलाचे पाय दाबी रखमा रागं-रागं
अशी रुक्मिण म्हणं जना तुमची कोन लागं ।।

१६ भावाचा भुकेला दिष्टी पडना ना कोनाच्या
जनी दासीइच्या घरी पाट्या उचली शेणाच्या ।।

१७ जातीयाच्या तळी चुड भरली गव्हाची
उठ रुक्मिण जनी दळती कव्हाची ।।

१८ भरली चंद्रभागा पाणीयाचा पडं येढा
दासी जनीसाठी देव इठ्ठल येडा ।।

१९ जनाबाई धुती धुणं देव पिळं करी
जना लवकर निघं सासुरवास होईन घरी ।।

२० पंढरपुरात झाली चोरी जनीचा गेला तवा
अवघ्या पंढरीत दवंडी द्यावा नामदेवा ।।

२१ पंढरीच्या शेती जना खुरपती मेथी
वाऱ्यानं येती ऐकू पांडुरंगाची पोथी ।।

२२ पंढरीच्या शेती जना खुरपती राळा
वाऱ्याने येतो ऐकू देवा विठ्ठलाचा गळा ।।

२३ पंढरपुरात जनाबाई गं सुगरण
अशी थापिती गवऱ्या चंद्र-सूर्याची घडण ।।

२४ पंढरपुरात गं जनीला नाही कुणी
हातात घेतली फणी विठ्ठल घालितू वेणी ।।

२५ पुसती रुक्मिण देवा जनी तुमची कोण
खाली बस रूक्मिण जनी माझी धर्माची बहिण ।।

२६ विठ्ठलबाबा बोलं जनी करावा दळण
आलेत साधुसंत दारी पाऊस आंगण ।।

२७ विठ्ठल बोलं जने तू माझं लेकरू
येडे राहीबाई मनी किंतु नकू धरू ।।

२८ पहाटं रामाच्या पहारी दळाया उठं जनी
सावळ्या विठ्ठलाचा ईना ठेव अंथरूनी ।।

२९ जनीला न्हायाला गं पानी नाही विसनायाला
घेतली कावड विठू गेला गं भिमाला ।।

३० विठ्ठल विठ्ठल हाका मारीते राऊळात
हातात टाळविना उभी जनीच्या राऊळात ।।

३१ गोपाळपुऱ्या जाया जनीला झाली रात
पिरतीचा पांडुरंग नित लावी चंद्रज्योत ।।

३२ दिवाळी सणाला पंढरपुरात आनंद
जनी ओवाळी विठ्ठलाला रुक्मिणीची नणंद ।।

३३ असा माझा दंडवत गरूडखांबाला घाली येडा
बोलतू असा इठ्ठल जनी आली वाट सोडा ।।

३४ विठू गं विठू म्हणूनी शोधिते आळोआळी
सावळा माझा पांडुरंग गं जनीचं पीठ चाळी ।।

३५ विठू गं विठू म्हणुनी हाक मारिती जनाबाई
सावळा पांडुरंग धावून येतो लवलाई ।।

३५ सकाळच्या पहारी जनी झाडलोट करी
सावळ्यानं घेतली कावड गेला भीमेवरी ।।

३७ पंढरपुरामधी कशाची झाली चोरी
जनाबाईचा गेला तवा बोलला श्रीहरी ।।

३८ देव बसले भोजनाला पोळी ठेविली काढूनी
देव विठ्ठल बोलतू नेतो जनीला वाढूनी ।।

३९ रूक्मिण म्हणे देवा जनीचं काय नातं
वनवासी पाखरू राती वळचणीला आलं होतं ।।

४० देव विठ्ठल बोलतू माझ्या जनीला नाही कोणी
चल तुळशीच्या बनी घालू तिची वेणी ।।

४१ रूक्मिणीबाई जेवू घाली दूधं ताजी केळं
विठ्ठलाला आवडतं जनाबाईचं ताक शिळं ।।

४२ विठ्ठल म्हणूनी हाका मारीतो बडवी
सावळा पांडुरंग देव जनीच्या पडवी ।।

४३ विठ्ठल विठ्ठल म्हणून हाका मारितो गवळी
सावळा पांडुरंग देव जनीच्या देऊळी ।।

४४ रूक्मिणी वाढी जेवण देव ठेवितो काढुनी
देवा तुम्ही निवांत जेवा देते जनीला वाढुनी ।।

४५ रूसली रखमीन ती काही केल्या जेवीना दूधभात
सावळा विठू माझा तो का जनीच्या मंदिरात ।।

४६ रूसली रखमीन ती का जेवीना दूधपोळी
सावळा पांडुरंग माझा जनीची शिवी चोळी ।।

४७ रूक्मिण म्हणं देवा बसून घ्यावा विडा
वाजतो असा चौघडा तुम्ही जनीचा छंद सोडा ।।

४८ रूक्मिण म्हणती खाली बसून घ्यावा आन
खरं सांगा देवा जनी तुमची आहे कोन ।।

४९ बोलतू विठ्ठल नको लावू रूक्मिणी पाय
जनीला नाही कोणी आपण तिचे बाप माय ।।

५० रुक्मिण म्हणं देवा बसून घ्यावा विडा
वाजचो असा चौघडा तुम्ही जनीचा छंद सोडा ।।

५१ रुक्मिण म्हणती खाली बसून घ्यावा आन
खरं सांगा देवा जनी तुमची आहे कोन ।।

५२ बोलतू विठ्ठल नको लावू रुक्मिणी पाय
जनीला नाही कोणी आपण तिचे बापमाय ।।

५३ चरणावरी मस्तक ठेविते गं हळूवार
बाई पांडुरंगाचे माझ्या पाय सुकुमार ।।

५४ चरणावरी मस्तक ठेविते हळू माथा
सख्या पंढरीनाथा नेत्र उघड देवा आता ।।

५५ मोठे मोठे डोळे भिवया रुंद रुंद
सावळा पांडुरंग लावी कपाळी गंध ।।

५६ मोठे मोठे डोळे जसे टाळाचे टोपण
पांडुरंगाचं माझ्या रूप लाखाचं देखणं ।।

५७ हिऱ्यामोत्याचे अलंकार वर तुळशीचे हार
पांडुरंगाची दृष्ट काढते मी वारंवार ।।

५८ विटेवरी नीट उभा राहिला कव्हाचा
सख्या पंढरीरायाचा अंत कळेना देवाचा ।।

५९ पोथी पुस्तकाचं यॉड रुक्मिणबाईला
पांडुरंगाच्या पायरीला नामा चाकरी राहिला ।।

६० विटेवरी नीट उभा राहिला सोवळ्यानं
पांडुरंगा माझ्या तुला विनंती जिव्हाळ्यानं ।।

६१ अशी राऊळात जाते दंडभुजा मी रेटूनी
देवा त्या इठ्ठलाला येते सख्याला भेटूनी ।।

६२ पंढरीचा विठू ब्रह्मपुरीला येते जातो
सोन्याच्या ठोकी मेखा वर जरीचे पाल देतो ।।

६३ देवामंदी देव देव विठ्ठल लई काळा
त्याच्या आंघुळीला लागं कस्तुरी सव्वा तोळा ।।

६४ जनी जनी करता जनी तुमची आहे कोण
काय पुसता रूक्मिण जना माझी भक्तिण ।।

६५ गाद्या सतरंज्याच्या रूक्मिण घाली घड्या
सावळ्या पांडुरंगाला आवडती जनाबाईच्या गोधड्या ।।

६६ रूक्मिणीच्या मंदिरी गादी सतरंज्या बक्कळ
सावळ्या हरीला आवडती जनाबाईची वाकळ ।।

६७ देव विठ्ठल म्हणतू जनी माझीया कोणी नाही
चंद्रभागेच्या काठावरी धुणं धूतीया माजी बाई ।।

६८ इठ्ठल देव बोलतू जनी माझी सासूरवाशी
दळणाची पाटी जना तुझ्या उशापाशी ।।

६९ चंद्रभागेच्या तीरी साधुसंताच्या ओवऱ्या
सावळा पांडुरंग थापितो जनाबाईच्या गोवऱ्या ।।

७० असा इठ्ठल बोलतू चल जने गं धूनं धुवू
चंदनाच्या शिळा धुनं गजनीचं धुवू ।।

७१ रुक्मिणीची सेज कस्तुरी कापराची
इठ्ठलाला आवड जनीच्या बोतराची ।।

७२ तिन्हीसांजला जनी रावळाशी गेली
हाती तुळशीमाळ तिनं पुजीला वनमाळी ।।

७३ विठ्ठल म्हणतू लाटेपाशी दिवा लावा
बोलती रुक्मिण संगती जनाला बोलवा ।।

७४ रुक्मिण म्हणे देवा शेला कशानं फाटला
जाता जनीच्या गावाला तुळशीला गुंतला ।।

७५ विठ्ठल म्हणतू नाही जने करमत
कर धुन्याचं निमित्त उभा राहतो भिवरेत ।।

७६ रुक्मिण चोळते पाय शेरभरा लोण्यानं
खरं सांगा देवा जनी कोण हायी नात्यानं ।।

७७ पंढरपुरामंदी तुळशीच्या केल्या तुळ्या
पिरतीचा पांडुरंग जनाबाईच्या बांधी मोळ्या ।।

७८ विठ्ठल म्हणतू चल जने जळणाला
चाफ्या चंदनाची खोड, चंद्रभागेच्या वळणाला ।।

७९ राही रुक्मिणी दोघी करीती येनीफनी
इठ्ठल म्हणतू मह्या जनीला नाही कोणी ।।

८० रुक्मिणीच्या पलंगावरती हायी सोन्याचा पेला
जनाबाईच्या झोपडीत देव मोग्यानं पाणी प्याला ।।

८१ रुक्मिणबाईची नऊ लाखाची पासोडी
देवाला आवडती जाड जनीची घोंगडी ।।

८२ जनी धुनं धुती विठ्ठलाचा झगा
आंबीर बुक्क्यानी दरवळे चंद्रभागा ।।

८३ जनी धुतं धुणं पांडुरंग उभा डगरीला
दोघांच्या गं पिरतीला हासली चंद्रभागा ।।

८४ इठ्ठल त्यो म्हणं, मह्या जनीला न्हाई कोणी
तुळशीच्या बनी विठू जनीला घाली पाणी ।।

८५ विठ्ठल म्हणतू जनी माझी वनवासी
चंद्रभागेच्या तिरावरी धुनं धुतीया उपाशी ।।

८६ देव इठ्ठल जाता राहिना जनीच्या घरा
सावळ्या पांडुरंगाला ध्यास लागला जनीचा खरा ।।

८७ देव बाई दळितो कांडितो लुगडे जनीचे धुतो
जनाबाईसाठी भाकर कळण्या कोंड्याची गं खातो ।।

८८ असा पितांबर मोलाचा जनीला नेऊन दिला
रातच्या समयी जाऊनी जरी पटका विसरला ।।

८९ वाकळ झटकिता पदक भूमीला पडले
लोक बोलती जनीने ते पळविले ।।

९० चंद्रभागे तिरी सूळ तो रोविला
जनीला बांधिता सूळ पाण्याचा झहाला ।।

९१ असा गं बाई दुरूनि दिसतो जनाबाईचा जिना
विसरूनी गं आले देव सावळा हातीचा टाळ विणा ।।

९२ जनी बसली दळाया खुंटा निघाला जात्याचा
हाती वाकस किकरं हरि आला द्वारकेचा ।।

९३ जनी बसली न्हायाला पाणी नाही इसनाया
घेतली कावड देव गेले लहुलाया ।।

९४ जनी बसली न्हायाला पाणी जळतं पोळतं
असं जनीचं सत्व आभाळ मावाचं गळतं ।।

९५ हातात विळा जनी गेली गवताला
विठ्ठल हाका मारी रावळा भवताला ।।

९६ बाई रुक्मिण म्हणं देव इठ्ठल कुठं गेला
दळण दळायला जनी दासीनं लाविला ।।

९७ रुक्मिण म्हणती देवा लाज धरा थोडी
शालजोडी सोडूनिया वाकळेची काय गोडी ।।

९८ देव विठ्ठल म्हणतू जना आमुची बहीण
रुक्मिणी नारीनं कशी मांडिली दईन ।।

९९ देवाच्या देवळात बडवे बोलती सकळ
देवानं पांघरली जनाबाईची वाकळ ।।

१०० शुक्राची चांदणी गाईच्या गोठ्या मागं
सावळा पांडुरंग जनीला दळू लागं ।।

१०१ देव विठ्ठल बोलतू जनी माझी सुगरण
निरशा दुधाला साखरेचं विरजण ।।

१०२ पंढरपुरात बाई मी पुसते विठ्ठलाचा वाडा
सावळ्याच्या तसबीरीखाली जनाबाई टाकी सडा ।।

*

# एकादस

१ एकादसीबाई तुझा जन्म कुठं झाला
गंगामाईच्या कडाला एक मोड उगवला

२ एकादसीबाई आधी ये गं माझ्या आळी
बंधू माझा व्रत पाळी कापूस तुळसीला जाळी

३ एकादशी बाई तुझं नाव सरस
चिंचा नां पानावरी गोविंदा सोडीतू बारस

४ एकादस गं बाई तुझं नाव राहिरंभा
साधूच्या नां फराळीला खडीसाखर पिवळा आंबा

५ एकादस बाई तुझं व्रत गं मनकाही
व्रत मन काही राती धरना गं लवंगाबाई

६ सडा गं सारवन तुझ्या मना गं आलं काही
मनका गं पाहूनी आली एकादसबाई

७ एकादसीबाई आज कुठं राही मन
अगं गाव पैठण एकनाथाचं दुकान

८ एकादसीबाई तुझं कुठवर जानं
पंदरवाडी गं एकादस घरी गं केलं माझ्या येणं

९ बारा महिन्यात चोवीस एकादसी
घेई संताचा विसग गं शेजारी गौतम ऋषी

१० एकादसीच्या दिशी कारलं वांग्याला लाविना हात
अगं मजला पाहुणा नारायन तारकनाथ

११ एकादसी बाई नाव तुपलं निर्मळ
तुला नां धरायाला मन माझं घुटमळ

१२ आगं एकादसी बाई आधी गं माझ्या वाड्या
हाळदी कुंकवाच्या पुड्या टाकी येता जाता पायघड्या



१३ आखडी एकादसी कोण्या पाप्यानं गं मोडीली
बाळ्याला तरी माझ्या साधूला गं घडली

१४ सडा ना गं सारवन करते ना गायीच्या शेणानी
एकादशे ना बाई आली पाहुणपनानी

१५ आखाडी मग एकादस पापी म्हंण खर्च झाला
गुरू मह्या महाराजाचा साधूचा सण आला

१६ पंदरवाड्याच्या परिस महिना एकादस बरी
महिना एकादस बरी मला ना दिला वारकरी

१७ एकादसेबाई निर्मल तुझा धंदा
निर्मळ तुझा ना धंदा लागले ना मला तुझा छंदा

१८ सड ना रासवन चौका देते अंगनात
पतीना याला गं माझ्या एकादस ब्राह्मणला

*

### प्रकरण सहावे

# संकीर्ण संदर्भात (विविध दैवते)

## i) सूर्यनारायण ओव्या

१ सकाळच्या पहारी मी उचलते फडा
झाडून काढते देव नारायणाचा वाडा ।।

२ सकाळच्या पहारी झाडाझुडायची घाई
देव नारायण पारशावर थांबायचे नाही ।।

३ सकाळच्या पहारी मी झाडिते लोटिते
उगवले नारायण त्यांना बसाया टाकते ।।

४ उगवले नारायण काय सांगू यांचे गुण
सोनियाच्या तारा पिवळं पडलं ऊन ।।

५ सकाळच्या प्रहरी मला झाडायचा पाट
देव सूर्यनारायणाची माझ्या दारापुढून वाट ।।

६ सकाळच्या प्रहरी सड्यामांगे सारवण
उगवले बाई तुळशीबाई नारायण ।।

७ उगवले नारायण गाडीचं चाक
जोडीते हात पृथ्वी नऊ लाख ।।

८ उगवले नारायण रूप बाळाचे घेऊन
चालले मावळ्या शेर दुनियाला देऊन ।।

९ उगवला नारायण उगला आगीचा भडका
शिराळाचं राज्य करी चंद्र माताचा लाडका ।।



१० उगवला नारायण उगवता लाल लाल
ज्ञनंत्या बाळा माझ्या त्याला रामराम घाल ।।

११ उगवला नारायण जसं तान्हं बाळ
आले जवानीत मग होई पायपोळ ।।

१२ सूर्यनारायण देवा हळूहळू ताप
कोण्या गावा गेलं माझ्या लावणीचं रोप ।।

१३ सूर्यनारायण देवा असं उगवावं माझ्या दारी
दह्या दुधाची करावा न्याहारी मग धुंडा पृथ्वी सारी ।।

१४ देवामंदी देव बाई देव नारायण थोर
आकाशी त्याचं घर बघू देईना डोळाभर ।।

१५ उगवला नारायण जणू अग्नीचा भडका
हळदी कुंकाचा त्याच्या, ध्वजाला सडका ।।

१६ उगवले नारायण माझ्या दरवाजाच्या कोनी
बाई असे मी नारायणाला ना हात जोडीते दोन्ही ।।

१७ नारायण देवा तुला पसरीते ओंजळ
तुळशीच्या रोपाखाली करावी आंघोळ ।।

१८ नारायण देवा मी झाडीते ओटा
मह्या राघूच्या आयुष्याचा स्वार्थ ना मोठा ।।

१९ पतिव्रतेचा नेम पतिव्रतेला पुसा
तुळशाबाईनं सूर्य अडविला कसा ।।

२० उगवले नारायण माझ्या वसरी येवूनी
बाबा बयांना मंग घेते पत्रिका देवूनी ।।

२१ उगवले नारायण उगं गावाच्या खालती
बघ तू बाई तालामाला दुनिया कशी ती वरती ।।

२२ उगवले नारायण मगं गावाच्या गाव कोसी
मगं उभा राहूनश्यांनी पाही दुनिया दिसती ती कसी ।।

२३ उगवले मग नारायण उभं राहूनश्यांनी पाही
इमानाची दुनिया आता राहिली नाही ।।

२४ सकाळच्या पाहरी उन पडतं पिवळं
उन पडतं पिवळं सूर्यनारायणाचं जावाळ ।।

२५ सकाळच्या पाहारी चंद्र दिसं लालूलाल
दिसं लालूलाल झेंडूमंधी मखमल ।।

२६ उगवले नारायण जसा आगीचा भडका
बाई मावळायाला गेला चंद्र माईचा लाडका ।।

२७ उगवले नारायण बाई मी काय मागू त्याला
चुडीयाचं राज मला अवूख माझं त्याला ।।

२८ उगवला नारायण वाड्या आहेवाच्या गेला
मालनीच्या माह्या रंग चुडीयाला दिला

२९ उगवला नारायण किरण टाकी झाडावर
मालनीच्या गं माझ्या रत्न झळकती चुड्यावर

३० नारायण बप्पा मागत नाही काही
चुड्या न बंधू राज माझा जन्माला जाई

३१ नारायण बप्पा मीत काही मागु तुला
चुड्याचं राम राज्य जाऊ म्हणं जन्माला

३२ उगवले नारायण वरती जायची वड
मग माझ्या दारापुढं रथ घडीभर सोड

३३ नारायण बप्पा वर ये तू बीगी बीगी
चुड्यानं राघूबाला आवक मागायला उभी

३४ उगवले मग नारायण यावा माझ्या ओसरीला
चुडे दान द्यावे मला पदर मी पसरला

*



# ii) कानिफनाथाच्या ओव्या

१ कान्होबा पासून माईंबा किती उंच
शोभा देती याच्या गडावर चिंच ।।

२ कान्होबा माईंबा दोन्ही जातीचे ब्राह्मण
मध्ये त्यांना दाळीबं जामीन ।।

३ कान्होबा गडावरी डवणा विक काडीकाडी
दर्शनाला गेली माझ्या बंधवाची जोडी ।।

४ निवडुंग्यापासून मढी आहे सव्वा कोस
डवणीची पाटी माळींन चालली सावकास ।।

५ कान्होबा मायंबा बालपणीचे संगती
हातामधी हात घाट मढीचा नेंघती ।।

६ डवण्याची रोपं मढी निवडुंग्याच्या रानाला
देव कान्होबाला वीडे नवनाथाला ।।

७ कान्होबा म्हणतू मायंबा माझ्या भावा
धोंडूबाई दऱ्यामंधी कोणी वाजविला पावा ।।

८ कान्होबा मायंबा दोन्ही वळीती गाई
लिंबलोन करी बहिण यांची धोंडूबाई ।।

९ देव कान्होबाची पायरी शेवाळली
बाळाच्या बाई माझ्या खांद्यावरी कावड हिंदकळली ।।

१० कान्होबा तो मायंबा हाइत मढीच्या रानात
आंघोळीला पाणी यांना जांभूळ बनात ।।

११ कान्होबा राया तुझ्या पायरीला चुना
दर्शनाला येत्यात बाई गोंधण्याच्या सुना ।।

१२ कान्होबा राया तुझ्या पायरीला माती
दर्शनाला येत्यात बाई आम्ही तुपीयाच्या नाती ।।

१३ कान्होबा म्हणतो मायंबा माझ्या भावा
धोंडूबाई मंजिरी कोणी वाजविला पावा ।।

१४ शिमग्याचा सण नाही मढीच्या बयाला
लागलंय तेल कान्होबा रायाला ।।

१५ मढी निवडुंग्यात नाही चालत औत
देवा कानिफनाथाचं गं याचं बसलं देवूक ।।

१६ देवामंधी देव कान्होबा किती उंच
लवलव करी बाई याच्या गडावर चिंच ।।

१७ माझ्या गं अंगणात टाळ मृदुंगाचं पोतं
देवा कानिफनाथाचं राती किर्तन होतं ।।

१८ बाई मायंबा कान्होबा अनं दोन्ही चालले मढीला
असे सर्पाचे कासरे अगं वाघ जुंपीले गाडीला ।।

१९ असा मायंबा म्हणतो कान्होबा तू माझा भावू
असा आपला रे भाऊपणा मान बहिण दाळींबीला देवू ।।

२० बाई देवामंधी देव कानिफनाथाची आईट
असा इथून दिसतो मढी गडाचा लाईट ।।

२१ देव कानिफाची याची काठी मी धरीन
अशा सोन्याच्या सानका अन वर मलिदा भरीन ।।

२२ आमच्या माहेराचा देव आम्हा बहिणीला लागतो
देव गं कान्हूबा वर्साला मलिदा मागतो ।।

२३ देव देव करीत मी तर गेले रावळात
देव गं कानिफनाथानी मोती दिले अंगाऱ्यात ।।

२४ माझ्या कान्हुबाच्या रे याच्या पायरीला टाकी
येवूत दर्शनाला मांडकाराच्या लेकी ।।

२५ माझा कानिफनाथ वर्षाची वर्षा नवरा होतू
निवडुंग्याचा माळी गाडीवरती डवणा नेतू ।।



२६ लेंडुग्यापासून मढी आहे सव्वा कोस
डवण्याची पाटी नं माळीन चालं सावकास ।।

२७ देव कानिफनाथ कसा ना रे झाला
मंत्राचा जोर केला वारा खेळायला गेला ।।

२८ आरे कानिफनाथ रे तुझ्या हातामंधी साकळी
मंत्र बोलं संजीवनी हवा खेळू दे मोकळी ।।

२९ हाताच्या ससोबा ना नाव घेते जवा जवा
सांगतो माझा कानिफनाथ घेते संकटाला दवा ।।

३० गर्भागिरी डोंगरात नंदी शिजले भाताचे
कान्होबा मायंबा सांगतात गुण दत्ताचे ।।

३१ गर्भागिरी डोंगरावर यज्ञ झाला भारी
अनुसया तुझ्या बया बोल कैलासाच्या रानी ।।

३२ बारवाचं पाणी दिसतं गांजं गांजं
कानिफनाथाची पूजा होते दोन्ही सांजं ।।

३३ बाई जाईची सावली समाधीवरी आली
कानिफनाथाची पूजा आरतीनी झाली ।।

३४ मढी लेंडूग्याच्या बयांनो धुनं गं धुऊ नका
माळी गं हाकी मोट पाणी जातं डवण्या रोपा ।।

३५ कान्हुबा मायंबा बालपणाचे मैतर
घेतली दोघांनी समाधी सव्वा कोसाचे अंतर ।।

३६ अशी देवा कान्हुबाची दाळींब कोणी हालयली
बाई पुत्रवंत झाली नाडा सोडायला गेली ।।

३७ मढीच्या वाटानी किती फुपाटा मातला
नेणता बाळ माझा कावड्या नाचला ।।

३८ अलिकडं चिंचपूर पलिकडं करवडी
राजा मह्या कानिफाची मधी फकिराची माडी ।।

३९ गाव चिंचपुरी वस्ती सामसूम झाली
राजा मह्या कानिफाची धुंड फकिराची आली ।।

४० गाव चिंचपुरीचा मोठा पाटील इमानी
राजा मह्या कानिफाच्या नगरखाण्याला कमानी ।।

४१ कानिफनाथाच्या मंदिरी काय दिसतं गुपीत
कानिफनाथाचा घोडा पांढरा शिपीत ।।

४२ गंगाच्या पाण्याला देवा कान्हुबा तान्ह्याला
नेणत्या बाळ माझा कावड्या शिंनला ।।

४३ कानिफनाथाच्या मलिद्याला झाली रात
जाईचे वन घनदाट मला सापडंना वाट ।।

४४ येडा गं माझा जीव काय करितू घरात
देवा मह्या कानिफाचा आला छबीना मिरत ।।

४५ पलिकडं कानिफनाथ अलिकडं वेताळ
दोहीच्या मंधी नदी चालली नितळ

*



# iii) लक्ष्मीमातेच्या ओव्या

१ आली लक्ष्मी आली अंधार करूनी
लाडाचा हरी माझा गं उभा कंदील धरून ।।

२ आली लक्ष्मी लक्ष्मी उडी टाकिली वाड्यात
जोडीचे गं बाळ माझे उभे बैलाच्या राड्यात ।।

३ लक्ष्मीगे बाई तू का गं तिथे उभी
चल गं जाऊ वाड्याला दोघी ।।

४ लक्ष्मी गं लक्ष्मी आली उठत बसत
बाई राघूचा माझ्या गं वाडा गवळ्याचा पुसत ।।

५ आली आली लक्ष्मी दिला कवडाला धक्का
अन् जागा होय ना माझ्या लेका ।।

६ आई लक्षीमे शेंडी गं तुही शेंदराची
अशी मारिती हेलवा वर फांदीली मह्याची ।।

७ आई लकशीमें तुला गं फुलाचं पातळ
मह्या बाळाच्या गावाकं साल जाऊंदी सिताळ ।।

८ अग आई लकशीमे तुला शेवायाचा थाळा
सुकाया ठेव बाई खेडकराचा मळा ।।

९ लकशिमे आई तुला वाहीन कंबाळ
वाहीन कंबाळ मह्या भावाला सांभाळ ।।

१० लकशिमे आई तुह्या गं साराईते वटा
तुहा सारईते वटा मला गं सापडलया नोटा ।।

११ लकशिमे आई तुह्या गं साराईते भिंती
तुह्या साराईते भिंती मला गं सापडले मोती ।।

१२ लकशिमे आई तुही साराईते जोतं
तुही साराईते जोतं मव्हा गं राऊळी गोतं ।।

१३ लकशिमे आई तुही साराईते न्हाणी
तुही साराईते न्हाणी मला सापडली फणी ।।

१४ सकाळी उठुनी सडा टाकिते दह्याचा
लकशिम्या बाईचा रस्ता सयाचा जायाचा ।।

१५ सोन्याचं तामान हळदी ना कुंकानं घाशिलं
काळूबाई फरसाण अवघ्या गल्लीनं वाटीलं ।।

१६ या आसरा या बाई बसल्या दाटूनी
माझिया बाबाला विद्या गं मागती वाटूनी ।।

१७ बाजी बाबयाची विद्या गं बाई वडाच्या पानात
नाचीईती भूत या बाई बॅन्डाच्या तालात ।।

१८ लक्ष्मीबाई कोण्या राजाला पावली
वर चिंचाची सावली धज सोन्याची लावली ।।

१९ लक्ष्मीबाईची गाव गाव फेरी
तुह्या पालखीची दोरी ।।

२० लक्ष्मीबाईची गाव गाव झेंडा
तुह्या पालखीचा गोंडा ।।

२१ नवस बोलले लक्ष्मीबाईच्या देवळी
अनं तुला पानाची कवळी ।।

२२ लक्ष्मीबाईचं वल्या केसानं देऊळ झाडीन
केला नवस फेडीन ।।

२३ संपतीच्या ती नार संपतीच्या गंवरत
जोंधळे गं महाराज ईने लाविले खेळत ।।

२४ आली आली गं लक्ष्मी पांगळ्या पायाची
बोलली राघूला नाही माघारी जायाची ।।

२५ आई लक्ष्मीबाई करीती पाणी पाणी
देव्हाराच्या कोणी हंडे भरलेत दोन्ही ।।

२६ आली आली लक्ष्मी गं बांद शेताचा चढ
सावळा भाऊराया हाती गोफन पाया पड ।।

२७ असं गाव वरखेड तांब्याला तांब्या दाट
न्हाली माझी लखाबाई न गंगूबाईला गेला लोट ।।

२८ अग वरखडा जाया अवंदा माझं नव्हतं मन
आई माझ्या लक्ष्मीनीनं चिठ्या पाठवल्या दोन ।।

२९ अग वरखड्या जाया अवंदा नव्हती माझी छाती
वरखड्याची लखाबाई गं सपनात आली राती ।।

३० असं सपन गं सपन पडलं पहाटं पहाटं
व्होते केस गं मोकळे इच्या कपाळी मळवट ।।

३१ असं सपन पडलं पडलं ना आर्ध्या राती
आई माझी वरखड्याची वाड्या माझ्या आली होती ।।

३२ वरखड्याच्या वाटान गं वेचिते मी काड्याकुड्या
लखाबाईचे पाऊल जनू रेशमाच्या घड्या ।।

३३ बाई वरखड्याची वाट ना वाट दगडधोंड्याची
आई माझ्या लक्ष्मीची पालखी पिवळ्या झेंड्याची ।।

३४ बाई गाव वरखेड्यात गं ओळखीचं नाही कोणी
माझ्या वरखड्यावालाचे रथाचे गं वाघ दोनी ।।

३५ बाई वरखड्या जाया मला झाली निमी रात
माझ्या वरखड्यावालीचं सख्ख्या बहिणीचं नातं ।।

३६ आई लक्ष्मीबाईनं शिवावरी डेरा दिला
जीव गं माझा भेला कोण राजा उत्तरला ।।

३७ आई लक्ष्मीबाई तुझा शेंदराचा माथा
माझ्या बाळाचा नवस हात जोडीते येता जाता ।।

३८ आई लक्ष्मीबाई तुझा पोतराज येडा
जटा सोडूनी पोतराज घाली मंदिराला वेढा ।।

३९ वरखड्याच्या बया तुझा दगडाचा वटा
जटाया सोडूनी पोतराज आपटी जटा ।।

४० वरखड्याच्या बया उभे दारीच्या कडीला
दिला एवढा मान ये बया मांगाच्या पोरीला ।।

४१ अगं लक्ष्मीबाई तुझी गावू गावी फेरी
सुखी गं ठिव तुझ्या गळ्यातील मिरी ।।

४२ आई लक्ष्मीबाई तुझा गावू गावू झेंडा
सुखी ठेव बया तुझ्या पालखीचा झेंडा ।।

४३ आई लक्ष्मीबाई तुला वाहीन कंबाळ
तुला वाहीन कंबाळ गं एवढ्या तान्ह्या बाळाला सांभाळ ।।

४४ आई गं लखाबाई तुझा शिवावरी डेरा
अगं तुझं नाव गं घेता घेता दुनिया कापं थराथरा ।।

४५ आई गं लखाबाई तुझं सारवीते घर
तुझं सारवीते घर मला सापडला सर ।।

४६ आई गं लखाबाई तुझं गुजावानी डोळं
अगं गुजावानी डोळं अन मारं पोतराज खेळं ।।

४७ आई गं लखाबाई साऱ्या गावाची लाडकी
अशी पांघरूनी आली पान फुलांची फडकी ।।

४८ आई गं लखाबाई तुझं गावू गावी ठानं
अन रसाळ लिंबासाठी आडविला बागवान ।।

४९ आई लखाबाई तुझं तळघर खोल
तळघर खोल अन ऐकून गं वंजाऱ्याचं बोल ।।

५० आई गं लखाबाई कोण्या राजाला पावली
वर लिंबाची सावली धज मोत्याची लावली ।।

५१ लखाबाई आली हाती तांब्या अमृताचा
वाडा पुसती बा ला मपल्या समराताचा ।।



# iv) मोहटादेवीच्या ओव्या

१ मोहट्याची आई कोणा राजाला पावली
हिच्या शिखरावरी धज मोत्याची लावली ।।

२ मोहट्याची अंबाबाई पावती ना याला त्याला
असं बंधवाला माझ्या रावा दे ना गं टोपीवाला ।।

३ बाई बोलले नवस पाच पाण्याच्या घागरी
बाई ती सत्याची रेणुका नांदं अवघड्या डोंगरावरी ।।

४ आंबिकेच्या गं दारामंदी माणसाची झाली दाटी
नेणते गं बाळ माझे खव्याचे गं पेडे वाटी ।।

६ मोहट्याच्या आंबाबाई यावं अलिकडच्या बरगडला
लिंब नारळानी माता हात माझा अवघडला ।।

७ बाई बोलले गं नवस मोहट्याच्या लाडीला
सुताचे केले द्वार वाघ जुंपिले गं गाडीला ।।

८ नऊ दिवसाच्या नऊमाळी दहाव्या दिवशी होम जळं
बाई सत्याची रेणुका सिलींगन खेळं ।।

९ बाई सत्याची सांगते गाव मोहट्याची काशी
काळ्या होत्या बाई इनी केल्या भोऱ्या म्हशी ।।

१० आई मोहट्याच्या बयाचे हिचे तळघर खोल
ऐकू नाही आले हिच्या पुजाऱ्याचे बोल ।।

११ पहाटच्या वेळेस कोंबडा बाग देई
मोहट्याची अंबाबाई हौदाजवळ तोंड धोई ।।

१२ पाच पासुड्याचा मंडप दिला दारी
आई मोहट्याच्या बया गोंधळाला यावा दारी ।।

१३ मोहोट्याच्या आंबाबाई तुझ्या पायरीला सोनं
तुझ्या दर्शनाला आलेत बंधू माझे पहिलवान ।।

१४ गाव नां मोहट्याला यला जोडीचे मारवती
आई ना आंबिका किल्यामंधी पारवती ।।

१५ मोहट्याच्या आंबाबाई आनंद कर माझा
जाईच्या मंडपाखाली घट सावलीला तुझा ।।

१६ आंबिकाच्या गडावरी हिंडत्यात मोरघारी
बोलती जनलोक गाव मोहटा खडकावरी ।।

१८ धन संपत्ती राजा गं पुत्र वाचून घावला
बाई मपल्या मपल्या चुड्याला गं देव मोहट्याचा पावला ।।

१९ बाई मोहट्याच्या आंबाबाई लई सत्याची सांगती
आई आंबाबाई तुझ्या होमात तुपाची घागर जळती ।।

२० आई माझे आंबाबाई नं तुझ्या पायरीला चुना
अशा दर्शनाला आल्या गं बांगरपाटलाच्या सुना ।।

२१ आई माझे मोहट्याचे तुझ्या कोपराला लिंब
कुंडलिक पाटील आले गं दर्शनाला गाव पाथर्डी झालं दंग ।।

२२ अशी आंबाबाई तुझी सेवा कोन करीतो एकला
बाई माझा चुडा ना माय पुत्राचा भुकेला ।।

२३ पहिल्या माळीला उभ्या सारविल्या भिंती
त्याच्यावर काढील्या मोहटा देवीच्या मूर्ती ।।

२४ दुसऱ्या माळीला पाथर्डीला झाली गर्दी किती
आंबिका मातानं गाड्या पाठविल्या राती ।।

२५ तिसऱ्या माळीला डोंगर काळा काळा
त्याच्यावर झळकती आंबिकेच्या दिपमाळा ।।

२६ चौथ्या माळीला उभी होमाला राहीन
आंबिका माताला डोळे भरून पाहीन ।।

२७ पाचीया माळीला घ्यावा आरदनी झाडूनी
आल्यात सया घर संसार सोडूनी ।।

२८ सहाव्या माळीला निसा सयानू तांदूळ
आंबिक्या माताचा इचा घालावा गोंधूळ ।।

२९ सातव्या माळीला जत्रा गेलीया फुलून
हायता पोलीसाच्या राहुट्या दंगा होऊ नये म्हणून ।।

३० आठव्या माळीला उभी आरतीला राहीन
आंबीक्या माताचा इचा अंगारा लावीन ।।

३१ नऊ दिसाचं नवरात्र दहाव्या दिसाचा दसरा
शिलांगण खेळायला आंबा निघाली उशीरा ।।

३२ पहाटच्या पाऱ्यामंधी ना कोंबडा देई बाग
मोहट्याच्या आंबाबाई टाकीवरी धुई अंग ।।

३३ हळूच बोलले गाव मोहट्याच्या लाडीला
नाग सरपाचे कासरे वाघ जुंपिले गाडीला ।।

३४ मोहटादेवी तारकेश्वर दोन्ही नांदते शेजारी
आंबाबाईला पातळ गलप घेते बाजारी ।।

३५ मोहटेचे अंबाबाई तुझे गवंडी इमानी
खाली काढली येस वर काढल्या कमानी ।।

३६ नऊ दिवसाचा उपास फराळाला काही नाही
जावा मोहट्याची आंबिका पलंगी पान खायी ।।

३७ एकामागं एक गाड्या चालल्या वाटाला
आंबाबाईचं काम लागलं वटयाला ।।

३८ मोहटादेवीला जाईन सौभाग्याचं कुंकू लेईन
मह्या आंबाबाईला नारळ खण वाहीन ।।

३९ एकामागं एक गाड्या चालल्या मातीला
आंबाबाईचं काम लागलं भिंतीला ।।

४० आंबाबाई तुझी डोंगरावर माडी
अन खाली उतरून नेस साडी ।।

४१ मोहट्याची आंबाबाई तुझी दिपमाळ उंच
बोलते बाळराजा शालू कंबर बांध कंच ।।

४२ मोहट्याच्या आंबाबाई तुझा दरवाजा खालता
बंधवाचा तरी मह्या कर पाळणा चालता ।।

४३ आंबाबाई तुझ्या बाभळीला झोळ्या
तुह्या तरी दर्शनाला बहिणी माझ्या लेकुरवाळ्या।।

४४ कावडीला गेला म्या तर नही चिंता केली
आनंदी आंबाबाई येसाच्या संग गेली ।।

४५ पाच पासुंड्याचा मंडप दिला करून
आनंदी आनंद आंबाबाई उभी कंबर बांधून ।।

४६ मोहट्याच्या आंबा तुझं डोंगरावरी ठाणं
तुझ्या गं अंगाऱ्यानं येत भक्तयीला गुण ।।

४७ मोहट्याची आंबा तुझा डोंगरावरी वाडा
तुझ्या ना भक्तयानं टाकला डोंगराला येढा ।।

४८ निंद्रुकीच्या फांदीला बत्ती कोणाची जळती
आई गं आंबाबाई दिंडी पाऊल खेळती ।।

४९ आठादिवसाच्या मंगळवारी भक्त महिन्याच्या पुनवा करी
सदा मूळ मायीचा लागीला लोंबी मोहट्याच्या गडावरी ।।

*

# v) कोल्हूबाईच्या ओव्या

१ अशी आनंदी कोल्हूबाई उभी गडावर गं राहिली
हळदी कुंकवाचं ताट मैना मपली गं नाहिली ।।

२ अशी आनंदी कोल्हूबाई खाली ये गं ना बरगडाला
बाई कडाला तान्हं बाळ हात माझा ना अवघडला ।।

३ कोल्हूबाई गडावरी बाई मी वेचिते काड्या कुड्या
आंबाबाईची गं पाऊलं जशा रेशमाच्या घड्या ।।

४ आनंदे गं कोल्हूबाई आनंद कर गड्या माझा
सभामंडप पट्याखाली जोत घट सापडवीते तुझा ।।

५ कोल्हूबाई गडावरी हिरव्या बल ना पाची काडी
तान्हं मपला मोहन भाशा करीन एक्या मांडी ।।

६ कोल्हूबाई गडावरी हिरव्या चाफया चंदनाच्या मेंखा
आवर रे बाळा मह्या घोड बांध ना गंग मुखा ।।

७ कोल्हूबाई गडावरी बाई हिरवा लाईट जळती
भगवान कीर्तन सखे गं पाऊल गं खेळती ।।

८ बाई गाड्यामाघं गाड्या चालल्या वाळूला
असं कोल्हूनाबाईचं काम लागलं गं कावूला ।।

९ बाई गाड्यामाघं गाड्या चालल्या खडीला
असं कोल्हूनाबाईचं काम लागलं गं माडीला ।।

१० बाई गाड्यामाघं गाड्या मधली गाडी ना खजीन्याची
असं कोल्हूनाबाई आत मैना दागिन्याची ।।

११ कोल्हूबाई गडावरी टाक्या पडल्या गं हजार
असं इच्या गं कामयीला दोन्ही गवंडी झालेत मैजेदार ।।

१२ आनंदी ना कोल्हूबाई कोन्या राजाला पावली
असी तुळस ना धज मोत्याची लावली ।।

१३ कोल्हूबाई ना गडावरी चिमण्याला नव्हतं पाणी
तान्ह्या गं मह्या मोहनानं हौद बांधविले दोन्ही ।।

१४ कोल्हूबाई ना गडावरी जाई कशाला लावीली
अशी नारायण महाराज संतानं गं वाट दाविली ।।

१५ धुम्या गडाच्या वाट हुतुत्याला आला बार
असा बांधवाला मह्या कावड्याला सोमवार ।।

१६ असं गाव कोल्हाराला हायीत रूंद रूंद गल्या
आनंदी कोल्हूबाईच्या छबीन्यासाठी ना केल्या ।।

१७ कोल्हूबाइची गं पायरी कशानी शेवाळली
बाई बाळाच्या मह्या खांद्या कावड हिसळली ।।

१८ बाई नवस गं बोलले पाच पाण्याच्या घागरी
हायी ती आनंदी ना कोल्हूबाई नांदे अवघड्या गडावरी ।।

१९ कोल्हूबाईचा दिवा लाविते तुपाचा
बाई माझ्या गं आंबाचा उजेड पडला रूपाचा ।।

२० माझ्या कोल्हूया बाईला दिवा लाविते तेलाचा
बाई पडला उजेड आंबा तुझ्या गं शेल्याचा ।।

२१ माझ्या कोल्हूया बाईला दिवा लाविते लोण्याचा
बाई कोल्हूयाबाईचा उजेड पडला लेण्याचा ।।

२२ अगं कोल्हूबाई तुला दिवा लाविते दुधाचा
बाई पडला उजेड तुझ्या कपाळी गंधाचा ।।

२३ सत्वाची कोल्हूबाई नवस बोलले मनात
पावली मला आंबा भेटली वनात ।।

२४ कोल्हूबाई तुही पायरी गं एकाची
अशी गडावर नांदती आंबा मोकळ्या केसाची ।।

२५ बाई कोल्हूबाई त्यापल्या गं भक्तांना गांजिती
बाई बाळाला गं मपल्या वरसा कावड्या गं मागती ।।



२६ कोल्हूबाई ना तुझं नाव नाव ना घेते झोपामंधी
खडीसाखर ना राजाला येऊन पडला मुखामंधी ।।

२७ कोल्हूबाई ना नावाचा गळ्यामंधी ना माळ
आनंदी कोल्हूबाई ना येवढीना येळ टाळ ।।

२८ कोल्हूबाई तुझं नाव घेते ना घडुघड्या
तान्ह्या मपल्या गं बाळाला द्यावा आवूखाच्या पुड्या ।।

२९ कोल्हूबाईच्या गडाची गं वाट, खड्याखुड्यानी दाटली
कोल्हूबाई ना तुह्यासाठी मला सडक वाटली ।।

३० गाव ना कोल्हूपती ना पलिकडं ना डमाळवाडी
अशी कोल्हूयाबाईयीची गवळगयीची माडी ।।

३१ गडावर एक पाखरू गं रंगाचं
आंबा तुझ्या ना गडावरून पाणी दिसतं गंगाचं ।।

३२ कोल्हूबाई तुझं कोल्हार गं ओळखू येईना भिकाऱ्याला
असा सोन्याचा गं कळस आंबा तुह्या ना शिकराला ।।

३३ आनंदी कोल्हूबाई तुला ना गाण्याची आवड
अशी तुह्या ना गंधराला येती हजार गं कावड ।।

३४ कोल्हूबाई तुझ्या पायरीला चुना
तुझ्या दर्शनाला येती लेकी सुना ।।

३५ आनंदी ना कोल्हूबाई तुला सोन्याचं गं घंगाळ
बाई तुह्या ना वसरीमधी बाळ गं सांभाळ ।।

३६ कोल्हूबाई नकू हिंडू रानू माळ गं
अशा तुझ्या रावळात भक्त वाजगयीती टाळ गं ।।

३७ दुर्गा देवी गडावरी तबला वाजतो तांब्याचा
देव अर्जुनबाबाचा नाव आंमलराजाचा ।।

३८ टाळावाला टाळ वाजी मृदुंग्या आला घाईला
देव अर्जुनबाबानी अभंग चडाचा लाविला ।।

३९ दुर्गादेवीचा डोंगर मी तर येंघते बसून
बाबाच्या गं फराळाला घेते ओलं नारळ किसून।।

४० गडावरी जायाला मला पायी पोळ झाला
गुरू माझा महाराजाचा घाला पोथीचा गुमास्ताला ।।

४१ गडावरी गं जायाला मला निमी रात झाली
देव अर्जुनबाबाची कथा आवरत आली ।।

४२ आई मह्या दुर्गाईचा इचा लागलया गाज
बाळ माझ्या सुर्यालाच्या हाती दिवटीच्या साज ।।

४३ आई मही दुर्गादेवी उभा होती खाली बस
माझ्या बाळाचा नवस साडी सोडून पातळ नेस ।।

४४ दुर्गादेवीची वाट मला सुसाना येडीला
साधु अर्जुनबाबा उभा गडाच्या पाहाडीला ।।

४५ आयानू बायांनू जागा किर्तनाला धरा
साधू अर्जुनबाबा कोन्या मावलीचा हिरा ।।

४६ पैठण वाळवटी राहूट्या दिल्या नऊ
किर्तन सांगायला अर्जुन बाबा तुमचं नाऊ ।।

४७ सोन्याचं घंगाळ त्याला मोत्याची चुंभळ
अन भगव्या झेंड्याखाली अर्जुन देवाची आंघूळ ।।

४८ परसू पाव्हणा आला तुम्ही घोडा बांधा लिमुनीला
अन आंबा गेली गावा बाबा मुक्कामाला रावा ।।

४९ सुपात्यातल्या आंबाबाई तुझ्या फांदू फांदी झोळ्या
तुझ्या गं दर्शनाला आम्ही बहिणी लेकूरवाळ्या ।।

५० आंबाबाई तुझी रस्त्यावरी माडी
सहज ना येता जाता माझे राघू हात जोडी ।।

५१ सुपात्यातली आंबाबाई खाली ये गं बरगडाला
कडा माझ्या तान्ह हात माझा आवघडला ।।



# vi) अन्य देवतांविषयी ओव्या

## दत्तात्रय

१ पहिली गं माझी ओवी ओवी माहूर गडाला ।।
असे दत्तात्रय महाराज अनुसयाच्या कडाला
२ पहिली गं माझी ओवी गायीली पाची देवू
ब्रह्मा-विष्णू-सदाशिवू ।।

## बद्रीनारायण

१ काशीच्या पलिकडं बद्रीनारायण राहतो
गया परिगापासून पुल काशीचा बांधतो ।।

२ काशीच्या पलिकडं बद्रीनारायणाचा वाडा
छपराशी टाकी सडा रोहीदास खेळे गाडा ।।

३ नारायण बप्पा ऐक माझी हकिकत
वाणीची गं खिरापत ।।

४ पहिली वही गायली गुमानीत
चांदीचा विश्वनाथ सोन्याच्या कमानीत ।।

५ काशी विश्वनाथ पाण्यामंधी
बद्रीनारायणासारखे तीर्थ नाही दुन्यामधी ।।

६ पान पड पान पडनं काशीमंधी पान पड
बद्रीनारायणाचं गं याचं तीर्थ लई अवूघड ।।

७ अगं सकाळच्या पहारी गं कोण करी हरी हरी
नारायण ते पारावरी पक्षी बोल गं झाडावरी ।।

# इंद्र

१ चंद्र इंद्र म्हणे मी तर तिरपती झाले
पाची पांडवाच्या मग मी चरणी लागले ।।

२ चंद्र इंद्र विचार करीता राहून
अहिल्याबाईच्या वाड्याला जावू कोंबडे होवून ।।

३ चंदर इंदर विचार करीती मनात
पतिव्रता अहिल्याबाई आहे पोकतीपनात ।।

४ रंक गं इंद्राला पडले भग
पतिव्रता अहिल्याबाई नको लागू रे तिच्या माग ।।

५ डंका डंका नव्हता लागला पहिला
अस्तूरी असूनी गं माता भोगिल्या अहिल्या ।।

# सत्यनारायण

१ देवामंधी देव सत्यनारायण आगळा
याचीया पुजेला लागे आंब्याचा डगळा ।।

२ सत्यनारायणाची पोथी तुम्ही रौका रौका
बाई पुजेला बसली कलावंती निलाबाई ।।

# साईबाबा

१ देव साई बाबा लई दिसाचा म्हातारा
चैत्राचा महिना यांची भरती जतरा ।।

२ बाबाच्या मंदिरात मी गेले होते राती
बाबानी अंगाऱ्यात- दिले मोती ।।

३ बाबाच्या मंदिरात मी गेले काल
बाबांनी बाई दिले अंगाऱ्यात लाल ।।

४ देव साई बाबा कोण्या गोरीला पावला
वर सोन्याचा कळस लाईट लावला ।।

५ सकाळच्या पहारी बाजा वाजतो मंजूळ
बाबाची दह्या दुधाच आंघोळ ।।

६ वार गुरुवार नाही सारलं घरदार
देवा साईबाबा एवढा गुन्हा मांप कर ।।

# दर्गा

१ बाई देवामधी देव राजामलीक एक उंच
अशी शोभा देते बाई त्याच्या दरग्यामंदी चिंच

२ बाई पिंपळनेरीची मोठी नांदणूक सोयीची
राजा मल्लीका पुढे माडी लक्ष्मीम्याबाईची

३ बाई देव मलिकाची बिब्या आईची लाडकी
बिब्या आईची लाडकी मल्लका आधीच फडकी

४ बाई देव मल्लिकाच्या या दरग्यामंदी झाड
मल्लिकाच्या आंघुळीला बिब्याआई पाणी काढ

५ बाई पिंपरनेरीच्या इच्या रुंद रुंद गल्या
बाई देव मल्लिकाच्या छबिण्यासाठी केल्या

६ वाटाच्या वाटसरा काय पाहतूस खेड्याला
असं सोन्याचं कुलुप देव मलकाच्या वाड्याला

७ बाई नवस बोलले माझ्या माहेरीच्या देवा
पाच बकऱ्याची दावण संग मुलान्याच्या रावा

*

# vii) धनगर लोकांचा देव जोतीबा – धुळूदेव व इतर ओव्या

१ बाई देव गं जोतीबाला जाया कालच्याधरूनी माझी तयारी
देव गं माझ्या जोतीबानी गुलालाचे दोन पोते घोडे पाळविले नह्यारी।।

२ देव गं जोतीबाया ग जाया माझं नव्हतं गं यंदा मन
देव जोतीबानी चिठ्ठ्या पाठगयीला दोन ।।

३ बाई देव ना फलटन गावाला जाया कालच्याधरूनी माझी तयारी
देव जोतीबाचे घोडे चर ग नह्यारी ।।

४ धुळदेवाला जाया माझं यंदा नव्हतं मन
भिवा गं बाई न शिंग्या पाठवल्या दोन ।।

५ गावा गं फलटन गावाला जाया खडे रुतती पायाला
झालं बाई धुल गं भिवशच यांच सत गं पाह्याला ।।

६ गाव गं फलटन गाव गं खड्या मुरमानी दाटलं
बाई भिवया साठी गं मला सडक वाटलं ।।

७ असं धुळ गं भिवयापाशी फार मेंड नाक्याचा पसारा
घेती गं काखाला कोकरू उधाळू लागती मेंढरा ।।

८ पहिली गं वयी गाते दुरुजा गावाला
गुलाल भंडार धुळू देवाला आंगाला ।।

९ पहिली गं माझी वयी गजरा देवाचा गाजिला
आज कशानं मपल्या घोडा देवानं सजीला ।।

१० पहिली गं माझी वयी गजरा गरंगला
बाई गुलाल भंडार उधळू देवाच्या अंगाला ।।

११ बाळ माझा बारामतीच्या गाडीनं
बाई केला वर हात भिवूबाई लाडीनं ।।

१२ काला घासू दाना देते हरभरा टाळाला
बाई देवळे धुळीचं राजा फलटन राळाचा ।।

१३ देव नांदतून ये गं फलटन शिवारी गं
बाई रावयी टिलीली अगं काळ्या या वावरी ।।

१४ देव ये गं बाबुलाल नहे पापया दोसाचा
गायी बावळ्याच्या दुधाचा चांद सूर्याचा तेजाचा ।।

१५ अगं सुंगद्या बाईची कळनी गं डाव्या कुशी
बिरू देवाचं लगने डोल झांजरी लावूनी ।।

१६ बाई सुंगद्या बाईची कहनी गं डाव्या कुशी
बिरू देवाचं लगने गोकुळ आष्टमीच्या दिशी ।।

१७ काळा या बकरा ये गं खांडीला खुंडीला
अगं बाळा बयान मह्या गजर देवाचा मांडीला ।।

१८ गाव गावीचे देवू येती आपेश घेवून
देव मपला धुळीत येतूया लेहून ।।

१९ देव या धुळीत काळा धुंडी गं कशान झाला
आंबील गं पियान गाड्या भगताच्या आला ।।

२० काय गं वाजत गाजत येगं रावळावरूनी
भोळा मह्या गं भगतान केली आंबील आरती ।।

२१ अगं कैशला मपल्या नव्हती दंड गोपाळाला
कुशाबाच्या गाद्यावर मेंढ्याबाई तू बसली ।।

२२ देवा गं धुळीताची पगडी सोन्याची दिसती
तांदुळ दोही आन्या गं बरावरी
कैशा माझा ये पाहवाना मह्या दुभंगनीच्या घरी ।।

२३ धुळीत वाघ मोड्याचा जावई
डावं उजवं झालं नाही ।।

२४ अगं धुळीतानी पैन मांडली जडाची
जितील मितबाई तळ हाताच्या फोडाची ।।

२५ माझा धुळीताचा ये गं फलटनी तुझा वाडा
अरे बाळाला याच्या मह्या विघनाचारे कर झाडा ।।

२६ धुळीताचा ग ये गं फलटनी तुझं घर
अरे बाळाला याच्या मह्या आल्या विघन कर दूर ।।

२७ फलटन फलटन फलटनाल, लागं बारा येंशी
धुळ देवाच्या छबीन्याला जोतीबाबा रे गर्दी करशी ।।

२८ फलटन फलटन फलटनाला लाग बारा गल्या
धुळ देवाच्या छबीन्यात जोतीबा रे जटावाल्या ।।

२९ पिवळा वारू, आले ग वाकनाला
अग धुळीत जोतीबाबा राती होता ग मुक्कामाला ।।

३० शेत ग बिरूबाचं कायी दिसंत गुपीत
देवा ग धुळीताचा घोडा ढवळा शिपीत ।।

३१ हात मी जोडीते फलटनाच्या ग सोनाराला
देवा गं धुळीताला मुर्ख्या मह्या लेनाराला ।।

३२ कुनी झाडीते फलटन च्या गं गुजराला
सवा ग शेर मोतीयाच्या घोड्याच्या खोगीराला ।।

३३ आरूण्या ये ग वनात तहान लागली बाई बाळाला
सटवाची ये गयी भिवूबाई ग धारा सोडीली बाई माळाला ।।

३४ बाई आरूण्या ये ग वनात येग जीवाचा झाला काला
कवतीक्या ना बाबा माझा ग बिन आरूळीचा ना आला ।।

३५ बाई आरूण्या येग वनात धनगऱ्या गावड्या बाई बोलना
बाई गवगळ्याला मह्या ना खांड मिरद्यांला बाई तोलाना ।।

३६ मह्या रें लक्ष्मी बाबाला अरे बारा ना वि-हा तूलाना
बाई लिंबा या नाराळानी ग शिवा बारागळीत गेला ना ।।

३७ बाबाच्या रिंगनाथ ग कैक जन लोक बघ ग वाट
बाई कवतोक्याची मह्याना बघायीना ग थाट ।।



३८ बाई देवा ग मधी देव ना धुळा मपला बाई मानाचा
येग घोड्याला घाली जीनना वाट चलतू बाई उन्हाचा ।।

३९ उठत गं बसत वाडा देवाचा बाई पाहीन
बाई कवतीक केला मह्याना वयी नेमान बाई गायीन ।।

४० पहिली माझी वयी गं आयकू कैलासाला गेली ना
मह्या ना इंद्रसबाग जागी झाली ना ।।

४१ बाई रूस लई धुळ देवाच येग माळ्याच्या दारी उभा ना
माळीबाबा लयी हावशा ना वाडी फूलायाचा जोगा ना ।।

४२ बाई रूसरी भिवूबाई गं येवून बसली ये ग मळ्यात
चाफी गं याचे फूल ना हार मागती बाई गळ्यात ।।

४३ बाई बाबाच्या रिंगनात ग येवून बसलं लोकजन ना
मह्या अंजन येड्या बाळाचं एकचित्ती ना याचं मन ।।

४४ कितीक कवतीक्याचा मह्याना याचा डावू ग काही रंगना
टाक घोड्यावरी टांग ना ।।

४५ आरे देवू ये बाई जेवले बाबूलाल येग जेवाना
मपल्या बाईचं येग पुतरू याला वशाट बाई भावाना ।।

४६ मपल्या बहिणीला येड लागलं बाई जीवाला
कवतीक्या ग बाई मह्याना जनमपल्या ये ग गावाला ।।

४७ देवाच्या ग देव मेंढे बा तू बसली मेंढे बाई गं
देवा गं धुळीताची पगडी सोन्याची दिसती गं ।।

४८ लाजुळीच्या लांब चारगडीला गेला
लिंब ग याच नावच काही होवगहाला केला ।।

४९ भोवळ्या बाबाचं याच गवळं मातल
हंड्या गं हंड्या दुध कोन्या शिवारी तापलं ।।

५० मपल्या बाळाच्या गायी झाल्या ग रानुमाळ
झाल्या रानुमाळ खातु हुलग्याचं पानमाळ ।।

५१ मह्या रे बाबुलाल लग्ना पाहुणा यावा वाड्या
गुलालाच्या पुड्या अशा टाकिते पायी घड्या ।।

५२ हाकलला उभा मेंढका महिना
गवगड्याचा मह्या खांड वळखू येईना ।।

५३ साळीच्या भाताला गंगुबाई निवद
गंगुबाईला निवद मेंढ्या चारी तो गोविंद ।।

५४ मेंढ्या उभ्या केल्या गं वाळवंटी
उभ्या केल्या गं वाळवंटी कातऱ्याला मूळ चिठ्ठी ।।

५५ कातरगिरीच्या कातर कुनाची वाजती
अगं मिरजाची मपल्या नाही लाव्हारं बुजती ।।

५६ पाठच्या पाहऱ्यात येग बारव दननली
जोडया गं बिरूद्याची खिल्लरीन गं पाण्या गेली ।।

५७ पांगरील्या मेंढ्या येग भरल्या मापाला
मह्या ग मिरजाच्या याच्या गं हाती लोड्याला ।।

५८ पांगरील्या मेंढ्या किती भरल्या मापाला
भरल्या मापाला विजू सांगतू बापाला ।।

५९ पांगरील्या मेंढ्या हाता दुहेरी आले फोड
हाता दुहेरी आले फोड आखाडी गेली जड ।।

६० कातरील्या मेंढ्या करते आधन पोळ्याच
मिरज्याच मह्या खांड सुटलं भोळ्याचं ।।

६१ कातरील्या मेंढ्या करीते आधन रोट्याचं
निवंद धुळीताचव खांड सुटलं मोठ्याचं ।।

६२ गंगुबाईच्या कडीला पाच मेंढक्याची जाळी
काळ्या गं घोंगडीला मिरजा माझा उगमळी ।।

६३ देव धूळ देवू दैत्या मिरवत गेला
भिवूबाई बहिणीनां मोहन्या भंडार संग दिला ।।

६४ देव धूळ देवू दैत्या मिरून घरा आला
भिवूबाई बहिणीचा मोहन्या भंडरखरा झाला ।।

६५ साती जनी बहिणी बहणी बसल्या न्हायाला
देव माझा धूळ देवू गेला गगणी घेयाला ।।

६६ साती जनी बहिणी उठल्या न्हाहूनी
देव माझा धूळदेवू आला गगणी घेवूनी ।।

६७ साती जनी बहिणी सात रंगाचे पातळ
देव धूळ्या देवाला आना नखीचे धोतर ।।

६८ फलटनाच्या येशी भिवूबाई तुझ्या गावी
नणंदाच्या नात्यांनी मी त बाई पाय धूवी ।।

६९ फलटनाच्या येशी ना भिवूबाई तुझ्या म्हशी
नणंदाच्या नात्यांनी मी त बाई पाय पूशी ।।

७० फलटनाच्या येशी भिवूबाई तुझा घोडा
नणंदाच्या नात्यांनी मी त बाई पाय पड ।।

७१ फलटनाच्या येशी भिवूबाई तुझ्या गायी
नणंदाच्या नात्यांनी मी त बाई कुंकू लावी ।।

७२ आला आला धूळू देवू बारामतीच्या गाडीनी
वर हात केला रं भिवूबाई या लाडीनी ।।

७३ गाव ती फलटन वाण्या बामणाचं गावू
इथं त नांदतू धनगराचा धूळूदेवू ।।

७४ मारीला बाबुलाल पूर नही गयीला आला
बोलती वेंणू माता घात बाबुलालचा झाला ।।

७५ अशा फलटनाच्या येशी भिऊबाई तुझा हत्ती
बाई नंदाच्या नात्यांनी मी त बाई पाय धूती ।।

७६ देव धूळ या देवाला याला सासरवाडी नही
तळहाताच्या फोडातूनी जन्मली मिताबाई ।।

७७ देव बाई त्यो देवू वाघमोड्याचा जावई
लेक याची मिताबाई उज डाव झालं नही ।।

७८ शेळीच्या बोकड्याचं लेकी मी वरत
बाई देव धूळ देवू वाघमोड्याच्या गं घरात ।।

७९ आरूण्या वनामंधी पडलं मपल ओझं
वळखीले बनूबाई दावन केलं तुझं ।।

८० रायी रूईच्या रानात पवन्यांची पैल केला
राही रूयीचा गवळी बाबा सारणीला गेला ।।

८१ रायी रूयीच्या रानात फार पवना माजला
राही रूयीचा गवळी बाबा वचनी गुतला ।।

८२ देव मपला बाबीर लिंबाखाली झोपी गेला
काळ्या भोवळ्या गाईंनी हुंबरूनी जागा केला ।।

८३ राही रूयीच्या रानात वल्ले नारळ फुटला
बाबाच्या तरी मह्या खरे सवल सूटला ।।

८४ रायी रूयीच्या रानात देव बाबीर मारीला
पान भरे हरबरा याने गायाला चारला ।।

८५ बाई आला आला बाबा आला आला म्हणू नका
काळ्या मदम्या रातीला मारी गायीला हाका ।।

८६ देव मपला बाबीर बाई म्या गायात पाहीला
बाबांनी मह्या गं तळ चांगला पाहीला ।।

८७ पहाटच्या पाहऱ्यामंधी गं कोंबडा कोकला
देव मपला बाबीर बाबा आंघुळी उठला ।।

८८ देव बिरूबा मोठा लालीम सांगतो
मेंढ्याच्या आखारी सर्प तालीम खेळतो ।।

* * *



# बिरूबा

१ पहिले नमन रे खंडोबाला खंडोबाच्या माळसरीला
बाणारबाईच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

२ दुसरे रे नमन महादेवाला महादेवाच्या पार्बतीला
ढवळ्या रे नंदीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

३ तिसरे रे नमन माझे गणपतीला गणपतीच्या सारसला
सरंसरपतीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

४ चवथं रे नमन माझे भैरबाला भैरबाच्या जोग्यासऱ्याला
ह्या ह्या रे जोग्याच्या तिरसोळला हो हो नमन माझे ।।

५ पाचवं रे नमन पाची पांडवाला छप्पन कोटीच्या यदोबाला
कार्तिक स्वामीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

६ सहावं रे नमन मात्या पित्याला तळव्यांची जन्म तुरतुरला
माय काय मात्याच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

७ सातवं रे नमन सातीआसऱ्याला आठ मजूया भोंनज्या देवाला
नवनाथाच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

८ आठवं रे नमन पांढरीला ना मारतीच्या या वेताळ साहेबाला
कार्तिक स्वामीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

९ नववं रे नमन नवूमीऱ्याला लंकापतीच्या रावणाला
मंडोधरीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१० दहावं रे नमन दहाव्या आवतारी विष्णू ब्रह्म हे मायासरी
नारद मुनीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

११ अकरावं नमन धराधरीला धराधरीच्या मेंघ राजाला
विजाबाईच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१२ बारावं नमन कडीपठाराच्या कडीकुलपाला
सकळक स्वामीच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१३ चौदावं नमन जोतीबाबाला जोतीबाबाच्या जोगड्याला
घोटूळ्या बाईच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१४ पंधरावं नमन विठ्ठलाला विठ्ठलाच्या रुक्मिणीला
कुंडलीकाच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१५ सोळावं नमन गोकुळाला गोकुळाच्या श्रीकृष्णाला
राधाबाईच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१६ सतरावं नमन दसराथाला रामलक्ष्मण पुंज्या देवाला
कार्तिक स्वामीच्या छबीन्याला हो हो नमन माझे ।।

१७ अठरावं नमन बिरू देवाला बिरू देवाच्या गोरख बुवाला
धडसुबाच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१८ एकोणिसावं नमन सतुशाला सतूशाच्या म्हसुबाला
कामनाबाईच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

१९ विसाचं नमन धुळूदेबाला धुळूबाच्या भिवायाला
गोंडूया देवाच्या चरणाला हो हो नमन माझे ।।

२० देव बिरूबा माझा झाली मग सांगती
पुनण्याच्या बाळा किती काशीन कुपेर काठी ।।

*

# भगवानबाबा

१ धुम्या ती डोंगर बाई मी नेंघते रागं रागं
देखियल्यानी भगवान बाबा गेला माझा शिनभाग

२ असं धुम्या गं गडावर एक पाखरू गं रंगाचं
बाबाच्या गं शिखराहून पाणी दिसतं गंगाचं

३ पंढरीची वाट खड्या-खुड्यांनी दाटली
बाबाच्या संगतीनी मला सडक वाटली

४ धुम्या गं गडावरी नाही पिंपरीला शेंडा
भगवान बाबानी तिथं मिरविला झेंडा

५ धुम्या गडावर संत वाजवायची टाळ
भगवान बाबा साधू वंजाऱ्याचं बाळ

६ पंढरीची वाट हलकी गेली मला
भगवान बाबा साधू होते संगतीला

७ भगवान बाबाला आज्ञा पुण्या शहराला
पाठील्यात तारा भिवसेन कशाला

८ बाबाला देव आज्ञा तारा चालल्या घुंगत
बोलतेत बाबुलाल बालपणीची संगत

९ बाबाला देव आज्ञा मोटार फुलांनी पेडीली
बोलतेत बाबुलाल बाबा संगत सोडली

१० साधू भगवानबाबा जशी चंद्राची ज्योत
बाबाच्या गादीवर बसले रजपूत

११ साधू भगवानबाबा पुण्य तुमचे झाले लई
वंजाऱ्याच्या गादीवर रजपूत दिला पाई

१२ साधुमंधी साधू, साधू झाले दुनियामंधी
भगवानबाबा वाची पोथी भरलेल्या पाण्यामंधी

१३ साधू म्हणं साधू कईक होणार
भगवान बाबांची नाई प्रतिमा होणार

१४ टाळ वाजं टाळकरी मृदुंगा बोटं चाळा
गुरू माझा महाराजाचा ऐका वंजाऱ्याच्या गळा

१५ गडाला जायला दुपार टळली
हातात बेल तांब्या जाई वटीला खुलली

१६ गडाचा डोंगर मी येंघते बसुनी
बाबाला एकादस नेलं खोबरं किसुनी

१७ धुम्या गडावर एक शिखर गेलं उंच
काच कमळ लावाया गच्च बाबुलाल येंघ तुच

१८ जन्मले भगवानबाबा माता असेल कशी
गुरू माझे भगवानबाबा पोटी आले ब्रह्मऋषी

१९ धुम्या गडावरी हिरी लाईट लाविली
गुरू माझ्या महाराजांनी कीर्तनाची वाट दाविली

२० धुम्या गडावरी वाडा लोखंडी गजाचा
गुरू माझे भगवानबाबा साधू वंजारी बिजाचा

२१ धुम्या गडावरी होत्या मोठ्या मोठ्या बाली
बाबा संगे कीर्तन बाबुलाल काढी चाली

२२ भगवानबाबा वंजाऱ्याचा बाबुलाल वाण्याचा
माझ्या गुरूने जितीला धुम्यागड सोन्याचा

२३ धुम्या गडावर पहिलं होतं रानमाळ
भगवान बाबांनी आता मांडलं देवस्थान

२४ सकाळच्या पारी देवाधर्माच्या गोष्टी
घेतीला जन्म भाग्य तुमच्या पोटी

२५ हातातली मुदी गोऱ्या हाताला दिसंना
भिवसेन बाबाला दृष्ट झालेली सोसंना



२६ इथून दिसते वनदेवाचा बंगला
जमले साधूसंत बाबा धुम्याला येंगला

२७ काशी-केदार धुम्या गडाच्या मागं
भगवान बाबाला उंबराची बागं

२८ धुम्या गडावरी नही सावलीला झाड
देव भगवान पोथी वाचायचे तुळशीच्या आड

२९ भगवानबाबा झाले शेवूजवळ नव्हती माऊली
बाबाच्या गं गादीवरी सातूची सावली

३० बाबा झाली देवआज्ञा सोमवारी रात्रभारी
आसे वाचित होते गुरू माझे ज्ञानेश्वरी

३१ बाबांची बाई जिपकार दवाखान्याच्या दारात डॉक्टर बोलूनी गं देईना
बाबांच्या मग तरासाचे औषध पोटात माईना

३२ बाबा झाले देवआज्ञा आणले पुण्याच्या नेहारी
गुरू भिमसेनबाबांनी केली येण्याची तयारी

३३ बाबा झाले देवआज्ञा जागूजागी थवा उभं
गुरू भिमसिंह बाबाचं नाव वहिवरी बघं

३४ बाबा झाली देवआज्ञा सारा डोंगर ढवळा
बाबांच्या अंगारीचा बल झळकतो सावळा

३५ बाबा झाली देवआज्ञा कशी मोटार घेती धाव
गुरू माझ्या महाराजाची कीर्तनाची हाव

३६ हात लाविल्यात बत्त्या दाटूदाट
गुरू भगवान वाचतेत हारिपाठ

३७ बाबा झाली देवआज्ञा गेल्या देवीला बातम्या
बाबाच्या गं गादीवरी बंकटस्वामीचा गं पुतण्या

३८ बाबा झाली देवआज्ञा हालकं वाजतं सिंग
गुरू भिमसिंगबाबा झाले गादीवरी दंग

३९ धुम्या ना गडावरी कोणी वाजविली ताटी
बाबांच्या दर्शनाला रावळात झाली दाटी

४० धुम्यावतदी ना गडावरी नव्हतं पाखराला पाणी
गुरू माझ्या महाराजांनी हौद बनविले दोनी

४१ धुम्या ना गडावरी कोणी वाजवला थाळा
बोलतेत बाबुलाल वामनभाऊ याना कळा

४२ धुम्या ना गडावरी कशी वरडती मोर
बोलतेत बाबुलाल वर झाले जयजयकार

४३ आयाबायानु चला गडाच्या पोथीला
गुरू माझ्या महाराजांनी विठ्ठल माथ्यावर घेतला

४४ आयाबायानु धुम्याला गं येतं कोणी
अशी हरिच्या नामाची इथं उसवली गोणी

४५ हरिचं नाव गायाला मला दुपार टळली
बाई माझ्या महाराजाची सभा रेडूत बोलली

४६ धुम्याचा डोंगर बाई मी येंघते येंघाना
गुरू माझ्या महाराजाचा हरिपाठाचा धिंगाना

४७ धुम्या ना गडावरी पहिल्या होत्या कारीबोरी
गुरूमिझ्या महाराजांनी बसिले श्रीहरी

४८ धुम्या गं गडावरी पहिल्या होत्या पवळी
आसं बांधूनी दाखीलं जनार्धनाचं

४९ धुम्या गं गडावरी पहिलं चरं गाई-म्हशी
गुरू माझ्या महाराजाला कसे बोलतेत ऋषी

५० धुम्या गं गडावरी हिऱ्या मोसुंब्याचा बाग
गुरू भगवानबाबाला नाही हळदीचा डाग

५१ आसे साधूमंधी साधू झालेत पोटासाठी
भगवानबाबा झाले साधू विठ्ठलाच्या भेटीसाठी

५२ धुम्या गडावरी सारा डोंगर तुळशीचा
भगवानबाबांचा तिथे डेरा साधूचा

५३ धुम्या गडावरी हैत सोनियाचे खोड
बाबा सांगं कीर्तनात बाबुलाल करी तोड

५४ बाबा सांगं किरतान किरतानाला आला रंग
बाबांच्या पाठीमागं उभे होते पांडुरंग

५५ अशी माझी वही सावरगावी सानपाला
भगवानबाबा साधू तिथं जनमाला

५६ काय केलं पुण्य सावरगावीच्या लोकानं
भगवानबाबानी गड जितीला एकानं

५७ धुम्या गं गडावरी येंघायाला झाली रात
भिमसेन बाबाची आली कथा आवरत

५८ बाई बोलले मराठी बोल ध्यानात राहिला
बाबा माझ्या गड्यानं गड बांधून दायिला

५९ बाई धुम्याच्या डोंगरात रान शोधून पाहिलं
बसले गं भगवानबाबा तिथं निशान लाविलं

६० टाळ वाजी टाळकरी आला मृदुंग्या घाईला
साधू भगवानबाबांनी अभंग चढवाचा लाविला

६१ टाळ वाजी टाळकरी मृदुंग्याची मान हालं
भगवानबाबा माझा ईन्यावाला चंद्र डुलं

६२ बाई माझ्या घरामंदी नित हरी भजन करीन
येवढा टाळ पखवाजाचा नित आवाज काना येईन

६३ दारी पेटवली चूल हंडा ठेवला वजनाचा
केवढा चुडीयाला माझ्या शीण आला भजनाचा

६४ बाई धुम्या गडावरी सभामंडप चौकोनी
बाबा सांगं कीर्तन रयतीच्या डोळ्या पाणी

६५ बाई धुम्या गडावरी कीर्तनाला जागा थोडी
साधू भगवानबाबाची द्रिष्ट बाबुलाल काढी

६६ बाई धुम्या गडावरी पवळी घातील्या दाटूनी
खरवंडीच्या पाटलानी घेतला वखूद वाटुनी

६७ महिन्याचं पंढरपूर पंधरा दिसयाची काशी
धुम्या गडाचा डोंगुर तिथं मह्या गावापाशी

६८ आयांनो बायांनो आपलं गं भाग्य थोर
यवढा मागं धुम्यागड जवळ हाई पंढरपूर

६९ यवढे बाबा झाले सेऊ, रान धुंधकालं बाई
कशा फोडिती हंबरडा यांच्या दावणीच्या गाई

७० भगवानबाबा झाले शेवू, गाई, म्हशी ओरडती
आंधळे, पांगळे म्हणती आमची माय होती

७१ भगवानबाबा झाले शेवू रडती मायलेकी
बोलतेत बाबुलाल घात झाला एकाएकी

७२ भगवानबाबा झाले शेवू रडती सासूसुना
बोलतेत बाबुलाल घात केला दुश्मना

७३ भगवानबाबा झाले शेवू सारा डोंगर ढवळा
साधू भगवानबाबांचा केला शिप्यानी सोहळा

७४ भगवानबाबा झाले शेवू संमदी केली हाऊस
बाबांच्या समाधीवर केला पैशाचा पाऊस

*



# तारकनाथगड, नारायण महाराज

१ तारक गडावरी हायीत दगडाचे टाळ
नारायण महाराज संत वंजाऱ्याचा बाळ

२ तारकगडावरी हिरी लाईट लाविली
नारायण महाराजांनी वाट भजनाची दाविली

३ तारकगडावरी नाही पाखराला पाणी
नारायण महाराजांनी हौद बनवले दोनी

४ तारक गं गडावरी सिताफळी हारोहारी
तिथं गं नारायणबाबा वाचितेत ज्ञानेश्वरी

५ तारक गं गडावरी पिंपरीची झाडी दाट
तिथं नारायणबाबा वाचितेत हरिपाठ

६ असं टाळ-मृदुंगाचं माझ्या वसरीला पोतं
नारायण बाबांचं राती कीर्तन होतं

७ तारक गं गडावरी पहिली नव्हती काडी कुडी
नारायणबाबांनी आता बांधिली माडी

८ असी तारक गडावरी मोटार कोणाची गुंगती
अशा नारायण बाबांच्या गं शाबुदाण्याच्या पंगती

९ अशी तारक गडावर मोटार करी भुंगभुंगं
असे नारायणबाबा आत बसले पांडुरंग

१० असं गंगा तुझं पाणी हाई सोन्याच्या गुंडीत
नारायण बाबाला लागली तहान, एवढ्या नाथाच्या दिंडीत

११ गंगा तुझं पाणी हाई सोन्याच्या पेल्यात
आजीनाथ बाबाला लागली तहान एवढ्या नाथाच्या काल्यात

१२ पोळ्याचिया जेवणाला झाली मजला रात
साधू नारायणबाबा आले बाई मिरवत

१३ असे माझ्या वाड्याला गं साधूसंत बाई येती
बाई बाबांच्या गं भोजनाला पुरणाच्या पोळ्या होती

१४ साधू बाई नारायण बाबा आले बारस सोडाया
उशीर मजला झाला बाई मला कारले तोडाया

१५ मोठे मोठे बाई लोक धरलेत बिगारीला
नारायणबाबाचा गं शोभा मंडप उभारीला

१६ महिंद्याच्या गं येशीमंधी उभं माणूस माईना
साधू नारायण बाबांची शिंगी पुलाव घेईना

१७ तारक गं गडावर जायला रयदांड्यात अंधार
नारायण बाबानं तर बत्त्या लाविल्या सुंदर

१८ तारक गडावरी हिरवा कंदील जाळीचा
साधू नारायण बाबा हाये वंजार कुळीचा

१९ नवस बोलले बाजाराला जाता जाता
देव तारीक बाबा उभा झाडा मधी होता

२० आया बायांनो जागा कीर्तनाला धरा
नारायण बाबा चांदणीखाली हिरा

२१ तारक गडावरी वाळूचा केला वटा
नारायण बाबाला नाद कीर्तनाचा मोठा

२२ बांधयिला गडावर काठीला कळस
नारायण बाबांनी तिथं लाविली तुळस

२३ पाया खांदायला गेलं सारं महिंदा गावू
बांधियला गड टाका नारायणाचं नावू

२४ पाया खांदायला गेला गाव महिंद्याचे लोकं
नारायणबाबांनी बांधियल गायमुख

२५ किती हाका मारू तुला लेका मोहनराजा
बाबा येतेन भोजनाला टाका वसरीला बाजा



२६ किती हाका मारू तुला लेका मोहनराजा
बाबा येतेन भोजनाला टाका वसरीला बाजा

२७ बाबा कीर्तन सांगती त्यांचा हालं डावा हात
नारायण बाबांची गावोगावी गेली मात

२८ टाळ मृदुंगाची पेटी, पेटी ठेविली खुंटीला
नारायण बाबांच्या तारक निघाले भेटीला

२९ अगं पैठणीची वाट दगड्या धोंड्याची
एवढी नारायण बाबांची दिंडी पिवळ्या झेंड्याची

*

### प्रकरण सातवे

# ओवीगीतांचा शैलीनिष्ठ तुलनात्मक विचार

याच रचनाबंधामध्ये संकलित केलेल्या ओव्या, परंतु जात्यावरच्या ओव्या ह्या जाताच्या लईवर प्रगट होतात. त्यामुळे जात्याचा आकार, दळणाचा वेध, धान्याचा प्रकार आणि दळणाऱ्या स्त्रियांची शक्ती या सगळ्यांचा लईवर परिणाम होत असतो. त्यामुळे मात्रांची संख्या कमीजास्त होते. त्याचप्रमाणे शब्दाचा किंवा एकाक्षरी शब्दांची संख्या सरते-पुरते करण्यासाठी वाढवली जाते किंवा कमी होते. परंतु प्रत्येक ओवीत चार चरण असतात व त्यात नामोल्लेख किंवा कृतीविषयीचा उल्लेख बदलतो. परंतु सुख-दुःख, आनंद-हास्य, ताण-तणाव या सगळ्यांसकट भावना श्रद्धायुक्त असते. ही श्रद्धा प्रपंचाचा कर्तव्यांशी किंवा आराध्य दैवतांशी निगडीत असते. त्यामुळे जात्यावरच्या ओवीची शैली काहीशी लवचिक तरीही विशिष्ट बंधात चार चरणातच येते. उदा.-

संकलित

१)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पं ढ री चा | विठू | विठू | म्हणतेत | काळा | | मात्रा - २३ |
| - U - - | - - | - - | -U-U | - - | | |
| २,१,२,२ | २,२ | २,२ | २,१,२,१ | २,२ | | |
| ७ | ३३ | ३३ | ६ | ४ | | |
| नऊ | लाख | पृथ्वी | पडती | याच्या | गळा ।। | मात्रा - २१ |
| U- | - U | - - | UU- | - - | U- | |
| १,२ | २,१ | २,२ | १,१,२ | २,२ | १,२ | |
| ३ | ३ | ४ | ४ | ४ | ३ | |

अक्षरसंख्या (६।८।६।७)

२)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पंढरी | पंढरी | कोण्या | गं | गवंड्यानं | घडवली | मात्रा - २५ |
| -U- | -U- | - - | U | UU -U | UUU- | |
| २,१,२ | २,१,२ | २,२ | _ | १,१,२,१ | १,१,१,२ | |
| ५ | ५ | ४ | १ | ५ | ५ | |
| रुक्मिणी | माता | डाव्या | ग | भूजाला | मांडली ।। | मात्रा - २५ |
| U - - | - - | - - | U | - - - | - U - | |
| १,२,२ | २,२ | २,२ | _ | २,२,२ | २,१,२ | |
| ५ | ४ | ४ | १ | ६ | ५ | |

अक्षरसंख्या (१०।१४।९।१६)

३)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रुसली | रुक्मिण | वाळवंटी | दिलं | पाल | | मात्रा - २२ |
| -U- | --U | - U-- | UU | -U | | |
| २,१,२ | २,२,१ | २,१,२,२ | १,१ | २,१ | | |
| ५ | ५ | ७ | २ | ३ | | |
| बोलतू | पांडुरंग | राणी | रुक्मिणी | धरला | चाल | मात्रा - २७ |
| - U - | -U-U | - - | - - - | UU- | -U | |
| २,१,२ | २,१,२,१ | २,२ | २,२,२ | १,१,२ | २,१ | |
| ५ | ६ | ४ | ६ | ४ | ३ | |

अक्षरसंख्या (६।८।७।१०)

४)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भरली | चंद्रभागा | नावा | चालुल्या | वाहुनी | मात्रा - २५ |
| UU- | ---- | -- | - U - | - U - | |
| १,१,२ | २,२,२,२ | २,२ | २,१,१ | २,१,२ | |
| ३ | ८ | ४ | ५ | ५ | |
| विठ्ठलाची | रुक्मिण | आली | आरती | घेवूनी | मात्रा - २७ |
| U - - - | - - U | - - | - U - | - - - | |
| १,२,२,२ | २,२,१ | २,२ | २,२,२ | २,२,२ | |
| ७ | ५ | ४ | ५ | ६ | |

अक्षरसंख्या (७।८।७।८)

५)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राजा | मारवती | चल | माझ्या | वाड्या | |
| – – | –UU– | UU | – – | – – | मात्रा – २० |
| २,२ | २,१,१,२ | १,१ | २,२ | २,२ | |
| ४ | ६ | २ | ४ | ४ | |
| सेंदरी | लाल | पुड्या | टाकीन | पायघड्या | |
| –U– | –U | U – | ––U | –UU– | मात्रा – २२ |
| २,१,२ | २,१ | १,२ | २,२,१ | २,१,१,२ | |
| ५ | ३ | ३ | ५ | ६ | |

अक्षरसंख्या (६।६।७।७)

६)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| द्रोपदीची | लज्जा | काय | लुटलीस | गड्या | |
| –U–– | U– | –U | UU–– | – – | मात्रा – २३ |
| २,१,२,२ | १,२ | १,२ | १,१,२,२ | २,२ | |
| ७ | ३ | ३ | ६ | ४ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कृष्णाने | पाठविल्या | नवरंगाच्या | चुनड्या | |
| ––– | –UU– | UU––– | UU– | मात्रा – २४ |
| २,२,२ | २,१,१,२ | १,१,२,२,२ | १,१,२ | |
| ६ | ६ | ८ ५ | ६ | |

अक्षरसंख्या (६।८।७।८)

७)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सीता | सत्वाची | तपल्या | सत्वाला | भ्याली | |
| U– | U–– | UU– | U–– | – – | मात्रा – २१ |
| १,२ | १,२,२ | १,२,२ | १,२,२ | २,२ | |
| ३ | ५ | ५ | ४ | ४ | |
| लंकेचा | रावणाला | भिक्षा | वाढायला | गेली | |
| ––– | –U–– | U – | ––U– | – – | मात्रा – २७ |
| २,२,२ | २,१,२,२ | १,२ | २,२,१,२ | २,२ | |
| ६ | ७ | ३ | ७ | ४ | |

अक्षरसंख्या (५।८।७।८)



इतर अभ्यासकांच्या उदाहरणादाखल ओव्या.

१)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| विठ्ठल | विठ्ठल | हाका | मारीतो | येड्यावाणी | | |
| U–U | U–U | – – | ––– | –––– | | मात्रा – २६ |
| १,२,१ | १,२,१ | २,२ | २,२,२ | २,२,२,२ | | |
| ४ | ४ | ४ | ६ | ८ | | |
| चंद्रभागा | तुझं | पाणी | धावा | घेतं | घोड्यावाणी | |
| –––– | U– | – – | – – | – – | –––– | मात्रा – ३१ |
| २,२,२,२ | १,२ | २,२ | २,२ | २,२ | २,२,२,२ | |
| ८ | ३ | ४ | ४ | ४ | ८ | |

अक्षरसंख्या (६।९।८।८)

(विठ्ठलगान अंबुलगेकर, प्रतिभा, सविता प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली ३० जून १९९३)

२)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंढरे | गे | परामधी | उभे | राहायला | नाही | जागा | |
| –U– | – | U–U– | U– | ––U– | – – | – – | मात्रा – ३१ |
| २,१,२ | २ | १,२,१,२, | १,२ | २,२,१,२ | २,२ | २,२ | |
| ५ | २ | ६ | ३ | ७ | ४ | ४ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| देवाच्या | विठ्ठलानी | थुंय | लाविल्या | तुळशीबागा | |
| ––– | U––– | –U | – U – | UU––– | मात्रा – २९ |
| २,२,२ | १,२,२,२ | २,१ | २,१,२ | १,१,२,२,२ | |
| ६ | ७ | ३ | ५ | ८ | |

अक्षरसंख्या (८।११।१३।१६)

(जात्यावरील ओव्या– गवस चंद्रकांत म., प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९९९)

३)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पंढरी | करावा | आईबापाच्या | पुन्याना | |
| –U– | U–– | ––––– | U–– | मात्रा – २५ |
| २,१,२ | १,२,२ | २,२,२,२,२ | १,२,२ | |
| ५ | ५ | १० | ५ | |
| आंघूळ | करावा | चंद्रभागीच्या | पान्याना | |
| ––U | U–– | ––––– | ––– | मात्रा – २६ |
| २,२,१ | १,१,२ | २,२,२,२,२ | २,२,२ | |
| ५ | ५ | १० | ६ | |

अक्षरसंख्या (६।८।६।८)

४) रुसली रुकमीन इचं रुसून वंगाळ
UU– UU–U U– UU– ––U मात्रा – २२
१,१,२ १,१,२,१ १,२ १,१,२ २,२,१
४ ५ ३ ५ ५
देवा इट्टलाला गार पान्याची आंगुळ
–– U––– –– ––– ––– मात्रा – २५
२,२ १,२,२,२ २,२ २,२,२ २,२,१
४ ७ ३ ६ ५

अक्षरसंख्या (७।८।६।८)

(आदिवासी ठाकर आणि त्यांची लोकगीते– लामखडे मा. रा., पद्मगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे, प्रथमावृत्ती २००३)

५) रामाच्या सीतेवरी रावणाने केला आघात
––– ––U– –U–– –– ––U मात्रा – २९
२,२,२ २,२,१,२ २,१,२,२ २,२ २,२,१
६ ७ ७ ४ ५
होता मोठा गर्वात आता जळतो पालात
–– –– U–U –– UU– ––U मात्रा – २५
२,२ २,२ २,१,२ २,२ १,१,२ २,२,१
४ ४ ४ ४ ४ ५

अक्षरसंख्या (७।९।७।८)

(उमाळे : स्त्री हृदयाचे – जगदाळे डॉ. कुन्ता, प्रकाशक नारायण जगदाळे, बार्शी, प्रथमावृत्ती १५ मे २००२)

६) विठ्ठल म्हणं जुनी आपलं लेकरू
U–U –– U– –U– –UU मात्रा – २१
२,२,१ २,२ १,२ २,१,२ २,१,१
५ ४ ३ ५ ४
झाली सांजवेळ आलं वसतीला पाखरू
–– –U–U –– UU–– –UU मात्रा – २४
२,२ २,१,२,१ २,२ १,१,२,२ २,१,१
४ ६ ४ ६ ४

अक्षरसंख्या (५।८।६।९)



(मराठी स्त्रीगीते– व्यवहारे डॉ. शरद, प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती २ ऑक्टोबर १९९१)

यावरून असं लक्षात येईल की, लिखित मुद्रान्वित वाङ्मयातील ओवीचे छंदोबद्ध शास्त्र लिहिले गेले असले तरी व त्याविषयी वर मो. रा. वाळिंबेंनी लिहिलेली माहिती आलेली असली तरी; लोकसाहित्यात प्रत्यक्ष कृतीतील लयीशी संबंध असल्यामुळे त्यातील शास्त्रीय बंदिशीत लवचिकता आलेली आढळते.

* * *